
जून २०१६ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य



## पावसाचे शुभवर्तमान...

# महाराष्ट्र दिन २०१६



महाराष्ट्र राज्याच्या ५६व्या वर्धापनदिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभादरम्यान मानवंदना स्वीकारून पोलीस दल व परेडमध्ये सहभागी इतर दलांचे निरीक्षण करताना राज्यपाल सी. विद्यासागर राव.

वर्ष ६७ वे | अंक १२ | जून २०१६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — प्रज्ञा गायकवाड

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokrajyavitaran@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग



## पावसाचे शुभ वर्तमान

यंदा राज्यात कोकण व मध्य महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण सरासरीच्या २७ टक्के अधिक असेल तर विदर्भात हेच प्रमाण २१ टक्के आणि मराठवाड्यात सरासरीच्या २५ टक्के असेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. जुलै आणि ऑगस्टमध्ये राज्यात सर्वत्र जोरदार वृष्टी होईल, असेही भाकीत करण्यात आले आहे.

८

## सरकार पाठीशी, यंत्रणा सज्ज

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यातील दुष्काळग्रस्त भागांसह सर्व जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या कायम संपर्कात असून शेतकऱ्यांच्या कर्जांचे पुनर्गठन, जलयुक्त शिवार योजनेचा आढावा, टँकरची उपलब्धता, पेरणीसाठी बियाणे आणि खतांची उपलब्धता यासंदर्भात नियमित आढावा घेत आहेत.



१०



१६

## छत्रपतींचे जलव्यवस्थापन

छत्रपती शिवाजी महाराज यांचा जलव्यवस्थापनेबद्दल कटाक्ष होता. या महापुरुषाने ३०० वर्षांपूर्वी दुष्काळामध्ये पाण्याचे नियोजन कसे करावे याचा वस्तुपाठ घालून दिला होता. त्यांच्या जलव्यवस्थापनेत पावसाच्या पाण्याच्या साठवणुकीला अत्यंत महत्त्व होते.

## सारे काही विद्यार्थ्यांसाठी...

दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय शिक्षण विभागाने दिवसात घेतले असून या निर्णयांमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या अपडेट आणि अपग्रेड करण्यास प्रयत्न करण्यात येत आहेत.

२०



२७

## बेटी बचाओ, बेटी पढाओ

मुलींच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केंद्र सरकार 'बेटी बचाओ बेटी पढाओ' ही योजना राबवत आहे.

## भरू या वसुंधरेची ओटी





विशेष पुरवणी

वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून वन महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. त्या अनुषंगाने १ जुलै २०१६ रोजी एकाच दिवशी २ कोटी झाडे लावण्यात येणार आहेत. हरित महाराष्ट्राचा संकल्प प्रत्यक्षात येण्याच्या दिशने हे एक महत्त्वाकांक्षी पाऊल आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने वनमंत्र्यांची विशेष मुलाखत.



५१-५७







### विश्वासार्ह

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'दिलखुलास'चा मी नियमित श्रोता आहे. मात्र लोकराज्य या मुद्रित माध्यमावर जनतेचा सर्वाधिक विश्वास आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याप्रमाणे संपूर्ण राज्यात या मासिकाचा प्रसार व्हावा.

**– अनिल पालये, कुळगांव-बदलापूर, ठाणे**

### संग्रहणीय


मार्च-२०१६ चा सर्वांगसुंदर अंक व त्यातील अनमोल ठेवा संग्रहणीय आहे. शिवनेरीवरील शिवजन्मोत्सवाचे दर्शन सर्व वाचकांना झाले.

**– अनंत सुतार, चिपळूण**

### दुर्मीळ खजिना

लोकराज्यच्या जानेवारीच्या अंकातील दुर्मीळ अंक प्रदर्शनाविषयीचा वृत्तांत आवडला. शिवाय जुने अंक माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने आनंद झाला.

**– आर. आर. थोरान्त,**




### संकल्प आवडला


जानेवारी २०१६ च्या लोकराज्यतील संकल्प २०१६ बद्दल माहिती ही फारच आवडली. या लोकराज्यमधील विविध खात्यांच्या मंत्र्यांनी आपापल्या विकासाबद्दल कामांची संकल्पाची दिशा जनतेसमोर मांडली ते फार आवडले.

**– इम्रान हसन काझी, मेहकर, जि. बुलढाणा**

### उमेद आणि प्रेरणा

दुष्काळावरील उपाययोजनांची माहिती देणारा 'लोकराज्य'चा मे महिन्याचा अंक माहितीपूर्ण आहे. शिवाय अंकातील पर्यटनप्रेमींसाठी उन्हाळी पर्यटनाची सविस्तर माहिती देणारी 'भ्रमंती' ही विशेष पुरवणी अंक संग्रही ठेवण्यास भाग पाडणारी आहे. शिवाय 'उमेद आणि प्रेरणा' हा मुख्यमंत्री साहेबांचा लेख, २१ लाख शेतकऱ्यांना लाभदायक होणारा पीक कर्जाच्या पुनर्गठनाचा निर्णय, यंदाच्या खरीप हंगामासाठी राज्याने केलेले नियोजन, स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजनेची माहिती शेतकऱ्यांसाठी उपयुक्त आहे.

**– भागवत गावंडे, पाहेगाव, जि. जालना**




### मन जिंकले


एप्रिल २०१६ चा लोकराज्यचा अंक उपयुक्त व संग्राह्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावरील विविध लेख आत्मविश्वास वाढवणारे आहेत. शिवाय पंचतीर्थांचा विकास स्तुत्य आहे. लोकराज्यने एप्रिलचा अंक देखणा व वाचनीय काढून मन जिंकले आहे.

**– दीपक सातोरे, नांदेड**

### महत्त्वपूर्ण दृष्टिक्षेप

लोकराज्यच्या एप्रिल अंकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यावर टाकलेला महत्त्वपूर्ण दृष्टिक्षेप वाचनीय आहे. स्पर्धा परीक्षेकरिता उपयुक्त माहिती अंकात मिळते.

**– सतीश नाईक, आबोडा, ता. नांदुरा, जि. बुलढाणा**




### ज्ञानात भर

लोकराज्यचे सर्वच अंक वाचनीय असल्याने ज्ञानात भर पडते. या अंकांतून केंद्र व राज्य शासनाचे महत्त्वपूर्ण निर्णय व योजनांची माहिती सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत आहे.

**– सुनील गो. राजपुत, अलकरीपुरा, जळगांव (जामोद), जि. बुलढाणा**

## ई-मेलद्वारे...

### मार्गदर्शक

शासनाचे विविध निर्णय व योजना जनतेपर्यंत पोहोचवणारे लोकराज्य हे चांगले माध्यम आहे. तसेच स्पर्धा परीक्षेच्या मुलांसाठी मार्गदर्शक आहे. शिवाय नाममात्र दरात माहितीचा विश्वासार्ह चांगला स्त्रोत आहे.

**– अशफाक दिलावर पटेल, नारायणगाव, ता. जुन्नर, पुणे**

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रियांचे स्वागत आहे.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२**

### वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्य अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.






# शुभ वर्तमान

यंदा देशात आणि महाराष्ट्रात चांगले पर्जन्यमान होण्याचे संकेत आहेत. वेगवेगळ्या हवामान अंदाजानुसार महाराष्ट्रात सरासरीपेक्षा १०६ टक्के पाऊस होण्याचे शुभ वर्तमान आले आहे. यामुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

राज्य शासनाने यंदाच्या शेती हंगामासाठी जय्यत तयारी केली आहे. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस हे सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या कायम संपर्कात असून खरीप हंगाम, बी-बियाणे, खतांची उपलब्धता याचा नियमित आढावा घेत आहेत. कृषी उत्पादन वाढीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी केंद्र सरकारने भरीव मदत द्यावी, यासाठी प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्यासोबत मुख्यमंत्र्यांची बैठक झाली. या बैठकीत प्रधानमंत्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जलव्यवस्थापनाचा आदर्श घ्यावा अशी सूचनाही केली. छत्रपतींचे जलव्यवस्थापन नेमके कसे होते याची विस्तृत माहिती आम्ही या अंकात दिली आहे.

दुष्काळासाठी अपुरे पर्जन्यमान कारणीभूत असले तरी मानव सातत्याने करीत असलेल्या वृक्षतोडीचाही यास मोठा हातभार लागला आहे. पर्यावरणाची हानी, प्रदूषणात वाढ, जीवसृष्टीचा ऱ्हास अशा संकटांना तोंड द्यावे लागत आहे. या संकटावर मात करण्यासाठी राज्य शासनातर्फे १ जुलै २०१६ रोजी राज्यभर २ कोटी वृक्ष लागवडीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबवला जाणार आहे. या उपक्रमानिमित्त वृक्ष लागवडीचे महत्त्व विषद करणारी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची खास मुलाखत, तज्ज्ञांचे लेख आम्ही या अंकात समाविष्ट केले आहेत.

केंद्र शासनाला नुकतेच २ वर्षे पूर्ण झाली आहेत. या कालावधीत अनेक लोकोपयोगी योजनांची सुरुवात करण्यात आली. या योजनांची माहिती देणारे सदर आम्ही या अंकापासून सुरू करीत आहोत.

नुकताच संघ लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षांचा निकाल घोषित झाला. या परीक्षेत महाराष्ट्रातील १०० हून अधिक गुणवंत उमेदवारांनी यश मिळवले, त्या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन. जिद्द, चिकाटी आणि लक्ष्यकेंद्रित दृष्टिकोन व अथक परिश्रमाच्या बळावर या उमेदवारांनी यश मिळवले. ही परीक्षा देणाऱ्या राज्यातील सर्व उमेदवारांसाठी त्यांचे यश प्रेरणादायी ठरणारे आहे.

मे महिन्याच्या लोकराज्य अंकातील 'उन्हाळी भ्रमंती विशेष पुरवणी' वाचकांच्या पसंतीस उतरली आहे. लोकराज्यतर्फे असे नवे उपक्रम आम्ही वर्षभर राबवणार आहोत.

हा अंक आपणास आवडेल, अशी आशा आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
**सचिव**
**(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**

**नेमेचि येतो पावसाळा, असं आपण सहज म्हणत असलो तरी यावर्षीचा पाऊस आपल्या सगळ्यांसाठी खास आहे. आपण प्रत्येकजण पावसाची आतुरतेने प्रतीक्षा करत आहोत आणि वेळेवर यावा यासाठी प्रार्थनाही करत आहोत. याचे कारण म्हणजे गेली तीन वर्ष महाराष्ट्रात अपुरा पाऊस पडला आहे. परिणामी, राज्यातील २९०६५ गावे दुष्काळाच्या छायेखाली आली आहेत. यावर्षीचा खरीप हंगाम आपल्या सर्वांसाठी महत्त्वाचा आहे. राज्य शासनाने केलेली साध्यता आणि निसर्गाची दृष्टीक्षेपात असलेली अनुकूल साथ आपल्या कष्टांना भरभरुन यश देईल आणि शेतीमध्ये भरघोस उत्पन्न देईल, असा मला विश्वास वाटतो.**

# खरीप हंगामासाठी शासन सुसज्ज



गेल्या काही वर्षात वेळेवर आणि पुरेसा पाऊस हा राज्यासाठी कळीचा मुद्दा झाला आहे. यंदा एक दिलासा देणारी बाब म्हणजे हवामान खात्याने नोंदवलेला अधिक पर्जन्यमानाचा अंदाज. लोकराज्यचा हा अंक जेव्हा तुमच्या हाती पडेल तेव्हा कदाचित, पहिल्या पावसाच्या धारांनी महाराष्ट्र भिजला असेल अशी आशा त्यामुळे करायला हरकत नाही.

**देवेंद्र फडणवीस**
**मुख्यमंत्री**

## कृषी उत्पादन वाढवण्यावर भर

यावर्षी खरीप हंगामातील कृषी उत्पादन वाढवण्यावर शासनाचा भर आहे. त्यादृष्टीने परिपूर्ण तयारी शासन स्तरावर करण्यात आली आहे. खरीप हंगामासाठी लागणारे बियाणे, खत यांचा पुरेसा साठा राज्यात उपलब्ध आहे. याशिवाय आपत्कालीन परिस्थिती गृहीत धरून केंद्रीय कोरडवाहू कृषी अनुसंधान संस्था आणि इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल रिसर्च या संस्थांच्या मदतीने जिल्हानिहाय आपत्कालीन पीक नियोजन आराखडे तयार करण्यात आले आहेत. अर्थातच, यामध्ये अशा परिस्थितीत बियाणे पुरवठा करण्याचे शासनाचे नियोजन आहे. अशी परिस्थिती उद्‌भवल्यास पिकांचे नियोजन कसे करायचे, याचे आराखडे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठांनी तयार केले आहेत. त्याचा जरूर अभ्यास करा आणि आपल्यासाठी कोणते पर्याय उत्तम ठरतील याचा विचार करून पिकांचे नियोजन करा. यंदाचे वर्ष आंतरराष्ट्रीय कडधान्य वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. त्यामुळे कडधान्याच्या उत्पादन वाढीसाठी आपण प्रयत्नशील आहोत. कडधान्य पिकांवरील उत्पादन खर्च कमी करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे याबरोबरच डाळ मिल उभारण्यासाठी अर्थसाहाय्य, साठवणूक आणि प्रक्रिया निर्मितीला प्रोत्साहन देणे, पीक स्पर्धा याद्वारे कडधान्य लागवड वाढवणे यावर शासनाचा भर आहे.

## विकासाचा रोड मॅप

कृषी क्षेत्रातील प्रत्येक बारकाव्यांचा, प्रत्येक विभागातील जमीन, पीक आणि पाण्याची उपलब्धता या वैशिष्ट्यांचा विचार करून कृषी विकासाचा रोडमॅप महाराष्ट्राने तयार केला आहे. पीक उत्पादन खर्च आटोक्यात आणायचा असेल तर पारंपरिक शेतीच्या ज्ञानाचा योग्य प्रकारे उपयोग केला जाऊ शकतो. या पारंपरिक तंत्राद्वारे सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी

परंपरागत कृषी विकास योजना राज्यात राबवत आहोत. यामुळे राज्यातील सेंद्रीय शेतीखालील क्षेत्र नक्कीच वाढणार आहे.

यासाठी लागणारे प्रशिक्षण, सेंद्रीय घटकांचा वापर, उत्पादनाचे प्रमाणीकरण, त्यांची विक्री यासाठी ५० एकर शेती क्षेत्रावरील शेतकऱ्यांचा एक गट याप्रमाणे गट तयार करण्यात आले आहेत. या शेतकरी गटांचा आणखी एक फायदा म्हणजे अशाप्रकारे गट निर्मिती करून शेती केली तर एकटेपणाची भावना जाईल. आत्मविश्वास वाढेल आणि गटातील प्रत्येकाच्या ज्ञानाचा शेतीसाठी योग्यप्रकारे उपयोग करता येईल.

## जलसंचयातून जलसिंचनाचा पर्याय

विविध कारणांमुळे ऋतुचक्र बदलते आहे. त्यामुळे पावसाचे आडाखे बांधणेही काही वेळा अवघड होते. या साऱ्यांचा परिणाम म्हणून पाण्याचे चक्र अनिश्चितच झाले आहे. या सर्व बाबींचा विचार आता शेती करताना केला पाहिजे. पिकांचे नियोजन करताना आधुनिक तंत्रज्ञान आणि पद्धती आत्मसात करणे गरजेचे झाले आहे. कमीत कमी जमीन आणि पाणी वापरून भरघोस उत्पादन कसे घेता येईल यादृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. फक्त पावसावर अवलंबून राहणे कमी केले पाहिजे. शेतीचे पावसावरील अवलंबित्व कमी करायचे तर जलसंचयातून जलसिंचनाला पर्याय नाही.

रामदास स्वामी म्हणतात तसे 'उदक राखावे युक्तीने' हे ध्यानात घेऊन जलयुक्त शिवार योजना, मागेल त्याला शेततळे सूक्ष्मसिंचनाला प्रोत्साहन अशा अनेक योजनांना उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत ३१ जिल्ह्यांचे जिल्हा सिंचन आराखडे तयार करण्यात आले आहेत. नलिका वितरण प्रणालीच्या धोरणाला मंत्रिमंडळाने नुकतीच मान्यता दिली आहे. यामुळे माथा ते पायथा पाण्याचे नियोजन करणे शक्य होईल आणि पाण्याचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर करता येईल. शिवाय २५ टक्के पाण्याची बचतही होईल. ज्यामुळे अतिरिक्त क्षेत्र लागवडीखाली आणणे शक्य होईल.



## आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर

कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर कृषी क्षेत्रात केला जावा, यासाठी विविध योजना शासनातर्फे राबवल्या जातात. उदाहरण द्यायचे तर, जमिनीची सुपिकता वाढवण्यासाठी राबवण्यात येणारी मृद आरोग्य पत्रिका योजना, माहिती तंत्रज्ञानाचा कृषी क्षेत्रात वापर करणारी एसएमएस सुविधा, याद्वारे आतापर्यंत ५८.२९ कोटी एसएमएसद्वारे कृषिविषयक सल्ले देण्यात आले आहेत. एम. किसान या पोर्टलवर ५०.६८ लाख शेतकऱ्यांची नोंदणी करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे.

## शेतकऱ्यांचे संघटन

शेती उत्पादनांना योग्य भाव मिळावा, यासाठी मूल्यवर्धित साखळीसाठी शेतकऱ्यांचे संघटन करण्याकडे शासनाचा कल आहे. सध्या, राज्यात असे १ लाख २० हजार ३२६ शेतकरी गट स्थापन झाले आहेत. कृषिमालाच्या निर्यातीसाठी कार्यपद्धती विकसित करण्यात आली आहे. द्राक्षांसाठी ग्रेप नेट, आंब्यासाठी मँगो नेट, भाज्यांसाठी व्हेज नेट यासारख्या निर्यात पद्धती विकसित करण्यात आल्या आहेत. या साऱ्यांची माहिती त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्याचा उपयोग करून कृषिमालाची निर्यात वाढवता येऊ शकेल.

## पिकांचे नियोजन करा




अनिश्चितता हा जगण्याचा एक अविभाज्य भाग आहे. या अनिश्चिततेतून उभ्या ठाकणाऱ्या संकटांचा सामना आपल्याला करता यावा, यासाठी शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना असो किंवा प्रधानमंत्री पीक विमा योजना असो या योजना संकटात असणाऱ्या शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठीच आहेत. यासारखे बरेच काही मला सांगता येईल; पण योजनांचा गोषवारा देण्यापेक्षा मला हे सुचवायला जास्त आवडेल की, या योजनांची तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती जिल्हा आणि तालुका ठिकाणी असणाऱ्या कृषी विभागाकडून घ्या आणि पिकांचे व्यवस्थित नियोजन करा. दुसरे मला आणखी सुचवावेसे वाटते की, घरातल्या शिकलेल्या तरुण मुलांची मदत घ्या. त्यांच्या इंटरनेट, संगणकाच्या ज्ञानाचा उपयोग करून घ्या. तुम्हाला हवी ती माहिती ते क्षणात मिळवून देऊ शकतील. त्यांचा सहभाग वाढवा. याचा नक्कीच फायदा शेतीला होईल. लक्षात घ्या, नियोजनपूर्वक केलेल्या प्रयत्नांनी कोणत्याही विपरित परिस्थितीवर मात करता येते दुष्काळ आहे हे खरे असले तरी त्यावर तुमच्या मदतीने आणि शासनाच्या सहकार्याने मात करता येते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या प्रयत्नांचे वर्णन करताना म्हणतात,

***तेथे नवनवी योजना फुले, विकसोनी देतील गोड फळे***<br>***ग्रामराज्याचे स्वप्नही भले, मूर्त होईल त्या गावी***<br>***सामुदायिक प्रयत्नांनी सामर्थ्य वाढेल कणोकणी,***<br>***जेथे नसेल घोटभर पाणी, तेथे सरिता वाहू लागे.***

त्यामुळे आत्मविश्वास टिकवून ठेवा आणि नव्या पिढीच्या स्वप्नांना अभंग ठेवा. शेतकरीच खऱ्या अर्थाने भारताचे स्वामी आहेत. शासन सर्व परिस्थितीत तुमच्या बरोबर आहे. येत्या खरीप हंगामासाठी भरघोस शुभेच्छा.

**शब्दांकन : कीर्ती पांडे**

**(लेखिका मा. मुख्यमंत्र्यांच्या जनसंपर्क अधिकारी आहेत.) संपर्क : ०९५९४९४४८००**











# पावसाचे शुभ वर्तमान

**यंदा कोकण व मध्य महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण सरासरीच्या २७ टक्के अधिक असेल तर विदर्भात हेच प्रमाण २१ टक्के आणि मराठवाड्यात सरासरीच्या २५ टक्के असेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. जुलै आणि ऑगस्टमध्ये राज्यात सर्वत्र जोरदार वृष्टी होईल, असेही भाकीत करण्यात आले आहे. यंदा पावसाची लक्षणे लवकर दिसू लागली असून १० जूनपर्यंत मान्सून कोकणात दाखल होईल, असा अंदाज आहे. कोकणातील प्रशासकीय व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांनी जुलै ऑगस्टमध्ये अधिक जागरूक राहण्याची गरज आहे.**

**डॉ. श्रीकांत कार्लेकर**

दरवर्षी एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला होणाऱ्या पावसामुळे 'मान्सून' या विलक्षण शिस्तबद्ध आणि अवाढव्य अशा हवामान यंत्रणेची चाहूल लागते आणि जूनपासून येणाऱ्या पावसाचा अंदाज घेणे शक्य होते. अजूनही अनाकलनीय असलेल्या मान्सून या महाकाय नैसर्गिक यंत्रणेची दरवर्षी होणारी सुरुवात पाहणे फारच उपयुक्त असते. यातून नैसर्गिक आपत्ती, कृषी व्यवसाय आणि देशाचे सर्वसाधारण अर्थकारण यांचा अंदाज घेता येतो. हे अंदाज आणि घडणाऱ्या घटनांची वर्तवलेली शक्यता नेहमीच अचूक असते असे नाही. कारण यंत्रणा कितीही शिस्तबद्ध असली तरीही नैसर्गिक बदलांमुळे त्यात अनिश्चिततेचे प्रमाणही तेव्हढेच मोठे आहे.

### मान्सूनची चाहूल

हिमालयामुळे उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेस अटकाव होतो आणि एप्रिलपासून





भारतभर उष्णतेचा प्रकोप वाढू लागतो. उच्च तपाम्बर तुलनेने जास्त उष्णता असलेले प्रदेश, बंगालच्या उपसागराच्या दक्षिण भागात, तिबेट पठार आणि आशियातील अनेक द्वीपकल्पीय भागांच्या टोकास तयार होतात. बंगालच्या उपसागरावर ६ ते १६ किमी उंचीवर, १०० ते ५०० मिलिबार वायुभार प्रदेशात हा प्रकार आढळतो. याउलट दक्षिण हिंदी महासागरावर कमी उष्णतेचा उच्चभार प्रदेश तयार झालेला दिसतो. या भागातून उत्तरेकडे मान्सून वारे वाहू लागतात.

मे महिन्यापर्यंत नैऋत्य मान्सून श्रीलंकेवर तयार होतो. मे महिन्यातच ४००० मीटर उंचीवरील तिबेटमध्ये हवा जमिनीवरून होणाऱ्या उष्णता उत्सर्जनामुळे तापू लागते. या भागात ६००० मीटर उंचीवर वाऱ्यांची प्रत्यावर्ती संरचना तयार होते व उत्तर भारतात, उच्च तपाम्बरात वेगवान पूर्वीय वारे वाहू लागतात. समशीतोष्ण कटिबंधातील जेट प्रवाह अचानक त्याचा मार्ग बदलून या प्रत्यावर्ताच्या उत्तरेकडे सरकतो. पश्चिमी जेट प्रवाह आणि पूर्वीय वारे यांची, तापमानाचे उभे वितरण व वायुभाराचा ६०० ते ३०० मिलिबारमधील कल यात सरमिसळ होते आणि याचवेळी या भागात त्याच्यापासून १५०० किमी. दक्षिणेला येऊ घातलेल्या मान्सूनची चाहूल लागते. या घटनेत असलेल्या क्रमबद्ध संबंधांचे नेमके ज्ञान अजूनही आपल्याला झालेले नाही. पश्चिम घाटाच्या वाताभिमुख बाजूवर २००० ते ५००० मिमी पाऊस पडतो. बाष्पयुक्त हवा जमिनीवर येताच सांद्रीभवनामुळे हजारो मीटर उंचीच्या, प्रचंड मोठ्या क्युम्युलोनिम्बस ढगांची निर्मिती होते. वातविन्मुख बाजूवर ४०० ते ५०० मिमी प्रमाणावर पडणाऱ्या पावसात, जमिनीच्या उंचसखलपणामुळे कमी–अधिक बदल सातत्याने होत राहतात. मान्सूनच्या हवेत जुलै आणि ऑगस्टमध्ये लघुभार अधिक तीव्रतेने आढळतो. महिन्यातून एक दोन वेळा तरी ही परिस्थिती दिसून येतेच.

अशा तऱ्हेने दरवर्षी तयार होत असलेल्या या विस्मयकारी यंत्रणेचा मागोवा घेणे भारतासारख्या कृषिप्रधान देशाला नेहमीच गरजेचे असते. त्यामुळेच त्याची लागणारी चाहूल, हवामान शास्त्रज्ञांच्या दृष्टीने दरवर्षी फार महत्त्वाची ठरते. तशा सूचना मार्च–एप्रिलसारख्या मान्सून पूर्व महिन्यापासूनच आपल्याला मिळू लागतात. त्यामुळेच मार्च–एप्रिलसारख्या मान्सून पूर्व महिन्यापासूनच विषुववृत्तीय प्रदेश आणि भारताच्या आजूबाजूच्या विशाल भूप्रदेशावर होणाऱ्या हवामान बदलाचा, बारकाईने अभ्यास केला तर जूनमध्ये आगमन होणाऱ्या मान्सून यंत्रणेचा थोडाफार तरी अंदाज करता येणे शक्य होते.

## पावसाची प्रदेशवार अनियमितता

मान्सूनमध्ये आढळणारे पावसाचे वितरण वैशिष्ट्यपूर्ण असते. पावसाचे आगमन ही सध्या फार विलंबित प्रक्रिया असल्याचे दिसून येत आहे.




आगमन काळात पाऊस मुसळधार वृष्टीच्या स्वरूपात होतो. ऑगस्टमध्ये हे प्रमाण एकदम कमी होते. सप्टेंबरमध्ये सामान्यपणे रिमझिम स्वरूपात तर कधी मुसळधार वृष्टी होते. ऑक्टोबरमधला पाऊस जमिनीतील आर्द्रता वाढवण्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा असतो.

महाराष्ट्रात किनाऱ्याकडून सह्याद्रीच्या दिशेने पाऊस ज्या गतीने वाढत जातो त्यापेक्षाही जास्त वेगाने तो सह्याद्रीकडून पूर्वेकडे कमी होत जातो. सह्याद्रीच्या जास्त पर्जन्याच्या म्हणजे ४ हजार ते ६ हजार मिमी. पर्जन्य प्रदेशाच्या पूर्वेकडे शंभर किमी. पट्ट्यातच पाऊस झपाट्याने कमी होतो व त्याचे प्रमाण ५०० मिमी. इतके होते. सह्याद्री खऱ्या अर्थाने त्याचा पर्जन्य प्रदेश तयार करतो. लोणावळ्यात ४३०० मिमी. पडणारा पाऊस त्याच्या पूर्वेस २५ किमी.वर असलेल्या वडगाव इथे ११०० मिमी., ६० किमी.वर पुण्यात ६६० मिमी. तर त्यापुढे जेजुरी, बारामती, अकलूज, फलटण इथे केवळ ५०० मिमी. असा कमी होत जातो. पूर्व विदर्भाच्या दिशेने पुन्हा एकदा पर्जन्यमानात थोडीफार वाढ होते. इथे ८०० ते ९०० मिमी. इतका पाऊस होतो. म्हणजेच राज्यभरात पर्जन्यालेख हा खूपच अनियमितता दाखवतो.

यंदा राज्यात कोकण विभागात दरवर्षीपेक्षा यंदा २७ टक्के जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. जुलै आणि ऑगस्टमध्ये राज्यात सर्वत्र जोरदार वृष्टी होईल, असेही भाकीत करण्यात आले आहे. यंदा पावसाची लक्षणे लवकर दिसू लागली असून १० जूनपर्यंत मान्सून कोकणात दाखल होईल, असा अंदाज आहे. कोकणातील प्रशासकीय व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांनी जुलै–ऑगस्टमध्ये अधिक जागरूक राहण्याची गरज आहे.

## एल निनो–ला नीना

संपूर्ण देशात यंदा १०६ टक्के पाऊस पडेल असा भारतीय हवामान खात्याचा अंदाज आहे. त्याचे मुख्य कारण 'एल निनो' दुर्बल होऊन 'ला नीना' जास्त सक्रिय होण्याची शक्यता आहे. 'एल निनो' ही एक चक्रीय घटना असून काही वर्षांच्या अंतराने ती पुन्हा पुन्हा कार्यरत होते. ही यंत्रणा ७ वर्षातून एकदा कार्यरत होते असे पूर्वी वाटत होते. मात्र नवीन संशोधनानुसार व हवामानाच्या सातत्याने घेतलेल्या आकडेवारीनुसार आता असे लक्षात येते आहे की, ही घटना ४ ते ५ वर्षातून एकदा घडते आहे. या चक्रीय घटनेत सातत्य आढळत नसल्यामुळे तिचे भाकीतही नेमकेपणाने करता येत नाही.

'एल निनो'मुळे समुद्रपृष्ठावरील तापमान बदल विषुववृत्तापासून उत्तरेला व दक्षिणेला साडेसात अंश अक्षांश प्रदेशात आढळते. नेहमीपेक्षा तापमान ३ अंश सेल्सियसने वाढते. कमी भाराच्या पूर्वेकडील सरकण्यामुळे, प्रशांत महासागराच्या पश्चिमेकडे ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, आफ्रिका व भारतात दुष्काळसदृश परिस्थिती उद्‌भवते. भारतात मौसमी पाऊस पुढे जातो किंवा खूप कमी पडतो. ला नीना हा प्रवाह एल निनोच्या बरोबर विरुद्ध स्वरूपाचा असून त्यामुळे आग्नेय आशियात नेहमीपेक्षा जास्त पाऊस पडतो.

**(लेखक हे भूशास्त्र अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ०९७६४७६९७९१**

राज्य शासनाने येणाऱ्या खरीप हंगामासाठी कंबर कसली असून शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यातील दुष्काळग्रस्त भागांसह सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या कायम संपर्कात असून शेतकऱ्यांच्या कर्जांचे पुनर्गठन, जलयुक्त शिवार योजनेचा आढावा, टँकरची उपलब्धता, शेततळे योजनेला प्रोत्साहन, चारा छावणींतील चाऱ्याची उपलब्धता, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजना, मनरेगा, सिंचन



# सरकार पाठीशी, यंत्रणा सज्ज

**विहिरींची निर्मिती, पेरणीसाठी बियाणे आणि खतांची उपलब्धता यासंदर्भात दररोज आढावा घेत आहेत. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे महाराष्ट्रातील विविध जिल्हाधिकाऱ्यांशी त्यांचा संपर्क सुरू आहे. हवामान खात्याने यावर्षी भरपूर पावसाचा अंदाज व्यक्त केला असून राज्य शासन शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सज्ज आहे.**

### कृषी उत्पादन वाढीचे धोरण

मागील वर्षी मूल्यवर्धित साखळीसाठी शेतकऱ्यांचे संघटन करण्यात आले. यामध्ये १ लाख २० हजार ३२६ शेतकरी गट स्थापन करण्यात आले. राज्यात २०१६-१७ या वर्षात कृषी उत्पादन वाढीचे धोरण ठरवण्यात आले असून पुढील पाच वर्षात शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. या माध्यमातून प्रत्येक शेतीला ओलावा, पाण्याच्या प्रत्येक थेंबातून अधिकाधिक उत्पादन, जमिनीची सुपीकता वाढवणे, उत्पादन खर्चात बचत करणे, पीक विम्यासाठी शेतकऱ्यांचा सहभाग वाढवणे, उत्पादन मूल्यवर्धित व पणन व्यवस्था करणे, पीक कर्जाचे प्रभावी वाटप करणे आदी बाबींचा यात समावेश आहे.

**राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. यासाठी शेतकऱ्यांना हवामानाचा अचूक अंदाज दिला तर होणाऱ्या पिकांचे नुकसान थांबवू शकतो. याकरिता कर्नाटक राज्याच्या धर्तीवर अचूक हवामान अंदाज देणारे ऑटोमॅटिक वेदर स्टेशन उभारण्याचा राज्य शासनाचा विचार आहे.**

**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**



### मृद आरोग्य पत्रिकांचे वितरणाचे उद्दिष्ट

जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत मृद आरोग्य पत्रिका योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. राज्यात एकूण १.३७ कोटी खातेदार आहेत. सन २०१५-१६ मध्ये ९.७ लाख मृद नमुने घेण्यात आले असून देशात सर्वाधिक ३२.२७ लाख शेतकऱ्यांना मृद आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात आले आहे. सन २०१६-१७ मध्ये १८.२२ लाख मृद नमुने घेणे व ९१.५० लाख शेतकऱ्यांना मृद आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सन २०१६ हे आंतरराष्ट्रीय कडधान्य वर्ष घोषित करण्यात आले आहे. या अनुषंगाने राज्यात कडधान्य उत्पादन वाढीसाठी उत्पादन खर्च कमी करून, नफ्याची शेती करण्याबाबतचे मार्गदर्शन करण्यात येत असून शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा; असे आवाहन करण्यात आले आहे.

### ८० टक्के शेतकऱ्यांना मे-२०१६ अखेर कर्ज वितरण व कर्जाचे पुनर्गठन

नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत आलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पीक कर्जाच्या पुनर्गठनाचा निर्णय शासनाने घेतला होता. त्यानुसार पुनर्गठित केलेल्या खरीप-२०१४ च्या पीक कर्जाच्या पहिल्या हप्त्यास एक वर्ष मुदतवाढ, खरीप-२०१५ च्या पीक कर्जाचे पुनर्गठन करून व्याज शासनातर्फे देणे आणि विशेष बाब म्हणून २०१२-१३ व २०१३-१४ या दोन वर्षातील पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याचा निर्णय मंत्रिपरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयांमुळे २१ लाखाहून अधिक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्या जवळपास ११ हजार कोटी रुपयांच्या कर्जाचे पुनर्गठन झाले आहे.

येणाऱ्या पावसाळ्यासाठी सध्या राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन शाखेने तयारी केली असून कुठल्याही अघटिताचा सामना करण्यास

**दुष्काळ निवारण व जागतिक तापमानवाढीच्या पार्श्वभूमीवर 'शाश्वत विकास' करणे गरजे आहे. मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात गेल्या तीन वर्षापासून दुष्काळसदृश परिस्थिती आहे. त्यावर शासन विविध उपाययोजना राबवत आहे. राज्यात कोरडवाहू शेती अभियान, पीक पद्धतीत बदल यावर अधिक भर देऊन शेतकऱ्याला आधार दिला पाहिजे. केंद्र शासनाने प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी सुरू केली आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान भरपाईची किंमत मिळणार आहे. तसेच शालेय अभ्यासक्रमामध्ये आपत्ती व्यवस्थापनाचा समावेश करून प्रशिक्षण दिले तर अधिक जागरूकता वाढेल,**

**– मदत व पुनर्वसन मंत्री एकनाथराव खडसे**



राज्य शासन तत्पर असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

सध्या राज्य आपत्ती कार्य केंद्र / मंत्रालय नियंत्रण कक्ष हे मंत्रालयातील मुख्य इमारतीच्या पहिल्या मजल्यावर २४ तास सुरू आहे. राज्य आपत्ती कार्य केंद्रामध्ये आणि जिल्हा आपत्ती कार्य केंद्राची उभारणी करण्यास राज्य कार्यकारी समितीने मान्यता दिली आहे.



**मान्सून २०१६**

### विदर्भ मराठवाड्यासाठी ९ हजार २०० कोटींचा निधी

राज्यातील आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील सुमारे १३२ जलसिंचनविषयक प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ७ हजार २०० कोटी रुपये तर इतर दुष्काळग्रस्त भागातील जलसिंचनाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी २ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास केंद्रीय जलसंपदा

# आपत्ती निवारणासाठी यंत्रणांचे समन्वय

हवामान खात्याने राज्यात या वर्षी किमान सरासरीइतका किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे. राज्यातील टंचाई परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आणि कृषी क्षेत्राच्या दृष्टीने ही निश्चित आनंदाची बाब आहे. पण त्याबरोबरच पावसाच्या कालावधीत आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने राज्यातील सर्व यंत्रणांनी सज्ज असणे गरजेचे आहे. पावसाळ्यात आपत्तीच्या काळात सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यभरात मान्सूनपूर्व तयारीसाठी करावयाच्या उपाययोजनांसदर्भात आढावा घेण्यासाठी सह्याद्री राज्य अतिथिगृह येथे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक झाली, त्या वेळी ते बोलत होते. बैठकीला मदत आणि पुनर्वसन विभागाचे राज्यमंत्री दिलीप कांबळे, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित आणि सैन्य दल, नौदल, वायुसेना, मध्य रेल्वे, तटरक्षक दल, महापालिका, प्रादेशिक हवामान विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



**राज्य आपत्ती व्यवस्थापन आराखडा आणि धोरण पुस्तिकेचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. या वेळी राज्यमंत्री दिलीप कांबळे, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, मुख्यमंत्र्यांचे सचिव मिलिंद म्हैसकर उपस्थित होते.**

### नाले सफाईस सर्वोच्च प्राधान्य

यावेळी मुख्यमंत्र्यांनी पुढील सूचना केल्या, पावसाळ्यात मुंबई शहरात उपनगरीय रेल्वे कोणत्याही परिस्थितीत बंद पडता कामा नये, या दृष्टीने नियोजन करण्यात यावे. यासाठी रेल्वे आणि एमएमआर रिजनमधील सर्व महापालिकांनी समन्वयाने काम करावे. नालेसफाईच्या कामास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. समुद्रात उंच लाटा आणि त्याच दिवशी मोठ्या पावसाचा अंदाज असल्यास विशेष दक्षता घेण्यात यावी. हवामान खात्याने या बाबतीत अधिक अचूक माहिती द्यावी, जेणेकरून संबंधित यंत्रणांना चांगल्या प्रकारे नियोजन करता येईल. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने सर्व प्रशासकीय यंत्रणांनी अधिक अचूक अशा माहितीपुस्तिका तयार करून घ्याव्यात. आपत्तीच्या काळात लोकांपर्यंत लवकरात लवकर माहिती पोहोचवण्याच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात यावा.

यंदा पावसाळ्यात राज्यातील धरणांमधील पाण्याचे चोख व्यवस्थापन करण्यात यावे. यासाठी आंतरविभागीय तसेच आंतरराज्यीय समन्वयावर भर देण्यात यावा. धरणाच्या पाण्यामुळे एखाद्या भागात पूर परिस्थिती निर्माण होणार नाही, या दृष्टीने दक्षता घेण्यात यावी. राज्यातील अनेक डोंगराळ आणि दुर्गम भागात मोठ्या पावसाच्या काळात अनेक गावांचा संपर्क तुटतो. अनेक भागात वीज पुरवठ्यात अडथळे येतात. अशा गावांपर्यंत मदत पोहोचवणे व अशी गावे लवकरात लवकर संपर्कात आणण्यासाठी प्राधान्याने उपाययोजना कराव्यात, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली.

### आपत्ती निवारणासाठी सर्व सुविधा

मुख्य सचिव श्री. क्षत्रिय यांनी यावेळी स्पष्ट केले की, पावसाळ्याच्या काळातील आपत्ती निवारणासाठी पूर्व प्रशिक्षणे, मॉक ड्रिल, पूर्व सूचना यंत्रणा, तात्पुरते निवारे, अन्न व औषधांची मुबलक उपलब्धता, हॅम रेडिओ ऑपरेटर्स अशा विविध यंत्रणा उपलब्ध करण्यावर आणि उपाययोजनांवर प्राधान्याने भर द्यावा. धरणांमधील पाणी अडविणे किंवा सोडणे यासाठी शेजारचे जिल्हे, राज्ये यांच्याशी समन्वय ठेवून व्यवस्थापन करण्यावर भर देण्यात यावा, जेणेकरून त्यामुळे राज्याच्या कोणत्याही भागात पूर परिस्थिती उद्भवणार नाही.

मंत्री उमा भारती, केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी नुकतीच मान्यता दिली आहे. मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात केलेली मागणी तातडीने मान्य करून आत्महत्याग्रस्त आणि दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून त्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र शासन हा निधी उपलब्ध करून देईल, असे श्रीमती उमा भारती यांनी सांगितले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी त्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

### पाईपलाईनद्वारे सिंचन वितरण

सिंचनासाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा वापर कार्यक्षमतेने करून, अधिकाधिक क्षेत्र सिंचनाखाली आणण्याबरोबरच कालव्यांसाठी येणारी जमीन अधिग्रहणाची समस्या सोडवण्यासाठी, पारंपरिक वितरण प्रणालीमध्ये बदल करण्याची आवश्यकता होती. त्यानुसार तयार करण्यात आलेल्या नलिका वितरण प्रणालीच्या धोरण मसुद्यास मान्यता देण्यात आली. कालव्याऐवजी पाइपलाइनद्वारे आता सिंचनासाठी पाणीपुरवठा करण्याचा शासन विचार करत असून, या दृष्टीने टाकलेले हे पाऊल आहे.

जलतज्ज्ञांच्या मते येणाऱ्या काळामध्ये जमीन अधिग्रहणापासून पाण्याची हेळसांड होणे आणि शेवटच्या टप्प्यापर्यंत पाणी सिंचनाला न पोहोचणे यासाठी हा नवा प्रयोग रामबाण उपाय ठरणार आहे.

### टंचाई परिस्थिती आणि उपाययोजना

गेल्या काही वर्षांपासून कमी झालेले पावसाचे प्रमाण आणि त्यातून निर्माण झालेल्या टंचाईच्या परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनाने कंबर कसली आहे. राज्यात २० मे २०१६ पर्यंत सुमारे ३७९८ गावात, ६२१७ वाड्यांवर एकूण ४८८३ टँकर सुरू होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः टंचाईवर केलेल्या उपाययोजनांचा दैनंदिन आढावा घेत आहेत.

मराठवाड्यात सुमारे २५०३ गावात, ९२२ वाड्यांवर ३३३८ टँकर सुरू होते. तसेच कोकण विभागात ७६, नाशिक विभागात ९१२, पुणे विभागात ३५४, अमरावती विभागात १९१ टँकरने पाणी पुरवठा सुरू होता. मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्यात पाणी टंचाई निर्माण झाली आहे. ती दूर करण्यासाठी मराठवाड्याला हक्काचे पाणी देण्यासाठी शासनाचे जोमाने प्रयत्न सुरू आहेत. यासाठी केंद्र शासनाकडून मदत मिळावी यासाठी मुख्यमंत्री सातत्याने पाठपुरावा करत आहेत.

### टंचाईग्रस्त भागात सर्वोच्च प्राधान्याने उपाययोजना

लोकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणार नाही, यासाठी प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्याने उपाययोजना राबवण्यात येत आहेत. टंचाई परिस्थितीत विविध उपाययोजना करता येण्यासाठी जिल्हा प्रशासनाला सर्वाधिकार देण्यात आले असून त्याचा उपयोग जनतेला दिलासा देण्यासाठी करावा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यांतील जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

दुष्काळग्रस्त जिल्ह्यात टंचाई निवारणासाठी करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांसंदर्भात मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे आढावा घेतला. या व्हिडिओ कॉन्फरसिंगमध्ये कृषी तथा मदत आणि पुनर्वसन मंत्री एकनाथराव खडसे

## बी-बियाणांची उपलब्धता

**राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व बैठक २०१६ नुकतीच मुंबई येथे झाली. कृषी व फलोत्पादन विभागाकडून खरीप हंगामाच्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. गतवर्षी सरासरीच्या ५९ टक्के पाऊस झाला. या वर्षी सर्वसाधारणपणे १०६ टक्के पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला.**

**खरीप हंगाम २०१६-१७ करिता राज्यात पुरेसे बियाणे उपलब्ध आहे. या वर्षी १४.९९ लाख क्विंटल बियाणांची गरज आहे. यापैकी १७.९० लाख क्विंटल बियाणांची उपलब्धता करण्यात आली आहे. तसेच बी.टी. कापूस बियाणांची मागणी १६० लाख पाकिटे असून २०० लाख पाकिटे उपलब्ध आहेत. राज्यात सोयाबीनचे अपेक्षित क्षेत्र ३९ लाख हेक्टर असून यासाठी २९.२५ लाख क्विंटल बियाणांची गरज असून बियाणे बदल (३० टक्के) नुसार बियाणाची गरज ८.७७ लाख क्विंटल आहे. यापैकी ११.०६ लाख क्विंटल बियाणाची उपलब्धता करण्यात आली आहे. सोयाबीन बियाणाची उपलब्धता महाबीज ४.०४ लाख क्विंटल, राष्ट्रीय बीज निगम १.०५ लाख क्विंटल, खाजगी कंपन्यांकडून ५.९८ लाख क्विंटल करण्यात आली आहे. याशिवाय युरियाचे ०.५० लाख मे टन राखीव आवंटन केंद्र शासनाने मान्य केले आहे.**

**राज्यामध्ये आपत्कालीन पीक नियोजन आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये आयसीएआर व सीआरआयडीए या संस्थांच्या मार्गदर्शनानुसार आपत्कालीन नियोजन व जिल्हानिहाय पीक नियोजन आराखडा तसेच आपत्कालीन परिस्थितीमध्ये बियाणेबाबत नियोजन आराखडा तयार करण्यात आला आहे.**








## मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांच्याकडून मांजरा प्रकल्पास भेट व पाहणी



लातूर, केज, अंबाजोगाई आणि कळंब परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा प्रकल्पाला राज्याचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांनी भेट देऊन पाहणी केली. या वेळी विभागीय आयुक्त डॉ. उमाकांत दांगट, बीडचे जिल्हाधिकारी नवल किशोर राम, लातूरचे जिल्हाधिकारी पांडुरंग पोले आणि उस्मानाबादचे जिल्हाधिकारी डॉ. प्रशांत नारनवरे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मांजरा प्रकल्पामध्ये सुमारे साडेपाच मीटर गाळ जमा झालेला असल्याची वस्तुस्थिती लक्षात येताच, श्री. क्षत्रिय यांनी प्रकल्पातील गाळ काढण्याचे नियोजन करावे, अशी सूचना संबंधित अधिकाऱ्यांना केली. गाळ काढण्यासाठी आवश्यक ती यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्यात यावी. काढलेला गाळ शेतकरी स्वखर्चाने आपल्या शेतात टाकण्यासाठी नेतील व त्यामुळे शेती उत्पादनातही शेतकऱ्यांना चांगला फायदा होईल, अशी अपेक्षा श्री. क्षत्रिय यांनी यावेळी व्यक्त केली.

जळगाव येथून सहभागी झाले होते. चारा टंचाई, टँकरने पाणीपुरवठा, जलयुक्त शिवार अभियानातील प्रलंबित तसेच नवीन कामे, मागेल त्याला शेततळे, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना करण्यात आलेली मदत, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजना, मनरेगा, सिंचन विहिरींची निर्मिती आदी विविध बाबींचा यावेळी मुख्यमंत्र्यांनी सविस्तर आढावा घेतला.

### टंचाईग्रस्त जिल्ह्यात चारा छावण्या

कमी पर्जन्यमानामुळे चारा टंचाईचा प्रश्न निर्माण झाला आहे. जनावरांना पिण्याचे पाणी आणि चारा मिळणे अवघड झाल्याने राज्य शासन पशुधनासाठी अनेक उपाययोजना करत आहे.

या चारा छावण्यांचा ४,०७,४७७ जनावरांना लाभ होत आहे. जनावरांचा चारा आणि पाणी यासंबंधी सतर्क राहण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. चारा छावण्यांमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळत आहे. मराठवाड्यासह राज्याच्या ज्या भागात पाणीटंचाई आहे, त्या ठिकाणच्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि चाऱ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हा प्रशासनाला काळजीपूर्वक नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

### प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना

सन २०१५-१६ पासून सूक्ष्म सिंचन योजना 'प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना' या केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेमध्ये समाविष्ट केली आहे. प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतास पाण्याची उपलब्धता करणे आणि पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळवणे हा या योजनेचा उद्देश आहे.

सन २०१४-१५ पर्यंत केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना ८०:२० (केंद्र ८० टक्के व राज्य २० टक्के) या प्रमाणात राबवण्यात येत होती. केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजनेची अंमलबजावणी करताना केंद्र व राज्य हिश्श्याच्या अर्थसाहाय्याचे प्रमाण ६०: ४० निश्चित केले आहे.

**योजनेची व्याप्ती:** राज्यातील सर्व ३४ जिल्ह्यांमध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन योजना राबवण्यात येत आहे.

**योजनेची उद्दिष्टे:**

- आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्रात वाढ करणे.
- जलवापर कार्यक्षमतेत वाढ करणे.
- कृषी उत्पन्नात वृद्धी करणे.
- समन्वयित पद्धतीने विविध योजनांची अंमलबजावणी करणे
- आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कृषी व फलोद्यानाचा विकास करण्यासाठी सूक्ष्म सिंचन पद्धतीचा विकास.
- कुशल व अर्धकुशल बेरोजगारांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

**योजनेत अंतर्भूत घटक:**

- **ठिबक सिंचन:** इनलाइन, ऑनलाइन, सबसरफेस, मायक्रोजेट.
- **तुषार सिंचन:** मायक्रो स्प्रिंकलर, मिनी स्प्रिंकलर, पोर्टेबल स्प्रिंकलर व रेनगन.

**अनुदान मर्यादा:**

- अवर्षणप्रवण क्षेत्रातील अल्प व अत्यल्प भूधारक-६० टक्के
- अवर्षणप्रवण क्षेत्रातील सर्वसाधारण भूधारक-४५ टक्के
- अवर्षणप्रवण क्षेत्राबाहेरील अल्प व अत्यल्प भूधारक-४५ टक्के
- अवर्षणप्रवण क्षेत्राबाहेरील सर्वसाधारण भूधारक-३५ टक्के

**संप्रदा बीडकर, गजानन पाटील**





वाशिम जिल्ह्यातील लोकसहभागातून साकारण्यात आलेल्या तामसी येथील तळ्याची पाहणी करताना जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह

# पाणीदार गावाच्या दिशेने...

**वाशिम जिल्ह्यात असलेल्या तामसी गावातील ग्रामस्थांनी एकजूट करून अवघ्या ४४ दिवसांत सुमारे पाच कोटी लीटर क्षमतेच्या तळ्याची निर्मिती केली आहे. दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या तामसीकरांनी लोकसहभागातून साकारलेले हे तळे सर्वत्र कौतुकाचा विषय ठरत आहे. पूर्णतः लोकसहभागातून निर्माण झालेल्या या तळयामुळे पुढील वर्षी या गावातील पाणी टंचाई दूर होण्यास मदत होणार असून 'पाणीदार गाव' अशी तामसीची नवी ओळख निर्माण होणार आहे.**

**तानाजी घोलप**

वाशिम शहरापासून ८ किमी. अंतरावर तामसी हे साडेतीन हजार लोकवस्तीचे गाव. गत काही वर्षात अपुरा पाऊस आणि भूजल पातळी खालावल्याने तामसीला दुष्काळाचा सामना करावा लागत होता.

गत पाच वर्षांपासून उन्हाळ्यामध्ये या गावाला पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी प्रशासनाला ३-४ विहिरींचे अधिग्रहण करावे लागत होते. तरीही पुरेसे पाणी उपलब्ध होऊ शकत नसल्याने गावातील महिलांना, मुलांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत होती. मात्र यंदा पाण्याच्या समस्येने उग्र रूप धारण केले आणि यातून एकजूट होऊन या जलसंकटावर मात करण्याचा विचार समोर आला. त्यासाठी गावातील काही मंडळींनी पुढाकार घेऊन ग्रामस्थांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. प्रत्येकाच्या घरी जाऊन चर्चा करण्यात आली. गावातील प्रतिष्ठित मंडळी, नेते मंडळी यांच्या उपस्थितीमध्ये बैठकांवर बैठका झाल्या. अखेर गावाच्या पूर्वेला असलेल्या ग्रामपंचायतीच्या मालकीच्या ई-वर्ग जागेवर तळे खोदण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. या कामी गावातील प्रत्येकाने सहभाग नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले. गेल्या काही वर्षांपासून दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या ग्रामस्थांनी गावाला 'पाणीदार' बनवण्यासाठी एकजूट दाखवली. सगळा गाव एकदिलाने उभा राहिला. ज्या ठिकाणी तळे खोदण्याचे निश्चित झाले होते, त्या ई-वर्ग जागेवर असलेले अतिक्रमणही संबंधितांनी स्वतःहून काढून घेतले आणि तळे निर्मितीच्या कामाचा मार्ग मोकळा झाला.

१६ जानेवारी २०१६ रोजी तळ्याच्या कामाचे भूमिपूजन झाले आणि १७ जानेवारी २०१६ रोजी प्रत्यक्ष खोदकामाला सुरुवात झाली. पहिल्या दिवसापासूनच रोज गावातील ३०० लोकांनी श्रमदानास सुरुवात केली. २५० फूट लांब व तितक्याच रुंदीचे तळे खोदण्याचे काम वेगाने सुरू झाले. कठीण खडक लागल्याने खोदकामासाठी मशीनची आवश्यकता जाणवू लागली. मात्र त्यासाठी पैसा कसा उभारणार? हा प्रश्न निर्माण झाला. सुरुवातीला गावातील २० शेतकरी गटांकडून वर्गणी



जमा करण्यात आली आणि काम सुरू झाले. त्यानंतर गावामध्ये हनुमान मंदिर उभारण्यासाठी जमा करण्यात आलेली साडेतीन लाख रुपये लोकवर्गणी तळ्याच्या निर्मितीसाठी वापरण्याचा निर्णय गावकऱ्यांनी घेतला. जमा झालेल्या लोकवर्गणीतून दोन जेसीबी मशीन, एक टूटेन मशीन व सहा टिपरच्या साहाय्याने खोदकामास सुरुवात झाली.

प्रत्येकाने आपल्या ऐपतीनुसार पैसे जमा केले. लहान मुलांनी आपल्या खाऊचे, तर युवकांनी आपल्या मोबाइल रिचार्जचे पैसे लोकवर्गणीसाठी दिले. विशेष म्हणजे गावातील काही महिलांनी आपल्या मंगळसूत्रातील सोन्याचे मणी वर्गणी म्हणून सुपुर्द केले. बघता-बघता सुमारे ९५ लाख रुपये लोकवर्गणी जमा झाली. तळे खोदण्यासाठी जेसीबी मशीन, टिपर आदींसह तळ्याच्या इनलेट-आऊटलेट व इनलेटच्या बाजूला गॅबीयन बंधाऱ्याच्या बांधकामासाठी हा निधी खर्च झाला. अखेर २५० फूट लांब, २५० रुंद आणि २६ फूट खोल आकाराचे भव्य तळे पूर्णतः लोकसहभागातून साकारण्याची किमया तामसीकरांनी साधली.

### तळे बनले 'लोकरंग जलमंदिर'

गावकऱ्यांच्या घामातून साकारलेल्या या तळ्याचे पावित्र्य कायम राहावे आणि त्याचे महत्त्व अधोरेखित व्हावे, यासाठी या तळ्याचे 'लोकरंग जलमंदिर' असे नामकरण करण्यात आले आहे. या तळ्याच्या बाजूला मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व बगिचा लागवड करून अधिक सुशोभित करण्यात येणार आहे. प्रख्यात जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह यांनी या तळ्याची पाहणी केली व तामसीकरांचे कौतुक केले. तीन कोटी लीटर साठवण क्षमता असलेले आणखी एक तळे खोदण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला असून या तळ्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली असल्याचे येथील डॉ. सुधीर कव्हर यांनी सांगितले.

### तामसीचे शिवार होणार 'जलयुक्त'

राज्य शासनामार्फत सुरू करण्यात आलेल्या जलयुक्त शिवार अभियानात सन २०१६-१७ करिता तामसी गावाचा समावेश करण्यात आला आहे. या अभियातील प्रत्येक काम स्वतः सहभागी होऊन पूर्ण करून घेण्याचा निर्धार तामसीकरांनी केला आहे. जलयुक्त शिवार अभियानाची कामे पूर्ण झाल्यानंतर तामसीचे संपूर्ण शिवार 'जलयुक्त' बनणार आहे.



मान्सून २०१६

**(लेखक हे वाशिम येथे माहिती साहाय्यक आहेत.) संपर्क : ०९५६१८५०७७१**



''जलयुक्त शिवार अभियानासाठी मागील वर्षी निवडण्यात आलेल्या ६ हजार २०२ गावांमध्ये कोणत्याही परिस्थितीत जलसंधारणाची उर्वरीत कामे पूर्ण करुन येत्या पावसाळ्यात ही सर्व गावे जलस्वयंपूर्ण होतील यादृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत. याशिवाय चालू वर्षासाठी निवडण्यात आलेल्या ५ हजार २५४ गावांमधील जलसंधारणाच्या कामांनाही गती देण्यात आली आहे. जलयुक्त शिवारची कामे तांत्रिकदृष्ट्या निर्दोष होतील यावर भर देण्यात येत आहे. या अभियानासाठी आतापर्यंत साधारण २ हजार ६०० कोटी रुपयांचा निधी जिल्हाधिकाऱ्यांकडे वितरीत केला आहे. या योजनेसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. ''

**– पंकजा मुंडे, ग्रामविकास मंत्री**

### जलयुक्त शिवार अभियानाची महाराष्ट्रातील सद्य:स्थिती

**मागील वर्षी निवडलेली गावे –** ६ हजार २०२
**यापैकी १०० टक्के पूर्ण झालेली गावे –** २ हजार ८००
**८० टक्के पूर्ण झालेली गावे –** १ हजार ८००
जलसंधारणाची साधारण १ लाख ७३ हजार २४१ कामे पूर्ण, याशिवाय ३५ हजार ८८८ कामे प्रगतिपथावर.
चालू वर्षी म्हणजे २०१६-१७ मध्ये निवडण्यात आलेल्या
**नवीन गावांची संख्या –** ५ हजार २५४
**निर्मिती पाणीसाठा क्षमता –** ६ लाख ८८ हजार ५९६.९१ टीसीएम

### प्रभावी अंमलबजावणी

- मागेल त्याला शेततळे योजनेच्या प्रभावी अंमल बजावणीसाठी https://aaplesarkar.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ कार्यान्वित.
- या योजनेच्या लाभासाठी १ लाख १५ हजार ४६५ ऑनलाइन अर्ज प्राप्त. २० हजार ६०६ शेततळ्यांसाठी कार्यारंभ आदेश निर्गमित. उर्वरीत अर्जांचीही तातडीने छाननी करून कार्यारंभ आदेश देण्याचे स्थानिक प्रशासनाला शासनाचे निर्देश.

**संकलन : इर्शाद बागवान (विभागीय संपर्क अधिकारी)**

**छत्रपती शिवाजी महाराज हे शूरवीर लढवय्ये तर होतेच, मात्र त्यांचा जलव्यवस्थापनेबद्दलही कटाक्ष होता. या महापुरुषाने ३०० वर्षांपूर्वी दुष्काळामध्ये पाण्याचे नियोजन कसे करावे याचा वस्तुपाठ घालून दिला होता. त्यांच्या जलव्यवस्थापनेत पावसाच्या पाण्याच्या साठवणुकीला अत्यंत महत्त्व होते. वर्षभर पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी त्यांनी गडावर दगडांमध्ये मोठे हौद निर्माण केले होते. गडावरचे झरे आटल्यानंतरही या दगडी हौदातील विनाझऱ्याच्या पाण्याचा कसा वापर करावा, याचा दंडक त्यांनी घालून दिला होता. त्यांच्या या जलसंवर्धनाच्या कार्याचा घेतलेला हा धांडोळा...**

# छत्रपतींचे जलव्यवस्थापन

सध्या देशावर दुष्काळाचे सावट आहे. राज्यात भीषण दुष्काळी परिस्थिती आहे. आज खरी गरज आहे ती पाणी वाचवण्याची. त्यासाठी शिवरायांच्या पाणी व्यवस्थापनाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

छत्रपती शिवाजी महाराज कोणताही दुर्ग बांधण्यापूर्वी पाणी मुबलक व पुरेसे आहे की, नाही याची दक्षता घेत असत. महाराजांनी बांधलेल्या प्रत्येक गडावर जलसंचयनासाठी तलाव, पाण्याची टाकी निश्चित आहे. शिवाजी महाराजांनी किल्ल्यावरील जलव्यवस्थापनासंदर्भात विशिष्ट नियम केले होते. त्या नियमानुसार जलसंचयन केले जात असे.

गडावरील पाणके ठरावीक वेळी येऊन या कोरलेल्या टाक्यांमध्ये पाणी ओतून जात असत. पहारेकरी त्या पाण्याचा वापर पिण्यासाठी करत असत. दगडाच्या डोण्यातूनच पाणी काढून अतिशय काटेकोरपणे काळजीपूर्वक पाणी वापरले जात असे. महाराजांनी अशी पाण्याच्या टाक्यांची चोख व्यवस्था केल्याचे दिसून येते. नवीन किल्ला बांधत असताना टाक, विहीर व तलाव या गोष्टी डोळ्यासमोर ठेवून किल्ल्यांची बांधी सुरू होत असे. एवढेच नव्हे तर महाराजांनी जिंकलेल्या





किल्ल्यावरही काही जुन्या टाक्या शिवकाळात रुंद केल्याचे दिसून येते.

### सामूहिक जलसंवर्धनाला प्रोत्साहन

शिवकाळातील एक घटना अशी आहे की, स्वराज्यातील शिवापूरच्या कालव्याचे काम सुरू असताना त्या वेळी आजूबाजूच्या गावातील पाटील व इतर मंडळी मोठ्या प्रमाणात जमा झाली होती. परंतु धरणाचे पाणी एका प्रचंड मोठ्या खडकामुळे अडून राहिले होते. तेव्हा तेथे कामावर असलेल्या येस पाटील कोंढेवेकर यास महाराजांनी सांगितले की, आम्ही स्वारीहून येतो तोपावेतो हर इलाज करून एवढा धोंडा फोडून

**डॉ. मधुकर जाधव**


पाण्यास वाट करणे. महाराजांची ही आज्ञा शिरसावंद्य मानून येस पाटील कामास लागले आणि महाराज परत येण्याच्या आत पाण्यास सुरळीत वाट करून दिली. येस पाटील यांना

महाराज बक्षीस देऊ लागले. येस पाटलाने महाराजांना विनंती केली वरकड बक्षीस नगदी दिले तर खाऊन जाईल. तरी आपणास पाटीलकी द्यावी. महाराजांनी खूश होऊन त्याची विनंती मान्य केली.

कात्रज, कल्याण, कोंढवे, कोंढाणपूर, राहाटवडे, गाऊडदरा, खेड, वेळे, आंबेगाव, वरवे, आर्वी व नऱ्हे या गावातील मंडळी या कार्यामध्ये सहभागी झाली होती. शिवरायांनी सामूहिक जलसंवर्धाची संकल्पना प्रथमत: भारतीय माणसांमध्ये निर्माण केली.

### शिवरायांची आज्ञावली

''गडावरी आधी उदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाही आणि ते-ते



किल्ले विसापूर येथील पाण्याची टाकी

स्थळ तो आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळी टाकी. पर्जन्यकाळापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे यैसी मजबूत बांधावी. गडावर झराही आहे. जैसे तैसे पाणीही पुरते म्हणोन तितक्यावर निश्चिती न मानिता उद्योग करावा. निमित्य की झुंजामध्ये भांदियाचे आवाजाखाले झरे स्वरुप होतात आणि पाणीयाचा खर्च विशेष लागतो. तेव्हा संकट पडते. याकरीता पैसे जागा जिकरियाचे पाणी म्हणोन दोन-चार तळी टाकी बांधून ठेऊन त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे, गडाचे पाणी बहुत जतन राखावे.''

१६५७ मध्ये महाराजांनी ताब्यात घेतलेल्या विसापूर गडावर १२ टाक्या आणि २ तळी आहेत. किल्ले सिंहगडावरती अमृतेश्वर हे एक तळे आहे. २५ टाक्या आहेत. राजांचे जन्मस्थळ असणाऱ्या शिवनेरी किल्ल्यावरती पाणी व्यवस्थापन अगदी श्रेष्ठ दर्जाचे आहे. किल्ल्याच्या उत्तर बाजूने बांध असलेल्या बदामी तलावात पातळीदर्शक खांब आहे. त्याचबरोबर गंगा, यमुना, मोती व कमान ही टाके व इतर हौद महत्त्वपूर्ण आहेत. १६५९ मध्ये स्वराज्यात आणलेल्या वसंतगडावरती कृष्ण, कोयना व साखर असे तीन तलाव आहेत. किल्ले सज्जनगडावरती तीन जलयुक्त अशी तळी आहेत. घोडाळे तळे, सोनाळे तळे, खांबाळे तळे ही महत्त्वाची तळी आहेत. पन्हाळा किल्ल्यावरती नागझरी, अंधारबाब, कर्पूरबाब, सोमाळे तलाव, विष्णू तीर्थ, तीन दरवाजा विहीर व गोपाळबाग साधोबा तलाव ही पाणी व्यवस्था आहे. किल्ले विशालगडावरती भूपाळ तलाव, अर्धचंद्र विहीर, अमृतेश्वर कुंड व झरा, भगवंतेश्वर दगडी कुंड व घोड्याचा टाप झरा अशा प्रकारची पाण्याची



मान्सून २०१६

**छत्रपतींनी किल्ल्यावरील पाणी जतन करण्यासाठी टाकेबांधणीचे शास्त्र विकसित केले होते. पावसाळ्यामध्ये पडलेले पाणी अशा टाक्यामध्ये अडवले जाई. तेच पाणी वर्षभर पुरवले जात असे. अशा टाक्यांची स्वच्छतेच्या दृष्टीने दक्षता घेतली जात असे. महाराष्ट्रातील प्रत्येक छोट्यामोठ्या किल्ल्यांवर अशा टाक्या दिसून येतात.**

व्यवस्था गडावर आहे. प्रतापगडाच्या दक्षिणेकडे असणारा भवानी तलाव महत्त्वपूर्ण आहे. गडाच्या टोकावरील एका चिंचोळ्या भागावर हा बांधला आहे. मानवनिर्मित घळ निर्माण करून घळीच्या दोन्ही बाजूला बांध घालून हा तलाव निर्माण केलेला आहे. प्रतापगडावरील गोड्या पाण्याचा तलावही भक्कम असा आहे.

### तलावांच्या श्रृंखला

महाराष्ट्र आणि गोवा यांच्या सीमेवर कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिणेला चंदगड तालुक्यात पारगड हा किल्ला आहे. या गडावर महादेव, गुणजल, गणेश व फाटक असे चार तलाव आहेत. या तलावासह गडांवर १८ विहिरी आहेत. किल्ले विशालगडावरती गंगासागर, कोळिंब तलाव, काळाहौद, हत्ती तलाव, कुशावर्त व हिरकणी तलाव, बारा टाकी, हनुमान टाके यातून जलव्यवस्थापन केले जात असे. १६७१ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ले सुवर्णदुर्गाच्या पुनर्रचनेसाठी १०,००० होनांची तरतूद केली होती. त्यातून किल्ल्यावरती आठ विहिरी व एक तळे निर्माण केले. जालना स्वारीवरून राजे परत येत असताना १५ दिवस पट्टा किल्ल्यावर मुक्कामाला होते. त्या किल्ल्यावर जवळ-जवळ पाण्याची १७ टाकी आहेत.

१६७२ मध्ये राजांनी तोरणा किल्ल्यासाठी ५००० होण खर्च केले. तोरणतळे, म्हसोबा तळे, खोकड टाके, मेंगाई टाके, पाताळगंगा, गंगाजलाई, कापूर टाके व बाळंजाई टाके याबरोबरच किल्ल्यावरती अजून तीन ते चार टाकी आहेत. १६७३ मध्ये जिंकलेल्या सातारा जिल्ह्यातील पांडवगडावरती १४ टाकी व एक तळे आहे. किल्ले भूषणगडावरती २ विहिरी १ टाके व १ कुंड आहे.

**(लेखक हे इतिहासाचे अभ्यासक असून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर येथे प्राध्यापक आहेत.)**
**संपर्क : ०९९७५५४६०२०**

**समस्या छोट्या असो वा मोठ्या, कोणत्याही समस्येच्या मुळाशी जाऊन त्या जागेवरच सोडवण्यासाठी प्रसिद्ध असलेले लोकप्रतिनिधी म्हणून अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उद्योग व खनिकर्म, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री प्रवीण पोटे यांची अमरावती जिल्ह्यात व विदर्भात ख्याती आहे. जिल्ह्यातील प्रशासनावर जबरदस्त पकड व सर्वच विभागाची पूर्णपणे जाण असणारे मंत्री म्हणून तसेच तेवढ्याच तळमळीने वैयक्तिक व सार्वजनिक हिताचे प्रश्न सोडवणारे मंत्री म्हणून विदर्भात पोटे यांनी नावलौकिक प्राप्त केला आहे.**



# झटपट निर्णय आणि दिलासा

**सुरेश काचावार**

एक दिवस मंत्र्यासोबत या सदराखाली लिखाण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र दिनाच्या वर्धापन दिनी म्हणजे १ मे, २०१६ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास मी पालकमंत्री प्रवीण पोटे यांच्या अमरावती शहरातील राठीनगर परिसरातील त्यांच्या निवासस्थानी पोहोचलो. सकाळीच पालकमंत्री महोदयांना भेटण्यासाठी व महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी निवासस्थानी गर्दी होतीच. मुख्य ध्वजारोहण समारंभाकरिता म्हणून पालकमंत्री घरातून बाहेर येताच त्यांनी उपस्थितांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर लगेच नेहरु स्टेडियमकडे वाहनांचा ताफा निघाला. सकाळी ८ वाजता श्री. पोटे यांच्याहस्ते नेहरु स्टेडियमवर मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ संपन्न झाला. पालकमंत्र्यांनी पोलीस, गृहरक्षक दल, स्काऊट गाइड, एसआरपी, अग्निशमन दल, शहर वाहतूक शाखा आदी पथकांकडून मानवंदना स्वीकारल्यानंतर उपस्थितांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

शासनाची प्रतिमा उंचावण्यासाठी, प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा नेहमीच गौरव करण्याची श्री. पोटे यांची परंपरा आहे. कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी म्हणून प्रसिद्ध असलेले अमरावतीचे किरण गित्ते यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उत्कृष्ट जिल्हाधिकारी म्हणून पुरस्कार देण्यात आला. पांदणरस्ते विकासाचा अमरावती पॅटर्न शासनाने इतर जिल्ह्यांतही लागू केला. जिल्ह्यात या योजनेखाली ९३० पांदण रस्ते निर्माण झाले. नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील दाभा हे गाव पालकमंत्र्यांच्या प्रेरणेतून पांदणमुक्त झाले. या गावाचे तलाठी प्रदीप पिंपरकर यांचा तसेच ९७ लक्ष ६० हजार रुपये सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलित केल्याबद्दल आणि राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत अमरावती विभागास प्रथम पारितोषिक मिळाल्याबद्दल सर्वश्री रत्नाकर चरडे, रविंद्र जोगी यांचा गौरव करण्यात आला. दलित वस्ती विकास व सुधारणा अभियानांतर्गत सावंगी मोहाडी (जि.अकोला), वरुड ताफा (ता.रिसोड), मोझरी (ता.तिवसा), पैलवाडा (जि.अकोला) यांना पाच लक्ष रुपयाचा धनादेश, ग्रामीण पोलीस कॉन्स्टेबल तुळशिराम फुलचंद राणे यांना पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह मिळाल्याबद्दल पालकमंत्र्यांनी गौरव केला.

भारत स्काऊट व गाइडमधील उत्कृष्ट कार्य, मल्लखांब प्रकारात जर्मनीमध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल, अभिलेख जतन, विविध क्रीडा प्रकार, प्रात्यक्षिक पीक स्पर्धा, जलयुक्त शिवार आदी क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्यांना स्मृतिचिन्ह, प्रशस्तिपत्र व पुष्पगुच्छ देऊन जाहीरपणे गौरव करून सन्मानित केले. तत्पूर्वी शुभेच्छा संदेशाच्या केलेल्या भाषणात जलयुक्त शिवार अभियान, कृषी वीज पंप जोडणी, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजना, मागेल त्याला शेततळे, खरीप पीक कर्ज व थकबाकीदार शेतकऱ्यांना पुनर्गठन करून वाटप केलेले पीक कर्ज, सावकारी कर्जातून मुक्तता, मेक इन महाराष्ट्र, स्किल इंडिया, विदर्भातील आत्महत्या रोखण्यासाठी तसेच विदर्भातील कृषिमालावर आधारित मोठे उद्योग आणून सर्वसामान्य शेतकऱ्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी सियाराम, रेमंड, श्याम इंडो फॅब आदी नामवंत कंपन्यांनी अमरावती येथील एमआयडीसी परिसरात उद्योग सुरू केल्यामुळे हजारो शेतकऱ्यांना तसेच उपलब्ध झालेल्या रोजगाराची त्यांनी माहिती दिली. सन २०१५-१६ या वर्षात जलयुक्त शिवार अभियानात २५३ गावांमध्ये २२ हजार १३२ टीएमसी जलसाठा निर्माण झाला. ३२,६२४ हेक्टर क्षेत्राला संरक्षित सिंचनाचा लाभ झाला. १०,७०० शेतकऱ्यांच्या विहिरींकरिता वीज जोडणी प्रदान केली. २८८ गावांत लोकसहभागातून ९०० पांदण रस्ते निर्माण झाले. १२,३८३ कर्जदारांना ३१ कोटी ३७ लक्ष रुपये मंजूर करून त्यांना सावकारी कर्जातून मुक्त केले. 'मेक इन महाराष्ट्र' उपक्रमात राज्यात ८ लक्ष कोटी गुंतवणुकीसाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली आहे. लवकरच कोकाकोलादेखील जिल्ह्यात काम सुरू करणार असल्याचे सांगितले. स्किल इंडिया मिशन व मुद्रा बँकेच्या माध्यमातून बेरोजगारांना रोजगार देण्यात

## वृक्षारोपण करू या

**हरित पर्यावरणासाठी समृद्ध वनांचे रक्षण करणे ही आपली प्राथमिकता आहे. बदलते पर्यावरण, बदलते हवामान व ग्लोबल वार्मिंग याला आळा घालण्यासाठी व्यक्तीगत पातळीवर निश्चय करण्याची गरज आहे. संघटित व सामुहिक प्रयत्नांतून पर्यावरणाची काळजी घेतल्यास आपण भविष्यात हरित वसुंधरा, आरोग्य संपन्न पर्यावरण निर्माण करण्यास निश्चित यशस्वी होऊ, असा मला विश्वास आहे. पर्यावरण संवर्धनासाठी यावर्षी सर्व कंपन्यांनी आपल्या मोकळ्या जागेत वृक्षारोपण करावे. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने हा निश्चय वृद्धींगत करू या.**

**– प्रवीण पोटे–पाटील, पर्यावरण राज्यमंत्री**



येईल. १० हजार कोटीपेक्षा जास्त निधी राष्ट्रीय महामार्ग निर्मितीसाठी मंजूर झाल्याचे सांगितले. आत्महत्याग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असल्याबद्दल उपस्थितांना आश्वस्त केले.

### जनता दरबार

जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी श्री. पोटे यांचा दौऱ्याच्यावेळी शासकीय विश्रामगृहात जनता दरबार भरत असतो. यात दरबारात त्यांनी आतापर्यंत १ लाख ५० हजार लोकांच्या भेटी घेतल्या. प्रत्येकाची निवेदने स्वीकारून त्याची नोंद नोंदवहीत केली जाते. झालेल्या कार्यवाहीची माहिती संबंधितांना दिली जाते. त्याचाच एक भाग म्हणून ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांचा ताफा सरळ शासकीय विश्रामगृहात पोहोचला. तेथे निवेदने घेऊन अनेकजण वाट पाहत होते. एक अपंग तर यवतमाळहून पालकमंत्र्यांच्या भेटीसाठी आला होता. त्यास व्हिलचेअर हवी होती. पालकमंत्र्यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून कार्यवाहीचे निर्देश दिले.

कॅन्सर झालेल्या एका आजीबाईने मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून पैसे मिळण्यासाठी पालकमंत्र्यांकडे विनंती केली. पालकमंत्र्यांनी अर्जावर स्वाक्षरी केली. तत्पूर्वी त्यांनी प्रवास खर्च व प्राथमिक उपचारासाठी म्हणून स्वत:चे १० हजार रुपये काढून त्या महिलेस दिले. या वेळी उपस्थितांनी पालकमंत्र्यांचे मोठेपण व दातृत्व बघितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन तसेच नवीन पीक कर्ज सुलभतेने व्हावे यासाठी सुरू केलेले सुलभ खरीप पीक कर्ज अभियान योजनेचा शुभारंभ श्री. पोटे यांच्याहस्ते करजगाव येथे दुपारी २ वाजता झाला. जणू शासन आपल्या दारात आल्यामुळे करजगाववासीयांना मोठा दिलासा मिळाला. विभागीय आयुक्त ज्ञानेश्वर राजुरकर यांच्यासह जिल्हाधिकारी किरण गित्ते, बँक व प्रशासनातील सर्व अधिकारी यांनी मेळावा घेऊन सुलभ खरीप पीक कर्ज अभियानाचा शुभारंभ केला. राष्ट्रीयकृत प्रत्येक बँकांनी त्यांच्या क्षेत्रातील पाच गावात कर्ज मेळावे घेऊन सुलभ पीक कर्ज वाटप करावे. अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक गावात ८० टक्के शेतकऱ्यांना कर्जाचा लाभ द्यावा म्हणून श्री. पोटे यांनी सूचनाही केल्या.



प्रातिनिधिक स्वरुपात १३ सभासदांना कर्जमंजुरीचे पत्र देण्यात आले.

### व्हॉट्स ॲपवर तक्रारीची दखल

जनतेला सोईचे व्हावे म्हणून पालकमंत्र्यांनी डिसेंबर–२०१५ पासून व्हॉट्स ॲपवरील तक्रारी स्वीकारण्याचा उपक्रम सुरू केला आहे. हजारो तक्रारी याद्वारे प्राप्त झाल्या. त्याच्या निराकरणासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे पालकमंत्र्यांच्या स्वीय साहाय्यकामार्फत पाठपुरावा केला जातो.

### टेलिसचिवालय

श्री. पोटे यांनी राज्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर स्वत:चे टेलिसचिवालय सुरू केले आहे. ९२२५५११००० या टोल फ्री क्रमांकावर एव्हीआरएस (ॲटोमॅटिक व्हॉइस रेकॉर्डिंग सिस्टिम) जनतेच्या तक्रारींची आपोआप नोंद होते. यासाठी विशेष कार्यअधिकारी व कार्यालयीन साहाय्यकामार्फत संबंधित विभागास तक्रारी पाठवल्या जातात. त्याची एक प्रत तक्रारदारास पाठवली जाते. अशा पद्धतीने पालकमंत्र्यांचा व्यस्त दिनक्रम मी अनुभवला.

**(लेखक हे अमरावती येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९४२२९४५२८५**

**दहावी, बारावीनंतर करिअरचे निर्णायक वळण येत असते. त्यामुळे दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उत्तम यश मिळवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी प्रयत्नशील असतो. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा माध्यमिक शैक्षणिक टप्पा मानला जातो. या काळात विद्यार्थी व पालक अतिशय जागरूक असतात. दहावी-बारावीत विद्यार्थ्यांचे टक्केवारीला खूप महत्त्व दिले जाते. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय शिक्षण विभागाने घेतले असून या निर्णयांमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या अपडेट आणि अपग्रेड करण्यास प्रयत्न करण्यात येत आहेत.**



# सारे काही विद्यार्थ्यांसाठी...

वर्षा फडके

### १० मिनिटे आधी प्रश्नपत्रिका देण्याचा निर्णय

माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका वेळेवर देण्याचा निर्णय या वर्षापासून घेण्यात आला. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडवण्यापूर्वी कोणते प्रश्न सोडवावेत, याची पूर्वकल्पना मिळण्यास मदत होत आहे.

### दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांची लगेच फेरपरीक्षा

एखादा विद्यार्थी दहावी वा बारावीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झाला तर त्याचे शैक्षणिक वर्ष वाया जाणार हा समज बऱ्याच प्रमाणात कायम आहे आणि तो गेल्या वर्षापर्यंत खरा होता. अर्थात, दहावी वा बारावीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यावर ऑक्टोबर–नोव्हेंबरच्या फेरपरीक्षेचा पर्याय उपलब्ध होता. परंतु ही परीक्षा देऊन विद्यार्थी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले तरी तोपर्यंत अर्धे शैक्षणिक वर्ष संपलेले असायचे. सर्व प्रवेशप्रक्रिया पूर्ण झालेली असायची. त्यामुळे ऑक्टोबरची परीक्षा उत्तीर्ण होऊन विद्यार्थ्यांना लगेच पुढील शिक्षणासाठी प्रवेश मिळत नव्हता. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जात होते. हे लक्षात घेऊन गेल्या वर्षी दहावीच्या फेरपरीक्षा जुलै–ऑगस्टमध्ये घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यात उत्तीर्ण होणाऱ्यांना पुढील वर्गात प्रवेश घेणे शक्य झाले. यावर्षीपासून बारावीत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेतली जाणार आहे.

### 'नापास' शिक्का पुसण्यासाठी पहिले पाऊल...

नापास असा शिक्का बसला की, अनेकांचा आत्मविश्वास डळमळीत होतो. अंगी कौशल्य आणि पात्रता असूनही त्यांचा मार्ग भरकटू शकतो. हे लक्षात घेऊन दहावीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची लगेचच फेरपरीक्षा घेण्यात आली. मार्च २०१५ मध्ये परीक्षा उत्तीर्ण करू न शकलेले तब्बल ५७,५१७ विद्यार्थी जुलै २०१५ मधील फेरपरीक्षेत उत्तीर्ण झाले.

### विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी प्रयत्न

दहावी फेरपरीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना एकटे पडू न देता, त्यांचे अंगभूत कौशल्य ओळखून त्यांना लाभदायक ठरतील, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

### पालकांच्या रुचीपेक्षा विद्यार्थ्यांचा कल महत्त्वाचा

विद्यार्थ्यांचे करिअर घडवताना अनेक पालकांना प्रश्न पडतो की, विद्यार्थ्यांची रुची कशात जास्त आहे. रुचीवर करिअरची निवड करण्यापेक्षा या तीन गोष्टींचा विचार करणे महत्त्वाचे आहे. एक मुलाची आवड, दुसरी त्याची क्षमता, तिसरी महत्त्वाची त्याची पात्रता. या तीन



बाबींचा विचार करून करिअर निवडले जावे यासाठी शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत प्रयत्न करण्यात येत आहे. पालकांनीही आपल्या मुलाची आवड, रुची आणि त्याची क्षमता या तीन गोष्टींचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## दहावीच्या विद्यार्थ्यांची प्रथमच कलमापन चाचणी

दहावीची परीक्षा दिलेल्या एकूण १५,४७,८२५ विद्यार्थ्यांची यावर्षी कलमापन चाचणी घेण्यात आली. कलमापन चाचणी ही प्रामुख्याने दहावीत असलेल्या विद्यार्थ्यांला आपल्याला करिअर कोणत्या क्षेत्रात करायचे आहे याबाबत मार्गदर्शन करणारी होती. कलमापन चाचणीमुळे विद्यार्थ्यांमधील अभिरुची वाढवणे याबरोबरच विदयार्थ्यांची क्षमता नेमक्या कोणत्या अभ्यासक्रमात आहे हे समजण्यास विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना मदत झाली आहे. कलमापन चाचणीमध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांचा कल, विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांचा विकास याबाबींवर लक्ष केंद्रीत करण्यात आले.

## करिअर निवडण्यासाठी
## 'महा करिअर मित्र हेल्पलाइन आणि संकेतस्थळ'

**शालेय जीवनात महत्त्वाची असणारी दहावीची परीक्षा दिल्यानंतर दहावीच्या विद्यार्थ्यांसमोर प्रश्न असतो तो कोणत्या शाखेत करिअर करता येईल याचा. यासाठी शासनाने पुढाकार घेतला असून विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी महा करिअर मित्र हेल्पलाइन आणि संकेतस्थळ तयार केले आहे. विद्यार्थ्यांना मदत व्हावी, यासाठी**
**महा करिअरमित्र हेल्पलाइन -८२७५१००००१ आणि**
www.mahacareermitra.in **हे संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे. ही हेल्पलाइन आणि संकेतस्थळ हे शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, श्यामची आई फाऊंडेशन (सामाजिक संस्था), व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नांतून तयार करण्यात आले आहे.**

## संकेतस्थळावर ७१ हजारांहून अधिक अभ्यासक्रमांची माहिती

विद्यार्थ्यांसाठी संचालनालयांच्या सहकार्याने विविध संस्था, अभ्यासक्रम, पात्रता इत्यादी माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली असून या संकेतस्थळावर ७१ हजारांहून अधिक अभ्यासक्रमांबाबत माहिती आहे. यावर्षी विद्यार्थी आपल्या नजिकचे जिल्हावार अभ्यासक्रम शोधू शकतील. पुढील वर्षी विद्यार्थी तालुका/शहर/गाव पातळीवरील सर्वात जवळची संस्था शोधू शकतील अशा पद्धतीने याबाबत काम करण्यात येत आहे.

## ललित कला शाखेकडे विद्यार्थ्यांचा कल

विद्यार्थ्यांचे कलमापन कला व मानव्यविद्या, वाणिज्य, तांत्रिक, आरोग्य व जैविक विज्ञान आणि ललित कला या पाच क्षेत्रामध्ये करण्यात आले. आरोग्य व जैविक विज्ञान या शाखेकडे एकूण २,०६,१४५ विद्यार्थ्यांचा कल दिसून आला. तांत्रिक शाखेत करिअर करण्याचा कल १,४१,४८१ विद्यार्थ्यांचा दिसून आला. वाणिज्य शाखा १,००,९७० विद्यार्थ्यांनी निवडली. कला आणि मानव्यविद्या शाखेत करिअर करण्यासाठी एकूण १,३६,६२० विद्यार्थ्यांनी रुची दाखवली तर ललित कला शाखेत करिअर करण्यास सर्वाधिक विद्यार्थी इच्छुक असून एकूण २,६७,६०५ विद्यार्थ्यांनी रुची दाखवली. उर्वरित विद्यार्थ्यांनी प्रत्येकी दोन शाखेत कल दाखवला.

## विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन

ज्या विद्यार्थ्यांना आपला कल नेमका कोणता शाखेकडे आहे हे समजून घेण्यास अडचणी येत असल्यास त्यांच्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन संस्थेकडून हेल्पलाइन सेवा सुरू करण्यात आली आहे. यावर मुलांना नेमके कोणते क्षेत्र निवडावे, यासाठी मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच मुलांचे आणि पालकांचे समुपदेशन होणार आहे.

## दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपाययोजना

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना यापुढे 'दिव्यांग' असे संबोधण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना पहिली ते बारावी पर्यंत अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत शैक्षणिकदृष्ट्या पूरक सोयी सुविधा आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या बरोबरीने नियमित शाळांमध्ये शिक्षणाची संधी मिळणार आहे.

## शालेय शिक्षण :

### शिक्षक पात्रता परीक्षा

विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या शिक्षकांना चौफेर ज्ञान असणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे. मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत सर्व प्राथमिक शिक्षकांकरिता (इयत्ता १ली ते ८वी सर्व व्यवस्थापन/सर्व मंडळे/सर्व माध्यमे/अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित इत्यादी शाळांमधील शिक्षकांना) शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे.

### अंध शाळांमधील दहावीचा अभ्यासक्रम ब्रेल लिपीत

शासकीय शाळांमधील दृष्टिहीन नियमित दहावीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम शिकवण्याऐवजी त्यांना अंध शाळांमधील अभ्यासक्रम ब्रेल लिपीमध्ये देण्यात यावा, असा प्रयत्न करण्यात येत आहे.

### अभ्यासक्रम समितीची बैठक

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तसेच प्रस्तावित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित अभ्यासक्रम कसा असावा, यासाठी अभ्यास करण्यात येत आहे. बालभारती, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातील विषय तज्ज्ञांसोबत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींमार्फत प्रथमच सहावी ते बारावीपर्यंतचा अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करण्यात येत आहे.

### शिष्यवृत्ती परीक्षांचे पुनर्विलोकन...

गणित, भाषा आणि बुध्दिमत्ता या तीन विषयांचाच शिष्यवृत्ती परीक्षेत समावेश असावा, असा आग्रह शिक्षक आणि पालकांकडून होत असे. या मागणीचा विचार करण्यासाठी शासनाने www.surveymonkey.com/r/schoolscholar या संकेतस्थळाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. विविध मतांचा विचार करून शिक्षण तज्ज्ञांच्या मदतीने शिष्यवृत्ती परीक्षांची पुनर्मांडणी करण्यात येत आहे.

### दुष्काळग्रस्त गावांतील आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांचे शुल्क माफ

यंदाच्या खरीप आणि रब्बी हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १४ हजार ७०८ दुष्काळग्रस्त गावांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागातील दुष्काळग्रस्त आणि टंचाईग्रस्त गावातील ईबीसीधारक विद्यार्थ्यांची विद्यापीठ व परीक्षा मंडळे यांचे परीक्षा शुल्क या निर्णयामुळे माफ होणार आहे.

## उच्च व तंत्रशिक्षण :

### स्किल डेव्हलपमेंट युनिव्हर्सिटी

स्किल डेव्हलपमेंटला प्रतिष्ठा मिळवून देणे व आगामी दहा वर्षात महाराष्ट्रातून ४५ ते ५० लाख तरुण प्रशिक्षित करण्यासाठी स्किल डेव्हलपमेंट युनिव्हर्सिटी, महाविद्यालये करण्यात येतील. येत्या शैक्षणिक वर्षात प्रायोगिक तत्त्वावर राज्यातील ३३० शाळांमध्ये हेल्थ केअर, ब्युटी वेलनेस, रिटेलींग, ऑटोमोबाइल व मल्टी स्किलसारखे अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत.

### महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे सामंजस्य करार

स्पोकन ट्युटोरिअल, हब अ‍ॅण्ड स्कोप मॉडेल, पुणे आणि नागपूर, पुण्यातील कौशल्य विकास केंद्र, न्यू साऊथ वेल्स, नॅसकॉम, आयसीपीए, केएलएबी, यामाहा, मर्सिडीज बेंन्झ, एमएससीसीआयए, डी.–लिंक लिमिटेड, बॉस्को यांच्यासोबत करार करण्यात आले आहेत.

### पुढील शैक्षणिक वर्षापासून चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टिम

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व कृषी विद्यापीठांमध्ये 'चॉइस बेस्ड क्रेडीट सिस्टिम' पद्धत लागू होणार आहे.

### सर्वोत्कृष्टतेचा विद्यापीठांचा ध्यास

महाराष्ट्रातील एकही विद्यापीठ जगातील सर्वोत्कृष्ट २०० विद्यापीठांच्या यादीत नाही, असे लक्षात आल्यामुळे राज्यपाल तसेच कुलपती सी. विद्यासागर राव यांनी राज्यातील विद्यापीठांसाठी लक्ष्य ठरवून दिले आहे. राज्यातील किमान दोन विद्यापीठे जगातील सर्वोत्कृष्ट १०० विद्यापीठांच्या क्रमवारीत आणणे तसेच किमान दहा विद्यापीठे व ५० महाविद्यालयांना राष्ट्रीय पातळीवर 'सेंटर्स ऑफ एक्सलंस' म्हणून विकसित करण्याचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे.





सीईटीमार्फत भरल्या जातील असे विधान केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी केले आहे. त्याबद्दल स्पष्ट करताना श्री. तावडे यांनी सांगितले की, हा विषय महाराष्ट्रासाठी लागू होत नाही. खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमधील जागा या राज्य सरकारमार्फत भरल्या जात नाहीत. या जागांवर राज्य शासनाचे नियंत्रण नाही. त्यामुळे या महाविद्यालयातील जागा एमएच–सीईटी प्रवेश परीक्षेमार्फत भरण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. कर्नाटकमध्ये खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील ४० टक्के जागा या सरकारमार्फत भरल्या जातात.

आंध्रप्रदेशमध्ये ५० टक्के जागा या शासनाच्या ताब्यात असतात. त्यामुळे हा विषय त्यांच्याकरीता लागू आहे. महाराष्ट्रामध्ये खाजगी आणि अभिमत वैद्यकीय महाविद्यालयातील जागा या नीटच्या माध्यमातूनच भरल्या जाणार आहेत.

### यावर्षीचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रवेश सीईटीद्वारेच

राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय पात्रता प्रवेश परीक्षेच्या (नीट) अध्यादेशावर मंगळवार दि. २४ मे २०१६ रोजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी स्वाक्षरी केली. यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना नीट परीक्षेमधून यावर्षी सवलत मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला होता.



महाराष्ट्राच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अखत्यारित असलेल्या २८१० जागांवरील प्रवेश सीईटीद्वारे होण्याचा मार्ग राष्ट्रपती यांच्यामार्फत काढण्यात येणाऱ्या अध्यादेशामुळे मोकळा झाला आहे. यावर्षीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशासाठी ५ मे, २०१६ रोजी राज्य शासनाच्या वतीने सीईटी घेण्यात आली होती.

यावर्षीच्या राज्य शासनाच्या जागा सीईटी परीक्षेद्वारे भरल्या जाणार असल्याने याचा फायदा ग्रामीण भागातील गरीब होतकरू विद्यार्थ्यांना होणार असून या विद्यार्थ्यांना सुद्धा वैद्यकीय प्रवेशाची संधी उपलब्ध होणार आहे.

खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील १७२० व अभिमत विद्यापीठातील १६७५ अशा एकूण ३३९५ जागा या नीट परीक्षेद्वारेच भरल्या जाणार आहेत.

राष्ट्रपतींनी स्वाक्षरी केलेला अध्यादेश वितरीत झाल्यानंतर महाराष्ट्र सरकारच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात येईल. जेणेकरून अध्यादेशा विरुद्धात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाल्यास या प्रकरणात राज्य सरकारची बाजू न्यायालयात मांडता येईल, असेही श्री. तावडे यांनी स्पष्ट केले आहे.

खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये शासनाच्या जागा या राज्य

### राज्य शासनामार्फत नीट परीक्षेसाठी मार्गदर्शन

खाजगी वैद्यकीय महाविद्यालय व अभिमत विद्यापीठातील प्रवेशांकरिता येत्या २४ जुलै २०१६ रोजी नीट परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी आता उपलब्ध वेळ पाहता विद्यार्थ्यांना या परीक्षेची तयारी करता यावी यासाठी राज्य शासनामार्फत मार्गदर्शन करण्यात येईल.

### शिक्षणतज्ज्ञांमार्फत परीक्षा पद्धतीत बदल करण्याचा विचार

पुढील वर्षांपासून वैद्यकीय प्रवेश नीट परीक्षेच्या गुणांवर दिले जाणार आहेत. एनसीईआरटीच्या नियमाप्रमाणेच एचएससी व सीबीएससी बोर्डाचा अभ्यासक्रम आहे. अकरावी व बारावी अभ्यासक्रमाच्या धर्तीवरच नीटची प्रश्नपत्रिका तयार होते. त्यामुळे पुढच्या वर्षीपासून येणाऱ्या नीटच्या पार्श्वभूमीवर उच्च माध्यमिक (एचएससी) बोर्डाचा अभ्यासक्रम आणि परीक्षा पद्धतीत काय बदल करता येऊ शकेल, याबाबत शिक्षणतज्ज्ञांची बैठक घेण्यात येईल. मात्र असे करीत असताना विद्यार्थ्यांची सामान्य बुद्धी ते सर्वोच्च बुद्धी यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे श्री. तावडे यांनी स्पष्ट केले आहे.

**(लेखिका या विभागीय संपर्क अधिकारी आहेत.) संपर्क : ०९८६९३०४८४७**

# डिजिटल ग्राम

महाराष्ट्र शासनाचे महत्त्वाकांक्षी 'डिजिटल पाऊल' म्हणून नागपूर जिल्ह्यातील पाच ग्रामपंचायतींना पहिल्या 'डिजिटल ग्रामपंचायत'चा दर्जा मिळाला आहे. यामध्ये खंडाळा (ता. मौदा), तरोडी (बु.) आणि खसाळा (ता. कामठी), दाभा (ता. हिंगणा) व विहीरगाव (ता. नागपूर ग्रामीण) या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या ग्रामपंचायतींमध्ये 'डिजिटल इंडिया'च्या धर्तीवर 'डिजिटल ग्राम' या योजनेचा शुभारंभ महाराष्ट्र दिनी (१ मे) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी कामठी तालुक्यातील तरोडी (बु.) येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसोबतच पाचही गावातील ग्रामस्थांशी मनमोकळा संवाद 'व्हिडिओ कॉन्फरन्सिंग'द्वारे साधला.

### काय आहे 'डिजिटल ग्राम' योजना?

तंत्रज्ञानाचा वापर करून शहर आणि ग्रामीण भागातील दरी नष्ट करण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. डिजिटल ग्राम या डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक आणि गावकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना जगभरातील आरोग्य तज्ज्ञांचे मार्गदर्शन 'डिजिटल हायवे'च्या माध्यमातून केले जाणार असून यातून एक प्रकारची आरोग्य क्रांती उदयास येणार आहे. 'डिजिटल हायवे' सुविधा ग्रामीण भागात पोहोचल्यास त्याच्या माध्यमातून शेती उद्योगाला मोठा फायदा होणार आहे. 'डिजिटल मार्केट' या संकल्पनेच्या माध्यमातून कुठल्याही बाजारपेठेत शेतकऱ्यांच्या शेतमालाची विक्री, खरेदी व मालाचे भाव माहीत करून घेण्याबरोबरच शेतकऱ्यांना मोबदलाही घेता येणार आहे. ग्रामपंचायतस्तरावर डिजिटल कनेक्टिव्हिटीतून तरुण बेरोजगारांना कौशल्यपूर्ण प्रशिक्षण देऊन रोजगारभिमुख करता येईल. तसेच नवनवीन उपक्रमांमध्ये सहभागी करून रोजगार उपलब्ध करून देता येईल. मुंबईतील अनेक तज्ज्ञ राज्यातील ग्रामपंचायतींना एकाचवेळी प्रशिक्षण व मार्गदर्शन करू शकणार आहेत.

**गणेश खवसे**

### 'डिजिटल ग्राम'ला मिळणाऱ्या सुविधा

- ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये ४ एमबीपीएस क्षमतेची इंटरनेट सुविधा
- शाळा आणि आरोग्य केंद्रात 'वाय-फाय'द्वारे इंटरनेट सुविधा
- सर्व नागरिकांना 'वाय-फाय'द्वारे इंटरनेट सुविधा
- या सुविधांसाठी स्वतंत्र जोडणी
- व्हिडीओ कॉन्फरन्सिंगची सुविधा

### डिजिटल ग्राम : खंडाळा

नागपूर जिल्ह्यातील मौदा पंचायत समितींतर्गत येणारे खंडाळा हे ८०७ लोकसंख्येचे गाव. गावात जाण्यासाठी दळणवळणाची साधनेही नाही, तेथे इंटरनेटसारखी सुविधा एवढ्या लवकर सुरू होईल, याची तिळमात्र शक्यता ग्रामस्थांना नव्हती. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने या गावाची 'डिजिटल ग्राम'साठी निवड करण्यात आल्याने अख्ख्या राज्यात या गावाची कीर्ती पोहोचली. या योजनेंतर्गत खंडाळा ग्रामपंचायत कार्यालयात बीएसएनएलची ब्रॉडबॅन्ड सेवा कार्यान्वित करण्यात आली. ग्रामपंचायतमध्ये प्रोजेक्टर, संगणक, मोठा स्क्रिन यासह आवश्यक ते साहित्य उपलब्ध करण्यात येऊन मुख्यमंत्र्यांनी या योजनेचा शुभारंभ करताच ग्रामस्थांशी संवाद साधला. दूरध्वनी नाही, मोबाइलसाठी कव्हरेज नाही; अशा गावात आता 'डिजिटल ग्राम'मुळे 'वाय-फाय' सुविधा उपलब्ध झाली आहे. ग्रामपंचायत डिजिटल झाल्याने थेट मंत्रालयाशी ग्रामपंचायत 'कनेक्ट' झाली आहे. एका 'क्लिक'वर ग्रामस्थांना शासनाच्या सर्व योजनांची माहिती उपलब्ध होत आहे. हवामानाचा अंदाज, बाजारपेठेची स्थितीसुद्धा ग्रामस्थांना घरबसल्या मिळू लागली आहे. एवढेच नव्हे तर ग्रामस्थांना व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारेच वैद्यकीय मार्गदर्शन, सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**ग्रामस्थांसाठी फायदेशीर : 'डिजिटल ग्राम'या योजनेत खंडाळा या गावाला समाविष्ट करून घेतल्याबद्दल शासनाचे आभार. याद्वारे ग्रामपंचायत डिजिटल होऊन रुग्णालय, अंगणवाडी, शाळेचेही 'डिजिटल'कडे पाऊल पडणार आहे. वैद्यकीय सल्ला रुग्णांना गावातच मिळणार असल्याने 'डिजिटल ग्राम' ग्रामस्थांसाठी खरोखरच फायदेशीर अशी संकल्पना आहे.**

**- मदन बरबटे, सरपंच, ग्रामपंचायत खंडाळा**

**शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित: ग्रामपंचायत डिजिटल, गावात वाय-फाय सुविधा आणि हवामानाचा अंदाज याद्वारे कळणार असल्याने शेतकऱ्यांसाठी खरोखरच ही संकल्पना लाभदायक आहे. हवामानाचा अंदाज आधीच कळल्याने शेतकरी संभाव्य धोका टाळू शकतील.**

**- विश्वनाथ वाघमारे, उपसरपंच, ग्रामपंचायत खंडाळा**

(लेखक हे नागपूर येथील लोकमत दैनिकात कार्यरत आहेत).
संपर्क : ०८८८८८६५४१२





# दुष्काळात मत्स्यशेती

**अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुका हा बहुतांश खारपान पट्ट्यात मोडणारा. आजकाल पिण्याच्या पाण्याची समस्या या भागात भेडसावत असताना, आजूबाजूला कुठेही पाण्याचा थेंब साठलेला दिसत नसताना, केवळ पावसाळी पाणी साठवून, शेततळ्यात ५-६ फुट पाण्यामध्ये हजारो रुपये मिळवून देणारी मत्स्यशेती बाळापूर तालुक्यातील बहादुरा या गावातील शेतकरी विठ्ठल माळी करत आहेत.**

अकोल्यापासून ३० किलोमीटर अंतरावर बुलढाणा जिल्ह्याच्या सीमेवर बहादुरा हे एक हजार वस्तीचे गाव आहे. खारपान पट्ट्यातील जमीन, अती पाऊस झाला तरीही पीक हातून जाते आणि कमी झाले तरीही जाते. अशा अवस्थेत फ़क्त शेतीवर उदरनिर्वाह करणे खूप अवघड आहे. विठ्ठल माळी सारखे शेतकरी मात्र याला अपवाद ठरतात. विदर्भाला जे पंतप्रधान पॅकेज मिळाले त्यावेळी १ लाख ४० हजार रुपयाच्या अनुदानावर माळी यांनी एक हेक्टर क्षेत्रावर शेततळे घेतले. त्यात महाराष्ट्र शासनाच्या मत्स्य विभागाच्या साह्याने मत्स्यपीक घेण्यास सुरुवात केली. त्यानंतर २ वर्षांनी मत्स्य विभागाकडून केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय प्रोटीन सप्लिमेंट मिशन अंतर्गत १ एकरामध्ये ४८ हजार रुपयाच्या अनुदानावर दुसरे शेततळे घेतले. त्यातही मत्स्य बीज टाकले. अकोला जिल्हा ४४ ते ४५ डिग्री सेल्सियस तापमानात भाजून निघत असताना या एक एकराच्या तळ्यात भर दुपारी १२ वाजता, मत्स्यमारी करत असलेले; अतिशय सुखावणारे चित्र पाहायला मिळाले.







## पडीक जमिनीत सोने

माळी यांची दोन्ही तळ्यांची जमीन ही चोपन प्रकारात मोडणारी आहे. चोपन जमीन ही चिकण मातीची, पाण्याचा लवकर निचरा न होणारी असल्यामुळे कोणतेही पीक या ठिकाणी येत नाही. अशा पडीक जमिनीचा वापर मत्स्यशेतीसाठी करून शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाचा नवा आयाम निर्माण करून दिला आहे. गावातील ओढ्यावाटे वाया जाणारे पाणी अडवून या शेततळ्यात सोडले आहे. आतापर्यंत ६० क्विंटल एवढे मासे त्यांनी विकले आहेत. पहिल्या दोन वर्षातच त्यांनी गुंतवलेल्या भांडवलाची परतफ़ेड झाली असून गेल्या दोन वर्षापासून त्यांना नफा मिळत आहे.

## दुष्काळातील दीपस्तंभ

या हंगामात त्यांनी रोह, कटला, मृगल या माशांची ५ हजार बीजे टाकली होती. त्या बीजांपासून आता ३ ते ५ किलो एवढ्या वजनाचे मासे मिळत आहेत. प्रचंड मागणी असल्यामुळे तळ्यातून काढताच माल विकला जातो. पावसाळ्यातील गावातले वाहून जाणारे पाणी अडवून त्यातून दोन लोकांना कायमचा रोजगार देऊन त्यातून उत्पन्न काढणारे माळी एक कृतीशील शेतकरी आहेतच पण ते शेती तोट्यात जाणारी आहे, म्हणून हरून बसणाऱ्यांसाठी एक दीपस्तंभ असल्याची प्रतिक्रिया अकोल्याचे जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी प्रत्यक्ष त्यांच्या प्रयोगाची पाहणी करून दिली.

शेतकऱ्यांना उभे करण्यासाठी शासन सर्वतोपरी मदत करायला तयार असून असेच प्रयोग शेतकऱ्यांनी करायला हवेत असे बहादुऱ्याच्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी या वेळी सांगितले. विठ्ठल माळी यांनी या तळ्याच्या बाजूलाच शेळीपालन प्रकल्प टाकला आहे. त्या शेळ्यांचे उत्पन्न सुरू झाले आहे. खारपान पट्ट्यातील शेतकरी असा जोडधंदा करून एवढ्या दुष्काळातही २० ते २५ हजार रुपयाचे उत्पन्न घेऊन दोन ते तीन लोकांना १२ महिने रोजगार उपलब्ध करून देतो आहे. यांचा हा प्रयोग पाहण्यासाठी अनेक लोक येतात आणि प्रेरणा घेऊन जात असल्याचे विठ्ठल माळी सांगतात.

माळकरी असलेले विठ्ठल माळी मत्स्य आणि शेळीपालन हा व्यवसाय उत्तम आणि नफ्यात चालवतात. इतर शेतकऱ्यांनी आत्महत्यासारखे मार्ग न अवलंबता असे शेतीपूरक व्यवसाय करावेत.

आपण मार्गदर्शन करायला कधीही उपलब्ध असल्याचे ते सांगतात. विठ्ठल माळी यांच्यासारखे शेतकरी शासनाच्या मदतीने शून्यातून आपले विश्व उभ करत आहेत. इतर लोकांनी असा वसा घेतला तर खारपान पट्ट्यातही सुगीचे दिवस येतील.

मुख्यमंत्री देवेंद्र फ़डणवीस यांनी 'मागेल त्याला शेततळे' ही योजना सुरू केली आहे. या योजनेचा लाभ घेऊन असे मत्स्योत्पादन घेतले तर मोठ्या प्रमाणात रोजगार आणि शेतकऱ्यांना शेतीपूरक चांगला व्यवसाय निर्माण होऊ शकतो.

**युवराज पाटील**

**(लेखक हे अकोला येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत).**
**संपर्क : ०७७४३८७२७६९**



# योजना केंद्राच्या सर्वांगीण समृद्धीच्या

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारला मे महिन्यात दोन वर्ष पूर्ण झाली. या दोन वर्षात समाजाच्या सर्वस्तरातील जनतेवर प्रभाव पाडणाऱ्या काही योजनांना मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली आहे. भारतात सकारात्मक बदल घडवणाऱ्या केंद्राच्या योजनांची माहिती लोकराज्यच्या या नव्या सदरातून दिली जाणार आहे.

# बेटी बचाओ, बेटी पढाओ

भारतामध्ये मुलीचा जन्मदर कमी होत आहे. ० ते ६ वयोगटाच्या दरम्यान असलेला मुलींचा जन्मदर २००१ मध्ये ९२७ आणि २०११ मध्ये ९१८ होता. लिंगभदेभाव ही जटील समस्या आहे या कारणास्तव मुलींची संख्या कमी होत आहे. मुलीमुलांच्या जन्मदरात समानता यावी, लिंगभेदभाव मिटावा, मुलींना समानतेने आणि निर्भयपणे जगता यावे, त्यांना संरक्षण मिळावे त्याचबरोबर त्यांच्या शिक्षणाची प्रगती व्हावी. यासाठी केंद्र सरकार 'बेटी बचाओ बेटी पढाओ' ही मोहीम राबवत आहे. या मोहिमेची सुरुवात २२ फेब्रुवारी २०१५ रोजी हरयाना राज्यातील जिल्हा पानिपत येथून झाली आहे. या योजनेसाठी भारतातील १०० जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे.

या केंद्रपुरस्कृत योजनेमध्ये महाराष्ट्रातील बीड, जळगाव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, जालना, या जिल्ह्यांची निवड करण्यात आलेली आहे.

**या मोहिमेची उद्दिष्टे :** १) लिंग निवडीस प्रतिबंध करणे. २) बालिकेचा जन्मदर वाढवणे ३) मुलीच्या जीवनमानाच्या सुरक्षेबद्दल खात्री देणे ४) मुलींच्या शिक्षणाबाबत प्रोत्साहन तथा खात्री देणे. ५) जिल्हा, तालुका व निम्नस्तरावर विविध संस्था व सेवा देणारे विभाग यांचा समन्वय घडवून आणणे.

राज्यात मुलींचा जन्मदर १००० मुलांच्या मागे ९२९ इतका आहे. राज्यातील मुलींच्या आरोग्याचा दर्जा उंचवणे, त्यांना शिक्षण देणे व बालविवाह प्रतिबंधक करणे या उद्देशासाठी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या मोहिमेंतर्गत सुकन्या समृद्धी योजनेची सुरुवात करण्यात आली आहे.



'बेटी बचाओ बेटी पढाओ' या मोहिमेचा शुभारंभ करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी. छायाचित्रात महिला व बालविकास मंत्री मनेका गांधी, मनुष्यबळ विकास मंत्री स्मृती ईराणी आणि अभिनेत्री माधुरी दीक्षित

## सुकन्या समृद्धी योजना

- १ हजार रुपयांच्या किमान रकमेसह सार्वजनिक क्षेत्रातील कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेमध्ये किंवा पोस्ट ऑफिसमध्ये मुलीच्या नावाने 'सुकन्या समृद्धी योजने'चे खाते उघडता येते.
- हे खाते मुलीच्या जन्मापासून केवळ १० वर्षांपर्यंतच उघडता येते.
- एका वर्षामध्ये या खात्यात किमान हजार रुपये आणि अधिकाधिक १.५० लाख रुपयेच जमा करता येते.
- एक पालक आपल्या केवळ दोन मुलीकरीता हे खाते उघडू शकतो आणि दोघींच्या खात्यात एका वर्षात १.५० लाखापेक्षा अधिक रक्कम जमा करता येणार नाही.
- मात्र दुसऱ्यांदा जुळ्या मुली झाल्यास ३ मुलींकरीता हे खाते उघडले जाऊ शकते.
- मुलगी २१ वर्षाची झाल्यानंतरच हे खाते परिपक्व होते.
- तथापि, १८ वर्षानंतर आवश्यकता असेल तर ५० टक्के रक्कम काढता येऊ शकते.
- ही योजना मुलीच्या शिक्षणाचा खर्च आणि लग्नाचा खर्च लक्षात घेऊन तयार करण्यात आली आहे.
- या योजनेसाठी मुलीचे पासबूक काढताना खालील कागदपत्रांची आवश्यकता आहे.
  (अ) मुलीचा जन्म दाखला
  (ब) ओळखपत्र
  (क) निवासी दाखला
- खात्याच्या परिपक्वतेनंतर यामध्ये जमा झालेली रक्कम ही संबंधित मुलीच्याच मालकीची होते.
- भारतात हे खाते कुठेही काढता येते. सोयीनुसार खाते कुठेही स्थानांतरीत करण्यात येते.
- वयाच्या १० वर्षानंतर मुलगी स्वत: आपले खाते हाताळू शकते.
- किमान एक हजार रुपये दरवर्षी न भरू शकल्यास त्या वर्षासाठी ५० रुपये दंड आकारला जाईल. मात्र दंडाच्या रकमेसह १४ वर्षापर्यंत कधीही हे खाते पुन्हा सुरू करण्याची यामध्ये तरतूद आहे.

**प्रवीण टाके**

(लेखक हे वरिष्ठ साहाय्यक संचालक आहेत.) संपर्क : ०९७०२८५८७७७

# स्वच्छतेतून समृद्धीकडे...

**स्वच्छ महाराष्ट्र अभियानाला आता चळवळीचे रूप आले आहे. नगरपालिकांसोबतच आता नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर स्वच्छतेची सप्तपदी टाकण्यास सुरुवात केली आहे. नांदेड येथील अनुसयाबाई मुळे यांनी आपल्या छोट्याशा घराची समोरील खोली तोडून शौचालय बांधण्याचे धाडस दाखवले. कचरा व्यवस्थापनाच्या माध्यमातून प्लास्टिकचा पुनर्वापर करून वेंगुर्ले शहराने प्लास्टिकमिश्रित घटकांनी डांबरीकरण केलेला महाराष्ट्रातील पहिला रस्ता साकारला.**



## शौचालयासाठी तोडले घर

नांदेड येथील अनुसयाबाई रंगनाथ मुळे यांचा स्वच्छतेसाठीचा आग्रह आणि त्यासाठी त्यांनी त्यांच्या दृष्टीने घेतलेला मोठा निर्णय प्रत्येक महिलेसाठी आदर्श आहे. नांदेड-वाघाडा महानगरपालिकेतील शेवटच्या टोकावर वसलेल्या संतोषनगरमध्ये त्यांचे छोटेसे घर आहे. रंगनाथ मुळे यांच्यासोबत त्यांचा २० वर्षांचा संसार. मजुरी करणारे रंगनाथराव यांनी बऱ्याच वर्षापूर्वी संतोषनगरमध्ये घर बांधले. तेव्हा घरात शौचालय असावे या विचाराला थारा नव्हता. परंतु राज्य शासनाने स्वच्छ भारत अभियानच्या धर्तीवर १५ मे २०१५ पासून स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सुरू केले.

स्वच्छता, शौचालयाविषयी जनजागृती झाली. महानगरपालिकेने दारोदारी जाऊन लाभार्थ्यांची नोंदणी केली. कुटुंबप्रमुख म्हणून रंगनाथ मुळे यांचीसुद्धा शौचालय नसलेल्या लाभार्थ्यांमध्ये नोंद झाली. शौचालय बांधण्याचा अनुसयाबाईंनी निर्धार केला.

### निर्धार पक्का

शौचालय बांधण्याकरिता महानगरपालिकेचे कर्मचारी प्रत्यक्ष अनुसयाबाईंच्या घरी येऊन मार्गदर्शन करून गेले. नगरसेवकांनी पुढाकार घेतला. राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात पालिकेने स्वनिधीतून रक्कम दिली. बांधकामाकरिता कुशल कामगार, आवश्यक बांधकाम साहित्य पुरवठादार उपलब्ध होते. आता फक्त बांधकामाला सुरुवात करायची होती. मात्र मुळे कुटुंबासमोर प्रश्न होता तो जागेचा. शौचालय मंजूर झाले खरे, परंतु ते बांधायचे कोठे याची चिंता त्यांना लागली होती. कारण वरील सर्व सुविधा शासन उपलब्ध देत असले तरी त्यासाठी जागा मात्र स्वत:च उपलब्ध करू द्यावी लागणार होती. घर अगदी छोटेसे. घरासमोर थोडीदेखील जागा नाही. घराचे दार उघडले की, पहिले पाऊल रस्त्यावरच. जागेचा प्रश्न सोडवल्याशिवाय शौचालयाचा प्रश्न मार्गी लागणार नव्हता. शौचालय नाकारले तर रोजची १.५ किलोमीटरची पायपीट ठरलेलीच. यावर उपाय एकच होता. राहत्या घराची समोरील एक खोली जमीनदोस्त करून त्याजागी शौचालय उभारायचे. मात्र मोलमजुरी करून पै-पै जोडून उभारलेले छोटेसे घर तोडण्याचा त्यांनी खंबीर मनाने निर्णय घेतला आणि शौचालय उभारले. त्यांच्या लेखी या घराची किंमत शहरातील फ्लॅट संस्कृतीपेक्षा तुलनेने निश्चित जास्त होती. परंतु महाराष्ट्रात स्वच्छतेची सप्तपदी पूर्ण करण्याकरिता, आपला खारीचा वाटा म्हणून; त्यांनी शौचालयासाठी घर तोडण्याचे धाडस दाखवले. शौचालय उभे राहिले. घर तोडण्याच्या दु:खापेक्षा शौचालय उभे राहिल्याचा आनंद कितीतरी पटीने त्यांच्या चेहऱ्यावर झळकताना दिसला.

## प्लास्टिकच्या पुनर्वापरातून रस्ता

टाकाऊ कचऱ्यातील प्लास्टिकच्या पिशव्यांचा तसेच इतर तत्सम प्लास्टिक घटकांचा वापर करून वेंगुर्ले नगरपरिषदेने वेंगुर्ले शहरात २०० मीटर लांबीचा मजबूत व टिकाऊ रस्ता तयार केला आहे. प्लास्टिक मिश्रित घटकांनी डांबरीकरण केलेला महाराष्ट्रातील हा अशा प्रकारचा पहिलाच रस्ता आहे.

### महाराष्ट्रातील पहिला प्रयोग

स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) अंतर्गत वेंगुर्ले नगरपरिषदेने हा उपक्रम यशस्वीरीत्या राबवला. कचरा डम्पिंग ग्राऊंडवर वेंगुर्ले शहरातून चतु:सूत्री पद्धतीने ओला, सुका, प्लास्टिक तसेच काच व धातू या



## स्वच्छ घर, सुंदर शौचालय

माझे नाव सुखदेव साखरे. वय ३८. गॅरेजमध्ये मेकॅनिक म्हणून काम करतो. पत्नी व दोन मुलांसह नागपूर शहरातील भिवसेन खोरी झोपडपट्टीत अनेक वर्षापासून राहतो. घरात कमावता माणूस मी एकटाच. तसे तर बायकोही मिळेल ते काम करते. तेवढेच मीठमिरचीला हातभार लागतो. नाईलाजाने एक झोपडे बांधले. परंतु जिथे झोपडीचे आयुष्य तिथे शौचालय व बाथरुम बांधायची काय बिशाद?

मात्र एक दिवस पालिकेचे अधिकारी ज्यांच्या घरी शौचालय नाही त्याबाबत सर्वे करायला आले. आमचे नगरसेवकही सोबत होते. त्यांनी स्वच्छ भारत योजनेंतर्गत सरकार शौचालय बांधायला १२,०००/- रुपये देणार आणि महापालिका ४,०००/- रुपये असे देणार मात्र, ताबडतोब शौचालय बांधले पाहिजे असे सांगितले. आमचा फोटो, बँक खाते पुस्तकाची झेरॉक्स, आधारकार्डाची प्रत दिली. लागलीच पहिला हप्ता म्हणून ८,०००/- रुपये मिळाले त्यातून कामाला सुरुवात केली. काही पदरचे पैसे, उधारपाधार करून शौचालय बांधले, मग पालिका अधिकाऱ्यांनी पाहणी करुन उरलेले ८,०००/- रुपये दिले.

गेली अनेक वर्षे आम्ही वस्तीजवळच्या मैदानात शौचास जात होतो. कुचंबणा होत असे. भल्या पहाटे, रात्री ठीक होते, मात्र दिवसा खूपच संकोच वाटे. मात्र नाइलाज होता. परंतु स्वच्छ भारत मिशन अंतर्गत घराला लागूनच शौचालय बांधता आला. खरं सांगू... माझ्या झोपडीपेक्षा माझा शौचालय देखणा अन् मजबूत आहे. आमच्या वस्तीत सगळ्यांनीच योजनेचा फायदा घेतला आहे. त्यामुळे मोठी सुविधा निर्माण झाली आहे. एवढे कष्ट करुन साधा शौचालय बांधू शकलो नव्हतो, तर पक्के घर कुठून बांधणार! आता मात्र असे वाटतेय की, सरकारने आम्हा गरिबांसाठी घरं बांधायची अशीच एखादी योजना आणली तर थोडे पैसे सरकारचे, थोडे आमचे आणि थोडे बँकेचे कर्ज दिले तर आम्हालाही ह्या जगात हक्काचं घर मिळेल.

गावाकडून येणाऱ्या माझ्या पाहुण्यांनाही खूप बरे वाटते, ह्या निमित्ताने सरकारी लोक चांगली मदत करतात. आपण आपल्याकडून एक पाऊल टाकले की, सगळी कामे सोपी होतात हेही लक्षात आले. कुठेही खेटे न मारता, वणवण न करता विनासायास आम्हाला शौचालय मिळाले यासाठी पालिका अधिकारी, आमचे नगरसेवक आणि सरकारचे मन:पूर्वक आभार!

**- सुखदेव साखरे**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
**सप्तपदी स्वच्छतेची**

स्वरूपात कचरा संकलित केला जातो. त्यानुसार संकलित झालेला प्लास्टिकचा कचरा क्रशर मशीनमध्ये टाकून तो बारीक केला जातो. हा बारीक झालेला प्लास्टिकचा भुसा नंतर रस्ता तयार करण्याकरिता गरम करण्यात आलेल्या डांबरामध्ये १२० ते १६० डिग्री तापमानाला वितळवला जातो. तयार झालेले हे मिश्रण रस्ता तयार करण्याकरिता वापरले जाते. डांबरामध्ये प्लास्टिक अशा मिश्रणातून तयार करण्यात आलेला रस्ता हा टिकाऊ, मजबूत तसेच अधिक वर्ष वापरण्यास योग्य राहतो. भारतात अशा प्रकारचा प्रयोग बंगळूरू महापालिकेने केला असून तो यशस्वी झाला आहे.

### पुनर्वापरातून कचरामुक्ती

प्लास्टिकमुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या निर्मुलनासाठी हा उत्तम फायदेशीर पर्याय आहे. लोकसहभाग, प्रशासन व व्यवस्थापनामुळे वेंगुर्ले नगरपरिषद प्लास्टिकमुक्त व कचरामुक्त बनली आहे. दररोज संकलित केल्या जाणाऱ्या कचऱ्यापासून वीजनिर्मिती, बायोगॅस, ब्रिकेट त्याचबरोबर कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वेंगुर्ले शहरात अंदाजे सहा एकर जागेत कचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प विकसित करण्यात आला आहे. या प्रकल्पात दररोज दीड ते दोन टन ओला कचरा, साडेचार ते



**वेंगुर्ला येथे पुनर्प्रक्रिया केलेल्या प्लास्टिकपासून तयार झालेला रस्ता.**

पाच टन सुका कचरा, तसेच ५० किलो प्लास्टिक कचरा संकलित केला जातो. ओल्या कचऱ्यापासून वीजनिर्मिती, बायोगॅस आणि सुक्या कचऱ्यापासून इंधनासाठी उपयुक्त असणारे ब्रिकेट्स बनवले जाते. त्याचबरोबर संकलित झालेल्या काचेच्या व धातूच्या बाटल्या पुनर्प्रक्रियेसाठी देण्यात येतात. या विक्रीपासून उपलब्ध झालेला निधी हा पुन्हा याच प्रकल्पाच्या आवश्यक खर्चासाठी वापरला जातो.

**श्रावण हार्डीकर, आयुक्त, नागपूर मनपा;**
**राहुल खंडारे, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) आणि**
**टीम लोकराज्य**

## नमामी चंद्रभागा



पंढरपूर तीर्थक्षेत्र स्वच्छ आणि सुंदर करताना लाखो वारकऱ्यांच्या मनात सामाजिक समतेचा आध्यात्मिक वारसा प्रवाहित करणारी चंद्रभागा नदी शुद्ध करणार असल्याचे वित्त आणि नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथिगृहात 'नमामी चंद्रभागा' कार्यक्रमांतर्गत पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आणि चंद्रभागा नदीचे शुद्धीकरण यासंबंधीची आढावा बैठक वित्तमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली त्या वेळी त्यांनी ही माहिती दिली. बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव सुनील पोरवाल व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पंढरपूरची चंद्रभागा नदी ही महाराष्ट्राच्या निखळ, निरागस श्रद्धेचा मानबिंदू आहे. वारकरी आणि चंद्रभागा यांचे नाते अतूट असल्याने चंद्रभागेच्या पावित्र्याचे आणि निर्मळतेचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. हे लक्षात घेऊनच राज्य अर्थसंकल्पात 'नमामी चंद्रभागा अभियान' घोषित करण्यात आले आहे. शासन आणि लोकसहभागातून हे अभियान राबवताना पंढरपूर क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यालाही शासन प्राधान्य देणार आहे.

## महानगरांचा सुनियोजित विकास

महाराष्ट्रातील महानगर प्रदेशांचा सुनियोजित आणि शिस्तबद्ध विकास करण्यासाठी या प्रदेशांच्या विकासाचे एकात्मिक नियोजन व समन्वयन करणे गरजेचे होते. त्या दृष्टीने प्रस्तावित महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अध्यादेशाच्या मसुद्याला मंत्रिमंडळाने नुकतीच मान्यता दिली.

महाराष्ट्रातील महानगर प्रदेशात येणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषद तसेच परिसरातील गावांचा जलद, गतिमान विकास करण्याबरोबरच विविध प्रकल्प राबवताना सुसूत्रता राहण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे प्राधिकरण स्थापन करून त्यास संविधानिक दर्जा देण्याच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या अध्यादेशाच्या मसुद्यास ही मान्यता देण्यात आली.

# तारांकित

## 'कायाकल्प'चे मानकरी

रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या रुग्णाला दर्जेदार सुविधा देण्यासोबत त्यांच्याशी संवाद साधणे गरजेचे आहे. नागरिकांमध्ये आरोग्य सेवेबाबत असलेल्या शंका दूर करून जिल्हा रुग्णालय हे 'आपलं रुग्णालय' आहे अशी संकल्पना रुजवणे गरजेचे आहे. जोपर्यंत ही संकल्पना सर्व सामान्यांच्या मनात रुजणार नाही, तोपर्यंत परिवर्तन होणे शक्य नाही त्यामुळे सर्वांनी रुग्णालयात स्वच्छतेला प्राधान्य देऊन काम करणे आवश्यक आहे. हे कार्य उत्तम प्रकारे करणाऱ्या जिल्ह्यांना राज्यस्तरीय कायाकल्प पुरस्काराने गौरवण्यात येते.

जिल्हा रुग्णालयांमध्ये रुग्णांना उत्तम व



दर्जेदार आरोग्य सेवा, स्वच्छता, सोयी सुविधा पुरवणारे सातारा जिल्हा रुग्णालय राज्यस्तरीय 'कायाकल्प' पुरस्काराचे प्रथम मानकरी ठरले आहे. तर द्वितीय पुरस्कार नंदूरबार जिल्हा रुग्णालयाने पटकवला असून हे पुरस्कार आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. सह्याद्री अतिथिगृहात सार्वजनिक आरोग्य विभाग आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या संयुक्त विद्यमाने 'कायाकल्प' पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. जिल्हा रुग्णालय नाशिक, रत्नागिरी, पुणे यांना प्रोत्साहनपर प्रत्येकी रुपये ३ लाख, मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

## सर्वोत्कृष्ट 'रिंगण' रिंकूही सन्मानित




६३ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे राष्ट्रपती प्रणब मुखर्जी यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. 'रिंगण'ला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रिंगण चित्रपटाचे दिग्दर्शक मकरंद माने आणि निर्माते तथा 'माय रोल मोशन पिक्चर्स'चे विठ्ठल पाटील यांनी पुरस्कार स्वीकारला. प्रत्येकी रजत कमळ आणि १ लाख रूपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी नागराज मंजुळे दिग्दर्शित 'सैराट' चित्रपटातील अभिनेत्री रिंकू राजगुरूचा विशेष उल्लेखनीय कामगिरीसाठी सन्मान करण्यात आला.

या पुरस्कार सोहळ्यात सर्वोत्कृष्ट गायकाचा पुरस्कार महेश काळे यांना 'कट्यार काळजात घुसली' या चित्रपटाच्या पार्श्वगायनासाठी प्रदान करण्यात आला, रजत कमळ आणि ५० हजार रोख असे पुरस्काराचे स्वरूप आहे. उत्कृष्ट शैक्षणिक लघुपटासाठी 'पायवाट' या चित्रपटाला सन्मानित करण्यात आले. निर्माते दिग्दर्शक मिथुनचंद्र चौधरी आणि दिग्दर्शक नयना डोळस यांनी पुरस्कार स्वीकारला. प्रत्येकी रजत कमळ आणि ५० हजार रोख असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

## कौतुक 'सैराट'चे



**मराठी चित्रपटसृष्टीत अनेक विक्रम प्रस्थापित केलेल्या 'सैराट' चित्रपटाच्या टीमने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. या वेळी मुख्यमंत्र्यांनी संपूर्ण टीमचे मन:पूर्वक कौतुक केले. या वेळी या चित्रपटाचे दिग्दर्शक नागराज मंजुळे, अभिनेता आकाश ठोसर, अभिनेत्री रिंकू राजगुरू व इतर मान्यवर उपस्थित होते.**

# तारांकित

## महात्मा फुले यांच्या जीवनावरील चित्रपट निर्मितीला गती

थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनावरील चित्रपट निर्मितीचा गेली १२ वर्षे रेंगाळलेल्या प्रस्तावावर तत्काळ कार्यवाही सुरू करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यामुळे या थोर समाजसुधारकाच्या १२५ व्या स्मृतीवर्षात चित्रपटाची निर्मिती आणि प्रदर्शन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याद्वारे



सरकारकडून त्यांना अनोखी आदरांजली अर्पण केली जाणार आहे.

महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनावर पूर्ण लांबीचा चित्रपट निर्माण करण्याचा निर्णय दि. २४ जुलै २००२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. त्यानुसार १५ मार्च २००३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. या निर्णयानुसार हा चित्रपट केंद्र शासन, महाराष्ट्र शासन आणि मध्य प्रदेश शासन यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्याचे ठरवण्यात आले होते. या चित्रपटाच्या निर्मितीची जबाबदारी राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळावर (एनएफडीसी) सोपवण्यात आली होती. या निर्णयात पुढील चार वर्षांच्या कालावधीत चित्रपट पूर्ण करण्यात येईल, असे निश्चित करण्यात आले होते. मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे हा रेंगाळलेला प्रकल्प आता पूर्णत्वास जाणार आहे.

## गोंदियात सारस पक्षी पर्यटन



गोंदिया जिल्ह्यात दुर्मीळ व हळूहळू नामशेष होत चाललेल्या सारस पक्षांच्या संरक्षण आणि संवर्धनाचा पक्षी व वन्यप्रेमी जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संकल्प केला आहे. जुलै महिन्यामध्ये अंडी घालणाऱ्या या पक्षाच्या संवर्धनासाठी पक्षी प्रेमींच्या सहकार्याने जिल्हा प्रशासनाने मोहीम राबवण्याचे ठरवले आहे. जिल्ह्यातील पर्यटनाचे प्रमुख आकर्षण असणाऱ्या सारस पक्षाची संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. गेल्यावर्षी झालेल्या सारस महोत्सवानंतर यासंदर्भातील संवर्धनाला गती आली असून वन्यजीवांनी समृद्ध असलेल्या गोंदिया जिल्ह्यामध्ये स्थलांतरित म्हणून येणारे देशविदेशातील शेकडो पक्षी पर्यटकांसाठी आकर्षण ठरू शकतात. त्यादृष्टीने विशेष प्रयत्न केले जातील.

## डॉ. बाबासाहेबांचा ३५० फूट उंचीचा पुतळा

इंदू मिल येथील जागेवर उभारण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या आराखड्याचे काम वेगाने करण्यात येत आहे. या ठिकाणी डॉ. आंबेडकर यांचा सुमारे साडेतीनशे फूट उंचीचा पुतळा बसविण्यात येणार असल्याचे सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांनी सांगितले.



इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रीय स्मारकाच्या बृहत आराखड्यासंदर्भात झालेल्या बैठकीत श्री. बडोले यांनी ही माहिती दिली. यावेळी स्मारकाचे वास्तुरचनाकार शशी प्रभू, रिपब्लिकन पार्टीचे नेते डॉ. राजेंद्र गवई, आनंद खरात, मुंबई नगररचना विभागाचे उपसंचालक संजय बाणाईत, बृहन्मुंबई महानगर पालिकेचे साहाय्यक अभियंते एन. एन. भोईर, प्रदीप यादव, संपत कुमार आदी या वेळी उपस्थित होते. इंदू मिल येथील स्मारकामध्ये डॉ. आंबेडकर यांचा स्टॅच्यू ऑफ इक्विटी उभारण्यात येणार आहे. याशिवाय संसदेची प्रतिकृती, ग्रंथालय, वस्तुसंग्रहालय, चार हजार आसनक्षमतेचे विपश्यना सभागृह, आर्ट गॅलरी आणि १५०० लोकांसाठीचे सभागृह उभारण्याचे नियोजन आहे. तसेच आधुनिक डिजिटल माध्यमांचा वापर करून, डॉ. आंबेडकर यांचे जीवनचरित्र मांडण्यात येईल. त्यामध्ये डॉ. आंबेडकर यांचे भाषण ऐकण्याची व्यवस्था केली जाणार आहे. डिजिटल चलचित्रांचाही समावेश करण्यात येणार आहे.

# तारांकित

## महाराष्ट्राच्या फ्लोरेंस नाइटिंगेल

परिचारिका आरोग्य प्रणालीचा कणा आहेत. आरोग्यांच्या सर्वच पैलूंवर जसे पोलिओ निर्मूलन, मिडवाइफ सेवा, सामुदायिक शिक्षण, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांमध्ये परिचारिका महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात, असे प्रतिपादन राष्ट्रपती प्रणब मुखर्जी यांनी केले.

फ्लोरेंस नाइटिंगेल यांचा १२ मे हा जन्म दिवस आंतरराष्ट्रीय परिचारिका दिवस म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने केंद्रीय



आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्यावतीने राष्ट्रपती भवनात फ्लोरेंस नाइटिंगेल राष्ट्रीय पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी राष्ट्रपती बोलत होते. या प्रसंगी महाराष्ट्रातील २ परिचारिकांना फ्लोरेंस नाइटिंगेल राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले. यामध्ये दौंड (जि. पुणे) येथील जिल्हा उपविभागीय रुग्णालयात साहाय्यक व्यवस्थापक म्हणून कार्यरत असलेल्या मीरा परदेशी व पालधी (ता. जामनेर, जि. जळगाव) येथील आरोग्य उपकेंद्रातील ऑक्झिलरी नर्स मीडवाइफ ज्योती भांगळे यांचा समावेश आहे.

पुरस्काराचे स्वरूप ५० हजार रुपये रोख, पदक तथा प्रशस्तिपत्र असे आहे.

## राजभवनातील ऐतिहासिक जागा प्रकाशात




१ मे २०१६ रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ५६ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दिनांक १ मे १९६० रोजी प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य निर्मितीचा समारंभ व राज्याच्या नकाशाचे अनावरण ज्या ठिकाणी झाले, त्या राजभवनातील ऐतिहासिक जागेवर महाराष्ट्राचा नकाशा असलेली कोनशीला ठेवण्यात आली. या वेळी नव्याने उभारलेल्या १५० फूट उंच राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली.

राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डी. एच. वाघेला, केंद्रीय रेल्वे मंत्री सुरेश प्रभू, अपारंपरिक ऊर्जा मंत्री पीयूष गोयल, विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक निंबाळकर, विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, शिक्षण मंत्री विनोद तावडे, वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार व पर्यावरण मंत्री रामदास कदम, महापौर स्नेहल अंबेकर, अभिनेते आमीर खान व इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कोनशीला ठेवल्यामुळे राजभवनातील 'जल विहार' या वास्तूबाहेरील ही जागा प्रथमच प्रकाशात आली आहे. कोनशिलेचे अनावरण झाल्यानंतर राजभवनाच्या हिरवळीवर 'लोकधारा' हा सांस्कृतिक कार्यक्रम झाला.

राज्यपालांच्या हस्ते या वेळी रेल्वे मंत्री सुरेश प्रभू, आप्पासाहेब धर्माधिकारी, अभिनेते आमीर खान यांसह निवडक मान्यवरांचा; महाराष्ट्राच्या नकाशाची प्रतिकृती असलेले स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

## पालघरमध्ये 'वारली आदिवासी हाट'

आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'दिल्ली हाट' च्या धर्तीवर आदिवासी कला संस्कृतीच्या प्रसिद्धीसाठी पालघर जिल्ह्यात 'वारली आदिवासी हाट' बांधण्यात येणार आहे, असे आदिवासी विकासमंत्री विष्णू सवरा यांनी सांगितले. महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृतीची ओळख करून देण्याकरिता तसेच आदिवासी कारागिरांच्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी पालघर जिल्ह्यातील मनोर येथे 'वारली आदिवासी हाट' उभारण्यात येणार आहे.

यासाठी पुरेशा निधीची तरतूद करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली असून या प्रकल्पासाठी वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

# तारांकित

## केंजळच्या गावकऱ्यांनी केला शाळेचा कायापालट

मुंबई बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर पुण्यापासून चौतीस किमी अंतरावर असलेल्या किकवी या फाट्यापासून तीन किमी. अंतरावर निरा व गुंजवणी नदी संगमावर वसलेले १८८६ एवढ्या लोकवस्तीचे केंजळ हे गाव. गाव तसे सधन. विविध जातीधर्माचे लोक येथे गुण्यागोंविदाने राहतात. गावातील जिल्हा परिषद शाळा स्थापनेचे शताब्दी वर्ष अनोख्या रीतीने साजरे करण्याचे गावकऱ्यांनी ठरवले. लोकसहभागातून व शासकीय निधीतून दोन कोटी रुपयांची शाळेची नवीन भव्य इमारत बांधून गावातील मुलांना गावातच दर्जेदार व



सर्वांगीण विकास साधता येईल, अशा शिक्षणाची सोय करून दिली. या दोन कोटींपैकी एक कोटी निधी हा लोकसहभागातून उभा राहिलेला आहे.

या शाळेत बदल घडायला सुरुवात झाली ती १९९१ साली. शिक्षक जे.के. पाटील यांनी सुरुवातीला मुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी सर्व सहकारी शिक्षकांच्या मदतीने विविध शैक्षणिक उपक्रम राबवायला सुरुवात केली. शताब्दी वर्षासाठीदेखील सर्वजण एकत्र आले. या शाळेचे माजी विद्यार्थी जि.प. सदस्य चंद्रकांत बाठे, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व गावातील शिक्षणप्रेमींच्या माध्यमातून वर्षभरात शाळेची भव्य इमारत उभी राहिली. शाळेचा ८१ गुंठे परिसर सुशोभित केला गेला.

# अष्टपैलू बाबासाहेब



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर आधारित आंतरराष्ट्रीय विचार परिषद मुंबई विद्यापीठात दिनांक १४-१५ एप्रिल २०१६ रोजी पार पडली. या वेळी अनेक देशातील विचारवंत सामील झाले होते. सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांच्यासोबत विविध देशांतून या परिषदेत सहभागी झालेले बौद्ध भिख्खू.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर आधारित आंतरराष्ट्रीय विचार परिषद मुंबई विद्यापीठात १४-१५ एप्रिल रोजी पार पडली. देशविदेशातील अर्थतज्ज्ञ, विचारवंत, पत्रकार, प्राध्यापक, म्यानमार, श्रीलंका, भूतान, व्हिएतनाम आणि भारतातील पूज्य भंतेगण तसेच श्रीलंकेचे न्यायमंत्री तथा बुद्धासनमंत्री, भारताचे केंद्रीय राज्यमंत्री, राज्याचे मुख्यमंत्री, शालेय शिक्षणमंत्री, सामाजिक न्याय मंत्री-राज्यमंत्री आदी मान्यवरांनी उपस्थित राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्वंकष तत्त्वांची केलेली मूलभूत मांडणी आणि मोठ्या संख्येने प्रेक्षकांची उपस्थिती या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणता येईल.**

**शुद्धोदन कठाडे**

दोन दिवस चाललेल्या या परिषदेत विविध विषयांवर आयोजित चर्चासत्रे, परिसंवाद आणि संगीतमय कार्यक्रमात श्रोत्यांनी मोठ्या प्रमाणावर हजेरी लावली. देशाच्या विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेली आर्थिक, सामाजिक, आणि मूलभूत विकासविषयक धोरणांची नितांत गरज असल्याचा सूर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत विविध वक्त्यांच्या भाषणातून उमटला.

या परिषदेचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक कीर्तीचे मोठे नेते आणि समाजसुधारक होते, त्यांचे विचार जगभर पोहोचले पाहिजेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी केले.

या वेळी पियूष गोयल यांनी डॉ. आंबेडकरांच्या १२५व्या जयंतीवर्षानिमित्त महाराष्ट्र सरकारने अनेक कार्यक्रम हाती घेतल्याबद्दल कौतुक केले. सामाजिक न्याय मंत्री बडोले यांनी समता व सामाजिक न्याय वर्षातील कार्यक्रमांचा आढावा घेतला. ते म्हणाले, ''डॉ. आंबेडकरांचे हे १२५वे जयंती वर्ष विविध कार्यक्रमांनी साजरे करण्याचे ठरवले आहे. त्याचाच एक भाग म्हणून येथे बाबासाहेबांच्या विचारावर आंतरराष्ट्रीय परिषद घेतली आहे. डॉ. आंबेडकरांनी समाजातील जातीयता, अस्पृश्यता, निरक्षरता नष्ट होण्यासाठी अथक प्रयत्न केले. सामाजिक न्यायासाठी त्यांनी लढा दिला. महाराष्ट्र शासनाने डॉ. आंबेडकरांचे लंडन येथील वास्तव्यास असलेले घर खरेदी केले. इंदू मिलची जागा स्मारकासाठी ताब्यात घेतली. तसेच डॉ. आंबेडकरांचा संबंध आलेल्या संस्था, गावे अशा ५० स्थळांचा विकास करण्याचे ठरवले आहे.''

शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनीही या वेळी संबोधित केले. श्रीलंकेचे मंत्री विजयादासा राजपक्षे म्हणाले की, भारताने स्वातंत्र्यासाठी लढा दिला तर डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायासाठी लढा दिला. त्यांनी लिहिलेली राज्यघटना जगात आदर्श आहे. त्यांनी लिहिलेली पुस्तके जगभर वाचली जातात. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने आयोजित केलेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनाला खासदार रामदास आठवले, खासदार अरविंद सावंत, कुलगुरू संजय देशमुख, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव उज्ज्वल उके, विदेशातील प्रतिनिधी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात 'विकासाच्या पाऊलखुणा' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध धम्म या प्रथम सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारिता या चर्चासत्रात दै. सकाळचे राहूल गडपाले, मुक्त पत्रकार रवींद्र आंबेकर, टीव्ही आवाज इंडियाचे अमन कांबळे यांनी आंबेडकरी पत्रकारितेच्या अनेक पैलूंची मांडणी करून शोषितांचा आवाज बुलंद करणारी पत्रकारिता ही काळाची गरज असल्याचे अधोरेखित केले.

'आंतरराष्ट्रीय विचार परिषदेच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात 'भारतीय संविधान, संयुक्त राष्ट्र मानवाधिकार नियमावली आणि अल्पसंख्याक संरक्षण' या विषयावर जिनेव्हाच्या संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. ज्युलियन बर्गर, 'जातिव्यवस्था निर्मूलनासाठी बाबासाहेबांचे संघर्ष' या विषयावर आंबेडकर न्याय व शांती केंद्राचे

**''भारतीय राज्यघटना ही आदर्श घटना असून त्यामुळेच समाजातील शेवटच्या माणसाचा आवाज ऐकू येऊ लागला आहे. हा देश लोकसंख्येने मोठा आहे. येथे अनेक भाषा आहेत. येथील सामाजिक आणि आर्थिक प्रश्न वेगवेगळे आहेत. मात्र भारतीय राज्यघटनेने सर्वांना समान हक्क, न्याय देऊन एका सूत्रात बांधले आहे. पूर्वी देशातील प्रत्येक राज्यात एकाच गोष्टीसाठी वेगवेगळे कायदे होते. डॉ. आंबेडकरांनी त्यात सुसूत्रता आणून देशभर एकच कायदा केला. अनेक राज्य, अनेक भाषा, विविधता असली तरी भारतीय घटनेने सर्वांना समान न्याय, हक्क देऊन विकासाची समान संधी दिली आहे, हे बाबासाहेबांनी दिलेले मोठे योगदान आहे. केंद्रामध्ये श्रम, रोजगार, ऊर्जा, खनिज, जलनियोजन आणि कायदे मंत्री म्हणून काम करताना डॉ. आंबेडकरांनी अनेक चांगल्या योजना सुरू**



**केल्या. कामगारांसाठी उपयुक्त कायदे केले. जलनियोजनाच्या दृष्टीने भरीव काम केले. वीज निर्मितीसाठी अनेक उपाय करून योजना राबवल्या. भारतीय शेतकऱ्यांनी आधुनिक शेती करावी. त्याचबरोबर उद्योगधंदा सुरू करावा, तरच शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल असे बाबासाहेबांना वाटे. ही गोष्ट आज खरी ठरत आहे. देशभर उद्योगधंदे, कारखानदारी वाढली पाहिजे. त्यामुळे रोजगाराचा प्रश्न सुटून सर्वसामान्य माणसाचे जीवनमान उंचावेल असे आंबेडकर म्हणत. लंडनला गेलो असताना लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सला भेट दिली. तेथील विद्यार्थ्यांनी सांगितले, डॉ. आंबेडकर या स्कूलचे विद्यार्थी होते ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. हे एका भारतीय व्यक्तीने मिळवलेले मोठे यश आहे.''**

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्ध धम्माविषयीच्या दृष्टिकोनाबाबत मान्यवरांनी विचार मांडले. या सत्राचे अध्यक्ष श्रीलंकेचे पूजनीय बाणागल उपतिस्स महाथेरो होते. म्यानमार येथील भंते जागरालंकरा, भंते न्युगागोले, चंद्ररत्नथेसे (श्रीलंका), नग्युनेन अयिनाम (व्हिएतनाम), तिलोका (म्यानमार), कोविदा (म्यानमार), विमला (म्यानमार), कंदावरा (म्यानमार), वाई पोनेला (म्यानमार) तथा व्हिएतनाम येथील भंते तोहाचन टुंग, फान–अन–डिआॅक, फा–थि–किंग ह्युआँग थाओ, थुनस्टान लुहंद तसेच भारतातील भंते नग्युसेन थी–टाम–कु आदींनी यात सहभाग घेतला.

नियोजन आयोगाचे माजी सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आधुनिक भारताचे शिल्पकार या विषयावर तात्त्विक मांडणी केली. आर्थिक समानतेचा सिद्धान्त बाबासाहेबांनी मांडल्यामुळे भारतातील शोषित आणि वंचित मागासवर्गीयांना त्यांच्या आर्थिक प्रगतीकरिता समान संधी प्राप्त झाल्याचे त्यांनी नमूद केले.

ज्येष्ठ पत्रकार श्रीमती राही भिडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या अध्यक्ष योगेश वऱ्हाडे, 'संविधानाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण' या विषयावर भारतीय सार्वजनिक प्रशासन संस्थेच्या प्रा. श्रीमती सुषमा यादव, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार' या विषयावर कॅनडा यॉर्क विद्यापीठाचे डॉ. सॅम लॅनफ्रॅन्को, एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. के.एस. इंगोले, मुंबई विद्यापीठाचे समन्वयक डॉ.संदेश वाघ यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यातील अनेक पैलूंवर मार्गदर्शन केले.

आंतरराष्ट्रीय आंबेडकरी विचार परिषदेत देशविदेशातील दोन हजार तर समारोपाच्या दिवशी तब्बल चार हजार श्रोते, विचारवंत, अभ्यासकांनी हजेरी लावून पहिल्यांदाच पार पडलेल्या या विचार परिषदेत उपस्थिती दर्शवली आणि अशाच वैचारिक परिषदांची आवश्यकता असल्याचे या वेळी सांगितले.

(लेखक हे माध्यम समन्वयक आहेत.)
संपर्क : ०९८६७६५३३११



# कल्पवृक्ष चैतन्याचा

वडाच्या झाडाला ‘कल्पवृक्ष’ आणि इच्छापूर्ती करणारा वृक्ष मानले जाते. या झाडाचे आयुष्यदेखील जास्त असते आणि पारंब्यांनी त्याचा विस्तारही होत जातो. सात जन्माचा साक्षीदार ठरेल एवढे आयुष्य वडाला लाभले असल्याने त्याला साक्षी ठेऊन, त्याची पूजा करून त्याच्याकडे स्त्रिया ‘मला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न, दीर्घायुष्य लाभू दे, धनधान्य व मुले/नातू यांनी माझा प्रपंच विस्तारित व संपन्न होऊ दे’ अशी प्रार्थना करतात. वृक्ष हे सचेतन असून त्यात देवता किंवा विविध प्रकारच्या चांगल्या-वाईट शक्ती असल्याचे समजले जाते. त्यामुळे संकट निवारणासाठी किंवा शुभ फळासाठी, मनोकामना पूर्ण करण्यासाठी अनेक देशात वृक्षपूजा प्रचलित आहे. प्राचीन भारतात वृक्षपूजा मोठ्या प्रमाणात केली जात असे. यासंबंधीचे उल्लेखही धार्मिक ग्रंथांत आढळतात. वड, पिंपळ इ. वृक्ष हे गंधर्व, अप्सरा, यक्षकिन्नर इत्यादींची निवासस्थाने मानली गेली आहेत. काही वृक्षांमध्ये देवाची चेतना असल्याची श्रद्धा आहे. वृक्षपूजा ही केवळ भारतातच नव्हे तर जगभर केली जाते. ग्रीसमधील ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत विजयी

**वटवृक्ष हा जेवढा विशाल, दीर्घायुषी आहे. तेवढाच तो उपयोगी देखील आहे. त्याचे औषधीमूल्य अधिक असून औषधशास्त्र व आयुर्वेदामध्ये त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याची पाने, साल, बीज, फळ, पानातून निघणारा पांढरा द्रव आदींचा वापर अतिसार, मधुमेह, दंत तसेच लघवीसंबंधीच्या आजारावरील औषधांमध्ये केला जातो. शिवाय याची साल कागद व दोरखंड बनवण्यासाठी वापरली जाते. अशा या बहुगुणी वृक्षाची पूजा वटपौर्णिमेला होणे यथोचित म्हणावे लागेल.**

झालेला वीर हा वृक्षदेवाचा मानवी प्रतिनिधी मानला जात असे. त्याच्या मुकुटाची सजावट झाडाच्या कोवळ्या पानांनी आणि डाहाळ्यांनी केलेली असे. नाताळच्या सणात ख्रिसमसचे झाड उभे करतात, हाही वृक्षांबद्दलचा आदरभाव दाखवण्याचा प्रकार आहे. वटपौर्णिमेला संपूर्ण वडाच्या झाडाची पूजा केली जाते. फांदी तोडून पूजा करण्याची प्रथा रुढ झालेली नाही. त्यामुळे काही समाजमान्य रीतीरिवाजांमुळे का हाईना वृक्षतोडीवर नियंत्रण आले. पूजेमुळे वृक्षराजीकडे बघण्याच्या दृष्टिकोनातही बदल होत असल्याचे दिसते.





## वडाची पूजा

पतीला उत्तम आरोग्य लाभावे, दीर्घायुष्य प्राप्त व्हावे, त्याची सोबत सात जन्मापर्यंत लाभावी यासाठी वटपौर्णिमेला सावित्रीचे व्रत सुवासिनी करतात. अनेक वर्षापूर्वी भद्र देशात अश्वपती नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला सावित्री नावाची कन्या होती. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिला आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याच्या धूम्रसेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून पराभूत झाल्यामुळे राजा आपल्या राणी व मुलासह जंगलात राहत होता. नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच आहे हे माहीत असल्यामुळे त्यांनी सावित्रीला त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला दिला. परंतु सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशीच विवाह केला व जंगलात येऊन नवऱ्याबरोबर सासू-सासऱ्यांची सेवा करू लागली. सत्यवानाचा मृत्यू जेव्हा तीन दिवसावर येऊन ठेपला तेव्हा तिने तीन दिवस उपवास करून सावित्रीव्रत आरंभले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्याबरोबर जंगलात गेली. लाकडे तोडता-तोडता त्याला घेरी आली आणि तो जमिनीवर पडला. त्याच क्षणी यमराज तेथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेकवेळा सावित्रीस परत जाण्यास सांगितले. परंतु तिने साफ नाकारले. यमराजाला आपल्या भक्तीने संतुष्ट केले व पतीच्या जीवनाची याचना केली. अखेर यमाने पतीचे जीवनदान सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासू-सासऱ्यांचे डोळे व राज्य परत मिळावे व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितले. यमराजाने लागलीच तथास्तु म्हटले. यमराजाला आपण नकळतपणे सत्यवानाला जीवनदान देण्याबाबत वचनबद्ध झाल्याचे लक्षात आले. सावित्रीने युक्तीने पुत्रप्राप्तीचा वर मागून सत्यवानाचे प्राण वाचवले. त्यामुळे यमराजास सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. ज्या वडाच्या झाडाखाली सत्यवान पुन्हा जिवंत झाले त्या झाडाची सावित्रीने मनोभावे पूजा केली, अशी पौराणिक कथा आहे.

त्यामुळे ज्येष्ठ महिन्याच्या पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करतात. उपवास करून वटसावित्री व्रत आचरतात.

## अशी करतात पूजा

सौभाग्याचे लेणं असलेल्या हिरव्या बांगड्या, शेंदूर, बुक्का, हळद-कुंकू, फुले, अक्षता, एक गळेसरी लेऊन स्त्रिया आपले सौभाग्य मरेपर्यंत अबाधित राहावे व जन्मोजन्मी हाच पती मिळावा, अशी प्रार्थना या दिवशी करतात. याशिवाय अत्तर, कापूर, पंचामृत, वस्त्र, विड्याची पाने, सुपारी, पैसे, गूळ, खोबऱ्याचा नैवेद्य, दुर्वा इ. साहित्य घेतात. प्रथम सुपारीच्या गणपतीची स्थापना केली जाते.

हळद-कुंकू, फुले, अक्षता वाहून त्याची पूजा केली जाते. या दिवशी उपवास केला जातो. पूजेनंतर वडाच्या बुंध्याला सूत गुंडाळत मनोभावे प्रदक्षिणा घालतात.

**सिद्धी बोबडे**

## पौराणिक महत्त्व

वटपौर्णिमेला पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाची पूजा करून खोडाला फेरे घेऊन सूत गुंडाळले जाते. हा परंपरेचा भाग असला तरी अनेकांना सूत का गुंडाळले याचे नेमके कारण माहीत नसल्याने अनेक सुवासिनी परंपरेचा भाग म्हणून ही प्रथा पाळतात.



दौलताबाद किल्ला

# वारसा देवगिरीचा...

**भारताच्या इतिहासामध्ये महाराष्ट्रातील देवगिरीचे यादव आणि छत्रपती शिवाजी महाराज या दोन महत्त्वाच्या राजसत्तांचे मोठे योगदान आहे. या दोन राजसत्तांमुळे महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासाला एक वेगळे वळण लागले. या दोन सत्ताकाळामध्ये स्थापत्यकलेचे दोन चमत्कार उभे राहिले. ते म्हणजे औरंगाबादनजीकचा दौलताबाद किल्ला आणि सह्याद्रीमध्ये उभा असलेला स्फूर्तीचा जिवंत झरा किल्ले रायगड. ज्यांच्या पायांना किल्ले कपारीचे वेध आहेत, ज्यांच्या श्वासात इतिहास आहे. त्या दुर्गप्रेमींना या दोन ऐतिहासिक वास्तूंना जागतिक वारसा म्हणून घोषित केले जाण्याची आस आहे.**

**डॉ. सचिन जोशी**

साधारणपणे १२–१३ व्या शतकात यादवांची राजधानी ही मराठवाड्यातील औरंगाबाद किंवा त्या वेळचे खडकी या गावाजवळ असलेल्या देवगिरी या किल्ल्यावर होती. यादवांनी देवगिरीच्या आधारे दख्खन, खानदेश, मराठवाडा, कोकण आणि दक्षिण भारत, एवढ्या परिसरावर राज्य केले. यादवांनी त्यांच्या राज्यात देवगिरी व्यतिरिक्त मुल्हेर, साल्हेर यासारखे किल्ले बांधले. पुढे १३ व्या शतकाच्या अखेरच्या दशकात अल्लाउद्दिन खिलजी याने उत्तरेकडून येऊन दख्खनमध्ये स्थिरस्थावर झालेल्या यादवांचा पराभव केला. यानंतर १३२४ च्या आसपास मुहम्मद बिन तुघलक याने त्याची राजधानी दिल्ली येथून देवगिरी उर्फ दौलताबाद येथे आणली. पण काही काळातच ती राजधानी त्याला पुन्हा दिल्ली येथे न्यावी लागली. यानंतर अनेक राजसत्तांनी दौलताबाद जिंकून घेतल्यावर आपापल्या सोयीनुसार किल्ल्यामध्ये अनेक बदल केले. देवगिरी किंवा दौलताबाद या किल्ल्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे हा किल्ला भुईकोट आणि डोंगरी अशा दोनही प्रकारात येतो. मागे डोंगरी किल्ला आणि पायथ्याला भुईकोट अशी या किल्ल्याची रचना दिसून येते. अशा प्रकारच्या किल्ल्यांना मिश्रदुर्ग अशी संज्ञा वापरली जाते. या प्रकारचे किल्ले भारतात जास्त ठिकाणी पाहायला मिळत नाहीत. किल्ल्याच्या भुइकोटामधे देखील अंबरकोट, महाकोट आणि कालाकोट असे तीन कोट बांधले आहेत. सर्वात बाहेरील भाग म्हणजे अंबरकोट या परिसरामध्ये आज दाट लोकवस्ती वाढलेली असून गाडी रस्त्याने अंबरकोटातून थेट महाकोटाच्या दरवाज्यासमोरच उतरता येते.

महाकोटातून चालत ५०० मी. पुढे गेल्यावर एका भव्य दरवाज्यातून कालाकोटात प्रवेश करता येऊ शकतो. मध्ययुगीन काळात इथपर्यंत येताना अंबरकोटाचा आणि महाकोटाचा खंदक पार करून यावे लागत असे. कालाकोटपासून पुढे डोंगरी किल्ल्याकडे जाताना मोठा कातळ खोदून तयार केलेला खंदक दिसून येतो. हा खंदक पार करण्यासाठी मध्ययुगीन काळात येथे एक पूल होता. सध्या एक कायमस्वरूपी भक्कम पूल बांधला असून त्यावरूनच डोंगरी किल्ल्याकडे जाता येते. किल्ल्यावर जाण्यासाठी एक वैशिष्ट्यपूर्ण वाट कातळ खोदून तयार केलेली आहे. या वाटेवर उजेड येण्यासाठी अजिबात जागा नाही. कातळातील या वाटेने आपण थेट किल्ल्याच्या शेवटच्या टप्प्यात पोहोचू शकतो. गडाच्या माथ्यावर बारादारी नावाची एक मोठी वास्तू असून त्याला बारा कमानी केलेल्या आहेत. दौलताबाद किल्ल्यावरील

वेगवेगळ्या बनावटीच्या तोफा हेदेखील गडावरील मुख्य आकर्षण आहे. मेंढा नावाची तोफ ही गडावर जाण्याच्या वाटेवर असल्यामुळे पर्यटकांच्या सहजच नजरेस येते. पण गडाच्या भुईकोटातील महाकोट परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी बांगडी प्रकाराने तयार केलेल्या किमान १० तोफा पाहता येऊ शकतात. कालाकोट परिसरात चीनीमहाल, राजवाडा, सदर, इ. ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या आणि उत्कृष्ट कलाकुसरीचा नमुना असलेल्या वास्तू आजही उभ्या आहेत. हिंदू आणि इस्लामिक स्थापत्यकलेतील वास्तू दौलताबाद किल्ल्यात दिसतातच पण काही यादवपूर्व काळातील जैन आणि हिंदू मंदिरांचे अवशेष आणि लेण्या ८०० वर्षांनंतरही येथे आपले अस्तित्व टिकवून आहेत.


## रायगड अद्वितीय

देवगिरीप्रमाणेच रायगड हा देखील एक अद्वितीय बांधकामाचा नमुना असलेला किल्ला आहे. किल्ल्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आणि वेगळेपण म्हणजे समुद्रसपाटीपासून ८५० मी. आणि पायथ्यापासून ७९० मी. उंचीवर असलेले राजधानीचे ठिकाण. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या


**दौलताबाद किल्ल्यावरील महाकाय तोफ.**


**दौलताबाद किल्ल्याचे दगडी कोरीव काम.**


**रायगड किल्ला**




मराठी साम्राज्याची राजधानी ही, अत्यंत दुर्गम आणि पोहोचण्यास कठीण अशा ठिकाणी वसवली होती. यापूर्वी भारताच्या इतिहासात शिलाहार राजांनी अशा स्वरूपाची पन्हाळा किल्ल्यावर राजधानी वसविली होती. दोघांमधील फरक एवढाच की पन्हाळा किल्ल्याची उंची पायथ्यापासून २३० मी. असून तेथे सहज पोचता येते. रायगड परिसरामध्ये आजही ३५००-४००० मिमी. पाऊस पडतो. मध्ययुगीन काळातदेखील या परिसरात एवढाच पाऊस पडत असे. अशा जास्त पावसाच्या प्रदेशात इतक्या उंचीवर राजवाडा, सदर, नगारखाना, मंदिरे, तलाव, इ. वास्तू बांधायच्या आणि त्याची योग्य प्रकारे देखभाल करून त्या टिकवायच्या हे त्या काळी एक मोठे आव्हान होते. आजही एवढ्या उंच ठिकाणी दुरुस्तीची कामे करताना पुरातत्त्व विभागाला कठीण जात आहे. रायगड किल्ल्याची नगररचना हा एक मोठा अभ्यासाचा विषय असून अनेक अभ्यासकांनी यावर पुस्तके लिहिली आहेत. या नगररचनेमध्ये राजवाडा, सदर, सरकारी कचेऱ्या, राण्यांचे महाल, दरबार, गडावरील अधिकाऱ्यांची घरे तसेच नोकरदारांची घरे यांची नीट व्यवस्था केलेली दिसते. गडावर ठिकठिकाणी पाणी अडवून तलाव बांधले आहेत तसेच खडकात पाण्याची टाकी खोदलेली आहेत. या तलावांचे आणि टाक्यांचे पाणी आज तब्बल ३०० वर्षांनंतर देखील पिण्यासाठी आपण वापरत आहोत. अशा प्रकारचे जलव्यवस्थापनाचे उत्तम उदाहरण भारतातील मोजक्याच किल्ल्यांवर दिसून येते. रायगड या राजधानीच्या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला आणि १६८० साली त्यांचा मृत्यू झाला. अशा अनेक महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांचा रायगड किल्ला साक्षीदार आहे.

जागतिक वारसा स्थळामध्ये एखादे महत्त्वाचे ठिकाण,वास्तू किंवा अनेक वास्तूंचा समूह अशा गोष्टींचा समावेश करता येतो. शिवकालीन दुर्ग हे जागतिक वारसा स्थळांमध्ये येऊ शकतात. कारण शिवाजी महाराजांची सत्ता ही महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या भागात पसरलेली होती आणि अगदी २५-३० वर्षाच्या काळात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे किल्ले बांधले आणि दुरुस्तही केले. या किल्ल्यांचे सह्याद्रीच्या उंच डोंगरावरील स्थान हे वैशिष्ट्यपूर्ण असेच आहे. शिवाजी महाराजांनी बांधलेले जलदुर्ग हे नक्कीच जागतिक वारसा स्थळे यामध्ये समाविष्ट होऊ शकतात. कारण अशा स्वरूपाचे जलदुर्ग भारताच्या गेल्या २००० वर्षांच्या इतिहासात कोणीही बांधलेले नाहीत. विशेष म्हणजे हे पाचही जलदुर्ग त्यांनी पश्चिम किनाऱ्यावर त्यांच्या कारकिर्दीत खूप कमी कालावधीत बांधलेले आहेत.

जागतिक वारसा स्थळांमध्ये महाराष्ट्रातील दौलताबाद, रायगड, परांडा, नळदुर्ग यांसारखे किल्ले येऊ शकतात. कारण युनेस्कोच्या नियमावलीनुसार ज्या वास्तूला हा दर्जा द्यायचा आहे त्या स्थळाला विशेष जागतिक महत्त्व असणे गरजेचे असते. या नियमावलीनुसार ते स्थळ मानवी कलाकृतीचा आणि अलौकिक बुद्धिमत्तेचा उत्कृष्ट नमुना असावे. तसेच त्या स्थळाला विशेष सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व असावे. ते स्थळ मोठ्या कालखंडातील स्थापत्यशास्त्राच्या तंत्रज्ञानाची प्रगती, स्थापत्यीय कला, नगररचना, इ. प्रदर्शित करणारे असावे. सर्वात महत्त्वाचा निकष असा की, ते स्थळ उत्तम बांधकामाचा, स्थापत्यकलेचा, मानवी तंत्रज्ञानाचा नमुना असावे आणि मानवाच्या इतिहासाचा एक मुख्य टप्पा दर्शवणारे असावे.

**(लेखक पुणे येथील डेक्कन महाविद्यालयात पुरातत्त्व विभागात संशोधक आहेत.)**
**संपर्क : ०९८२२१०९३६२**



# चिंब चिंब भिजायची स्थळे...

**रिपरिप म्हणा वा रिमझिम म्हणा... पाऊस पडला की मन मोहरतेच. अशात चिंबचिंब भिजायला आवडते. कधी ग्रुपमध्ये, कधी दोघांनाच तर कधी एकटेच मात्र भिजायचे असते. ओले व्हायचे असते. महाराष्ट्रासारख्या विस्तीर्ण पसरलेल्या राकट देशा... दगडाच्या देशानेही हे पावसाचे मोहरणे आपल्या काळजात हलकेच नोंदले आहे. महाराष्ट्रात पावसाळी पर्यटन स्थळे तुमची वाट पाहत आहेत.**

**चारुशीला बोधे**

पावसाळा सुरू झाला की अवघ्या महाराष्ट्राला आठवण होते ती माळशेज घाटाची. आकाशाला भिडलेल्या उत्तुंग कड्यांवर कोसळणारा मुसळधार पाऊस आणि शुभ्र खळाळत फेसाळत येणारे धबधबे, हिरव्या गालिच्यांवर हळुवार सरकणाऱ्या दाट ढगांची गर्दी, त्यातून वळणे घेत मध्येच बोगद्यात जाणारा रस्ता हे अनुभवायचे असेल तर अहमदनगर-कल्याण रस्त्यावरच्या माळशेज घाटात जायलाच हवे.

### माळशेज घाट

पुण्यापासून १२० किमी. अंतरावर व मुंबईपासून १२७ किमी. अंतरावर राष्ट्रीय महामार्ग २२२ वरील हा घाट आहे. पुण्याहून नारायणगावमार्गे माळशेज घाटात जाता येते. मुंबईहून कल्याणमार्गे देखील माळशेज घाटात जाता येते. तसेच या माळशेज घाटाचे वैशिष्ट्य म्हणजे येथील परदेशी पाहुणे फ्लेमिंगो पक्षी, ससा, घोरपड, मुंगुस, बिबळ्या प्राण्यांचे वास्तव्य. पावसाच्या सरींसोबतच प्राण्यांची साथ यामुळे तुमच्या आनंदात भर पडते.

माळशेज घाटात राहण्याची सोयदेखील उपलब्ध आहे. कल्याण-माळशेज रस्त्यावर घाटाच्या पायथ्याशी सावर्णे गावात रस्ता संपतो तेथेच हॉलिडे रिसॉर्ट उपलब्ध आहे. हॉटेलवर गाडी उभी करून शिदवी गावापर्यंत ३ किमी कच्च्या रस्त्याने चालत जावे लागते. स्थानिक वाटाड्या बरोबर असेल तर धबधब्यापर्यंत आपल्याला जाता येते. एक दिवसाची सहल म्हणून तुम्ही पावसाळ्यामध्ये धम्माल करण्यासाठी माळशेज घाटात जाऊ शकता.

### ठोसेघर धबधबा

पावसाच्या थेंबासोबतच निसर्गाची साथ, दाट हिरवळ आजूबाजूला पसरलेले दाट धुके, चिंब भिजण्यासाठी, पावसाचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी, तुमच्यासाठी अप्रतिम ठिकाण ठरू शकते. सातारा शहरापासून

२० किमी. अंतरावर असणारा ठोसेघर धबधबा, तुम्हाला अविस्मरणीय अनुभव देणारा आहे. अंगावर कोसळणारे तुषार आणि वातावरणातील गारवा मन अगदी चिंबचिंब करतात. त्याबरोबरच मित्रमैत्रिणींची सोबत मजा-मस्ती आनंद द्विगुणित करते. पावला-पावलावर १५ ते २० मीटर उंचीचे लहान-मोठे धबधबे डोळ्यांचे पारणे फेडतात. पावसाची सर, अंगावर कोसळणारे धबधबे, पक्ष्यांचे मधुर आवाज, रंगीबेरंगी फुलपाखरे, गर्द झाडी तुमच्या मनाला तजेला देतात. तुम्हाला मनमोकळा श्वास घेण्यास सांगतात. या धकाधकीच्या/धावपळीच्या जीवनातून थोडावेळा निसर्गाच्या सान्निध्यात नक्की या... मुंबईपासून २८० किमी अंतरावर ठोसेघर गाव आहे.

## भंडारदरा

भंडारदरा ३०० फूट उंचीचे थंड हवेचे ठिकाण आहे. भंडारदरा येथे धरणांचा संच आहे. सोबतच धबधबे व सुंदर निसर्गरम्य हिरवळ आहे. शिर्डीच्या मार्गाने जर प्रवास करत असाल तर शांततामय ठिकाण व घराबाहेर खेळण्यासाठी भंडारदरा याची निवड करू शकता. मुंबईपासून १८० किमी. व पुण्यापासून ८० किमी. अंतरावर हे ठिकाण आहे.

## लोणावळा-खंडाळा

सह्याद्रीच्या ऐन घाटमाथ्यावरील हे थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. विपुल वनराई, हिरवीगार निसर्गशोभा, वनश्रींनी भरगच्च भरलेले डोंगरमाथे, दऱ्या, पावसाळ्यात कडेलोट होऊन कोसळणारे धबधबे हे सर्व मनाला खूप सुखद वाटते. तसेच लोणावळा खंडाळ्याच्या जवळपास पाहण्यासारख्या बऱ्याच गोष्टी आहेत. राजमाची पॉइंट, वळवण धरण, भुशीधरण, कार्ला, भाजा येथील लेणी, लोहगड ही पर्यटन स्थळे आहेत. मुंबईपासून ८२ किमी अंतरावर लोणावळा आहे.

सोबतच सातारा शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असणारा अजिंक्यतारा गड सातारा शहराला ऐतिहासिक ओळख देणारा आहे. प्रतापगडापासून फुटणाऱ्या बामणोली रांगेवर अजिंक्यतारा उभारलेला आहे. अजिंक्यताऱ्याची उंची ३०० मीटर असून त्याचा दक्षिणोत्तर विस्तार ६०० मीटर आहे. सज्जनगडावर दोन बुरूज व डावीकडे प्रसारभारती केंद्राचे टॉवर बघण्याजोगे आहेत. संपूर्ण गड बघण्यासाठी किमान दीड तास लागतो.

## विदर्भ-मराठवाडा

मुक्तागिरी मेळघाटाच्या पायथ्याशी गुल्लर घाटरस्त्यावर सूर्य धबधबा, यवतमाळ जिल्ह्यातील सहस्त्रकुंडाचा धबधबा असो किंवा गोंदिया जिल्ह्यातील ढासगड किंवा दरेकसाजवळील हाजरा फॉल पर्यटकांना खुणावत असतो. सातपुडा पर्वत रांगांच्या कुशीत वसलेला चिचाटीचा धबधबा पर्यटकांना आकर्षित करतो. धरणी तालुक्यातील रानिगावाचा कंजोली धबधबाही तुमची वाट पाहतोय. मराठवाड्यातील पावसाळी पर्यटन स्थळामध्ये औरंगाबादमधील कैलास मंदिर (एलोरा लेणी) तसेच अजिंठा लेणी व पाणचक्की यांचा समावेश आहे. तसेच नांदेडमधील कंधार किल्ला, तुळजा भवानी मंदिर, धाराशिव लेणी या भागातही पावसाळ्यात पर्यटनाला वाव आहे.

**पावसाळी ट्रेकिंगसाठी खालील गडकिल्ले पर्यटकांना आकर्षित करतात.**

**राजमाची, तिकोना किंवा वितंडगड, कोरीगड, कळसुबाई शिखर, सज्जनगड, लोहगड, अजिंक्यतारा, सिंहगड किंवा कोंढाणा, हरिश्चंद्रगड.**

## चिखलदरा

विदर्भातील काश्मीर म्हणून ओळखले जाणारे चिखलदरा हे सातपुडा पर्वतरांगांमध्ये वसलेले आहे. दाट हिरवळीसोबतच धबधबे, तलाव यांची साथ यामुळे पावसात भिजण्याचा आनंद हा द्विगुणित होतो. चिखलदरा येथे असणारा गाविलगड किल्ला, किचकदरा यासारखी बरीच ठिकाणे पाहण्यासारखी आहेत. चिखलदऱ्याहून जवळच्या मेळघाट व्याघ्रप्रकल्पाला नक्की भेट द्या. मुंबईपासून ७६३ किमी अंतरावर चिखलदरा आहे. जवळचे रेल्वे स्टेशन अमरावती हे आहे. चिखलदरा हे महाराष्ट्र व मध्यप्रदेशची सीमारेषा आहे.



## पावसाळी ट्रॅकिंगची ठिकाणे

महाराष्ट्रामध्ये विविध भागात पावसाळी पर्यटनासाठी अनेक चांगली स्थळे उपलब्ध आहेत. यामध्ये माथेरानच्या कुशीत वसलेले भिवपुरी, दहीसरजवळील चिंचोटी, मुंबईपासून २ तासांच्या अंतरावर असणारे तुंगारेश्वर, सह्याद्रीच्या पर्वतरांगात विल्सनडॅमपासून तयार झालेला इगतपुरीजवळीत रांधा फॉल, खारघर परिसरातील पांडवकडा, खोपोली येथील झेनिथ धबधबा, मुंबई-पुणे महामार्गावरील पळसदरी, पनवेल परिसरातील गाढेश्वर धबधबा, फणसाड धबधबा, मुरुड-जंजिरा येथील सवतकडा, नवी मुंबई घणसोली गावाजवळील गवळीदेव धबधबा, बदलापूर जवळील कोंडेश्वर धबधबा, वांगणीजवळील भगीरथ धबधबा, नेरळजवळील टपालवाडी, भिवपुरीजवळील आषाणे धबधबा, माळशेज घाटाजवळील भिदबीचा धबधबा, निवळी घाटाजवळील निवळी धबधबा, कर्जतजवळील मोहिली धबधबा, मुरबाडजवळील पळुया धबधबा या ठिकाणी तुम्ही ट्रेकसुद्धा करू शकता. ठाणे जिल्ह्यातील जव्हार डोंगरदऱ्यामधील दाभोसा धबधबा, नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात असणारे कावनई, गडगडा, त्रिंगलवाडी, हरिहर, बसगड, अंजनेरी इत्यादींसारख्या बऱ्याच किल्ल्यांची सैर पावसात करता येते. धुळे-नंदुरबारजवळील तोरणमाळ हे ठिकाण पावसाळ्यात पाहण्यासारखे आहे. पुण्याहून भोरमार्गे महाडला जाणाऱ्या वाटेवर वरंधाघाट लागतो. वरंधाघाटालगतच कावळ्या या किल्ल्यावर जाता येते. डोंगरातून वाहणारे छोटे-छोटे झरे, धबधबे, बाजूला खोल दरी आणि त्यादरीत दिसणारे छोटेसे गाव आणि त्या गावालगत वाहणारी नदी असे वेड लावणारे सौंदर्य वरंधघाटात आहे. वारंधघाटात उतरल्यावर शिवथरघळ येथील गुहा आणि गुहेबाहेर पडणारा पाऊस आणि धबधबा म्हणजे क्या बात!

# क्षमतांना न्याय द्या

संघ लोकसेवा आयोगा (यूपीएससी)च्या परीक्षेची तयारी करणाऱ्या आणि करू इच्छिणाऱ्या उमेदवारांना माझ्याकडून सर्वप्रथम शुभेच्छा. या परीक्षेच्या माध्यमातून आयएएस, आयपीएस, आयएएफसोबतच इतर अनेक ग्रुप ए व बी च्या सेवांसाठी उमेदवारांची निवड केली जाते. उत्तम करिअरसोबतच व्यक्तिमत्त्व विकास आणि असंख्य अनुभव, अनेक चांगली कामे करण्याची संधी ही परीक्षा देते. या परीक्षेतून मिळणारी नोकरी, पद हे जेवढे मानाचे मानले जाते तेवढाच त्यागही आपल्याला करावा लागतो. परीक्षेपूर्वी अनेक गोष्टींचा मोह टाळून परिश्रम घेतले तर नक्कीच यश मिळते. त्यासोबतच यश मिळाल्यानंतर देशभरात जेथे पोस्टिंग मिळेल तिथे सेवा देण्याची तसेच बऱ्या-वाईट परिस्थितीत त्या पदाची प्रतिष्ठा जपणे, जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची सांगड घालणे ही तारेवरची कसरत करण्याची आपली तयारी असायला हवी.

या परीक्षेत यशस्वी होण्याचे प्रमाण अगदी नगण्य आहे. त्यामुळे या परीक्षेची तयारी करू की नको, असा विचार करणाऱ्यांसाठी मी सांगू इच्छितो की, आपण प्रथम आपले ध्येय निश्चित करावे. आपल्याला काय करायचे आहे ते आधी ठरवावे. कारण या परीक्षेच्या अभ्यासक्रमाची व्याप्ती जेवढी मोठी आहे तेवढेच लक फॅक्टरही. तयारी करण्याचा निर्णय घेतला असेल तर चांगलेच. मग मात्र १०० टक्के परिश्रम आणि स्वत:ला झोकून देऊन तयारी करण्याचे नियोजन ठेवावे.

### टर्निंग पॉइंट

आपला पिंड काय आहे हे कळायला कधी कधी थोडा वेळ लागतो. बहुतांश विद्यार्थ्यांचा हा इंजिनिअर करतोय म्हणून आपण करायचे, हा मेडिकलला चालला म्हणून आपणही जावे असा कल असतो. तो असणे साहजिकही आहे. मात्र ध्येय निश्चित असेल तर यश आणखी लवकर मिळते हे मात्र नक्की.

वडील हर्षद गवळी स्वत: कान-नाक-घशाचे ठाणे येथे सर्जन असल्याने स्टेथॉस्कोप आपसूकच माझ्या गळ्यात पडला. खरं तर तो मी पाडून घेतला. वडलांनी मी दहावीला असतानाच तू नागरी सेवेत जाऊन मोठा अधिकारी हो, असे सुचवले होते. परंतु त्यांच्या वैद्यकीय सेवेचा माझ्यावर बऱ्यापैकी प्रभाव पडलेला होता. त्यामुळे नागरी सेवा वगैरेचा विचार काही मनाला शिवला नाही. बारावीनंतर एमबीबीएस केले. डॉक्टर झालो. वर्षभर वैद्यकीय सेवा केली. परंतु एक वेळ अशी आली की, आपण केवळ आता एका क्षेत्रापुरते मर्यादित झालो असून इतर काही करू शकत नाही. नागरिकांच्या केवळ आजारांवर फुंकर घालू शकतो. त्यांच्या दु:खावर नाही. अनेक रुग्ण पाहिले, त्यांच्या अनेक समस्याही ऐकल्या. परंतु आपण त्यांच्या आजारावर उपचार करण्याव्यक्तिरिक्त ठरवले, तरी मदत करू शकत नसल्याची जाणीव वेळोवेळी होत गेली. डॉक्टरच्या खुर्चित, चौकटीत काहिसे अस्वस्थ वाटू लागले. या कामात वैविध्य आणि व्यक्तिमत्त्व विकासही शक्य होत नव्हता. दरम्यान वडलांचेही बोलही आठवू लागले. आता त्यांचे बोल, नागरी सेवेचे महत्त्व पटू लागले. नागरी सेवेत आलो तर आपण जनतेच्या अधिक उपयोगी पडू, जनसामान्यांच्या प्रश्नांशी सदैव जोडले जाऊ हा विचार मनात मूळ धरू लागला. लागलीच इंटरनेट, क्लासेस, मित्रांकडून माहिती घेण्यास सुरुवात केली. वडलांनीही या कामात मला मदत केली. चांगली डॉक्टरकी सोडून हे काय खूळ घेऊन बसलास, असला काही प्रश्न न विचारता त्यांनी मला प्रोत्साहन दिले. शिकवणी वर्गाची माहिती काढली. परीक्षेचे, अभ्यासक्रमाचे स्वरूप मी समजून घेतले आणि विचार पक्का केला, आपल्याला आयएएस व्हायचंय!



**पराग गवळी, (भा.प्र.से.)**
**उपजिल्हाधिकारी, नाबरंगपूर, ओडिशा**

**ध्येय निश्चित असेल आणि त्या दृष्टीने आवश्यक ते परिश्रम घेण्याची आपली तयारी असेल तर यूपीएससीची परीक्षा उत्तम करिअरचा राजमार्ग ठरू शकते. ही संधी ओळखून स्वत:च्या क्षमतांना न्याय देण्यासाठी, कामात वैविध्यता आणण्यासाठी एक डॉक्टर या स्पर्धा परीक्षेच्या तयारीला लागतो आणि अल्पावधीतच आयएएस होण्याचे ध्येय साध्य करतो. ही गोष्ट आहे सांगली जिल्ह्यातील तासगावचे डॉ. पराग गवळी यांची. एमबीबीएसनंतर वैद्यकीय सेवेत चांगली संधी असताना त्यांनी हा निर्णय घेतला आणि प्रत्यक्षातही आणला.**

### अशी केली तयारी

एमबीबीएसनंतर वर्षभरातच यूपीएससीची परीक्षा देण्याचा निर्णय घेतल्यानंतर तयारीवर लक्ष केंद्रित केले. ठाणे येथील चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेत मोलाचे मार्गदर्शन मिळाले. पहिल्या प्रयत्नात यश आले नाही. मात्र यशाच्या बराच जवळ आलो होतो. निर्णय तर पक्का होता. पुढील तयारीसाठी दिल्ली गाठली. सहा महिन्यातील दिल्ली येथील कोचिंग क्लासेसमध्ये सामान्य अध्ययन व मानसशास्त्र या बाजू भक्कम केल्या. परंतु येथे एक सांगावेसे वाटेल की, दिल्ली येथे जाऊन कोचिंग घेतलेच पाहिजे असा ग्रह कुणी मनात बाळगू नये. आपल्या हातात चांगले वाचन साहित्य, नोट्स आणि परिश्रम घेण्याची तयारी असेल तर यश हमखास मिळणार.

विषय निवडताना देखील आपल्याला तोंडओळख असलेले विषय निवडल्यास तयारी करणे सोपे होते. तेव्हा दोन विषय आम्हाला निवडावे लागत होते. मी वैद्यकीयशास्त्र व मानसशास्त्र हे दोन विषय निवडले. मानसशास्त्रच्या अनेक संकल्पना वैद्यकीय शास्त्राशी निगडित असल्याने ते सोयीचे वाटले. दोन्ही विषयांचा सखोल अभ्यास केला. दुसऱ्या प्रयत्नात पूर्व, मुख्य परीक्षा आणि मुलाखत या तिन्ही आघाड्यांवर स्वत:ला सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. यात काहिसे यश मिळाले. ग्रुप बीमधून संरक्षण खात्यात असिस्टंट सेक्रेटरी

म्हणून निवड झाली. मात्र एवढ्यावर समाधान मानायचे नाही जे ठरवले आहे तेच करायचे. पुढच्या प्रयत्नात मास्टरस्ट्रोक द्यायचाच ही खूणगाठ मनाशी बाळगून पुन्हा तयारीला लागलो. तिसऱ्या प्रयत्नात मात्र यशाला गवसणी घातलीच. २०१२ मध्ये झालेल्या परीक्षेत ५४६ वी रँक मिळाली. मी आयएएस झालो.

### गेम ऑफ मेमरी

कुठलीही परीक्षा ही 'गेम ऑफ मेमरी' असते. त्यामुळे यूपीएससीची तयारी करताना काही महत्त्वाच्या गोष्टी, घटना, प्रसंग, टीपण आपल्या आठवणीत राहणे खूप महत्त्वाचे ठरते. मी तर म्हणेन, काही गोष्टी पाठच करायला हव्या. थोडक्यात सांगायचे झाले तर ऐन परीक्षेच्या वेळी त्या आठवायला हव्यात. त्यासोबतच एखाद्या घटनेचे विश्लेषण, तुलनात्मक वर्णन तुम्ही कसे कराल याला या परीक्षेत खूप महत्त्वाचे स्थान आहे. आपल्या विश्लेषणावर आपल्याला अधिक गुण प्राप्त होतात. एखाद्या घटनेविषयी आपले आकलन किती आहे हे त्यातून दिसून येते. लक्षात ठेवण्यासाठी आपल्याला ज्या सोयीच्या असतील त्या ट्रिक्स आपण वापरू शकतो. मित्र, विविध कार्यशाळा यांच्याकडून त्या आपल्याला आत्मसात करता येईल. एखादी घटना, सनावळ्या यांचे व्हिज्युअलायझेशन (दृष्यात्मिकरण), संबंध जोडणे यातून असंख्य गोष्टी लक्षात ठेवता येतात.

### सातत्य

नियमित वृत्तपत्रीय वाचन हे अत्यावश्यक आहे. आपण एक दिवस वृत्तपत्र वाचले नाही तर त्या दिवसाच्या घटना वाचायच्या राहून जातात. किंबहुना उद्या वाचायचे म्हटले तरी त्याला अधिक वेळ लागणार, ताण



वाढणार. त्यामुळे त्या-त्या दिवशीचे वाचन त्याच दिवशी झाले पाहिजे हा शिरस्ता ठेवावा. वृत्तपत्रातील विविध घटनांचा कार्यकारण भाव, त्या घटनेच्या पार्श्वभूमीचा तुलनात्मक अभ्यास, विचार करण्याची सवय लावून घ्यावी.

द हिंदू, इंडियन एक्सप्रेस, टाइम्स ऑफ इंडियासारखी नामांकित व विश्वसनीय वृत्तपत्रांचे नियमित वाचन ठेवावे.

### यशाची सूत्रे

- **ध्येय निश्चित करा आणि त्यावर ठाम राहा.**
- **समस्या निवारण विचारपद्धती विकसित करा. याचा फायदा तुम्हाला केवळ सकारात्मक व्यक्तिमत्त्व घडवण्यातच नव्हे तर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मुलाखतीदरम्यान आणि प्रत्यक्ष कर्तव्य बजावण्यादरम्यान होईल.**
- **तुमच्या आजूबाजूला जे काही घडत आहे, ज्या काही अडचणी, प्रश्न आहेत त्यावर अधिक चांगला उपाय, मार्ग काय असू शकेल याचा सतत विचार करा.**
- **आपला शैक्षणिक पाया, क्षमता, मर्यादा, आकलन या बाबींचा विचार करून निर्णय घ्यावा व अभ्यासाची दिशा ठरवावी.**
- **विश्लेषणात्मक उत्तराची सवय लावावी.**
- **नियमित वृत्तपत्रीय वाचन करावे.**
- **सर्वांजवळ माहिती, नोट्स हल्ली सहज मिळतात. मात्र तुम्ही तुमच्याकडील माहितीचा वापर कसा करता हेही महत्त्वाचे आहे.**
- **स्वअध्ययनावर भर द्या.**
- **प्रश्नपत्रिका सोडवण्याचा सराव करा.**
- **१०० टक्के परिश्रम करा.**

### मुलाखत

मुलाखत बहुधा आपल्या बायोडाटावर अधिक आधारलेली असते. परंतु काही वेळा बायोडाटापेक्षा मुलाखतीचा विषयच वेगळा होऊन जातो. आपले व्यक्तिमत्त्व आणि समोरील पॅनल कसे आहे यावर मुलाखतीचा सूर ठरतो. कौशल्य, अचूक उत्तर, हुशारी हे तर महत्त्वाचे असतेच. परंतु विशिष्ट पदासाठी कसा उमेदवार पाहिजे हेदेखील पाहिले जाते. शिवाय मुलाखत आपल्याला जी सोयीची भाषा आहे त्यात द्यावी. येथे भाषेचा संबंध नसतो. आपण काय बोलत आहोत ते समोरच्याला चांगल्या प्रकारे समजणे एवढेच महत्त्वाचे असते. मुलाखत इंग्रजीमध्ये दिल्यास पॅनलसोबत चांगला संवाद होतो. काही वेळा आपले उत्तर, म्हणणे अनुवादक समर्पक शब्दांत मांडू शकेलच असे नाही. आपल्या उत्तरात विश्लेषण, ठाम मत, आत्मविश्वास या गोष्टींचा समावेश मात्र असायला हवा.

**शब्दांकन : राजाराम देवकर**

# मराठी टक्का वाढला




**माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या दिल्ली येथील कार्यालयात यूपीएससीमध्ये अंधत्वावर मात करून उत्तीर्ण होणाऱ्या प्रांजली पाटील यांचे अभिनंदन करताना खासदार प्रीतम मुंडे, उपसंचालक दयानंद कांबळे आणि यूपीएससीमध्ये उत्तीर्ण झालेले अन्य विद्यार्थी.**

पदवी अभ्यासक्रम झाल्यानंतर. प्रशासनाच्या सेवेत काम करण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थांसाठी लोकसेवा आयोगाची परीक्षा असते.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी अव्वल प्रगती केली आहे. १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश संपादन केले आहे. योगेश कुंभोजकर राज्यात पहिला तर भारतात ८ वा आला आहे . श्रीकृष्णनाथ पांचाळ याने राज्यात २ तर भारतात १६ वा, सौरभ गहयारवार याने राज्यात तिसरा आणि देशात ४६ वा क्रमांक मिळविला आहे . भारतात प्रथम क्रमांकावर येण्याचा मान दिल्लीच्या टीना दाबी हिने पटकावला आहे.



**केंद्रीय लोकसेवा आयोगाचा निकाल नुकताच जाहीर झाला. देशातील १ हजार ७८ उमेदवार यात यशस्वी ठरले. यामध्ये १०० हून अधिक मराठी उमदेवारांनी यश संपादन केले आहे. या उमेदवारांनी जिद्द आणि चिकाटी ठेवली, खूप मेहनत घेतली आणि शेवटी त्यांनी केलेल्या कष्टाचे फळ मिळाले.**

### भारतीय प्रशासकीय सेवा म्हणजे काय?

यूपीएससी म्हणजे युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन (संघ लोकसेवा आयोग). नागरी प्रशासनाची जबाबदारी सांभाळण्यासाठी आवश्यक सक्षम उमेदवारांची निवड करणारी स्पर्धात्मक स्वरूपाची परीक्षा म्हणजे नागरी सेवा परीक्षा होय. ही अत्यंत महत्त्वाची व प्रतिष्ठेची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर देशाच्या विविध सेवांमध्ये म्हणजे भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय परराष्ट्र सेवा, भारतीय पोलीस सेवा यांसारख्या सुमारे ३६ सेवांची दालने तरुणांसाठी खुली होऊ शकतात. प्रशासनातील सनदी सेवा पदांची निवड करण्यासाठी संघ लोकसेवा आयोगाद्वारे दरवर्षी किमान १६ प्रकारच्या स्पर्धात्मक परीक्षांचे आयोजन केले जाते. संकेतस्थळ www.upsc.gov.in. देशाच्या कारभाराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बनलेल्या प्रशासनात पात्र व गुणवत्ताधारक उमेदवारच भरती केले जावेत, गैरप्रकार होऊ नयेत यासाठी घटनाकर्त्यांनी राज्यघटनेत स्पष्ट तरतूद करून प्रशासकीय सेवापदांच्या भरतीसाठी स्पर्धात्मक परीक्षांचे आयोजन करण्याची जबाबदारी युपीएससी या घटनात्मक संस्थेकडे (लोकसेवा आयोग) सोपवली गेली आहे.

युपीएससीद्वारे भारतीय प्रशासनातील सुमारे ३६ प्रकारच्या पदांची भरती केली जाते. याशिवाय या परीक्षा कितीवेळा देता येतात यामध्ये कशाप्रकारचे आरक्षण असते. यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे.

**गणेश जाधव**

### प्रांजली पाटील यांच्या जिद्दीने सर्व भारावून गेले

**अंधत्वावर मात करून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत ७७३ व्या गुणक्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या महाराष्ट्रातील उल्हासनगर कॅम्प नं. ४ येथील प्रांजली पाटील यांचे या कार्यक्रमातील वचन सर्वांसाठी प्रेरणादायी ठरले. प्रांजली पाटील मूळच्या जळगावच्या असून सध्या दिल्लीतील जवाहरलाल नेहरु विद्यापीठातून 'पश्चिम आशियी देश' या विषयावर त्या संशोधन करीत आहेत.**

# महाराष्ट्रातील गुणवंतांची यादी

महाराष्ट्रातून १००हून अधिक उमेदवार यशस्वी ठरले आहेत. यामध्ये योगेश कुंबेजकर ८, श्रीकांतनाथ पांचाळ १६, हनुमंत झेंडगे ५०, विशु महाजन ७०, निखिल पाठक १०७, सिद्धेश्वर बोंडार १२४, स्वप्नील वानखडे १३२, रोहण बोटरे १८७, स्वप्नील खरे १९७, राहुल पांडवे २००, नवनाथ गव्हाणे २२०, हर्षल भोयर २३३, मुकुल कुलकर्णी २३८, रोहित गोडके २५७, अक्षय कोंडे २७८, रवींद्र खटाळे २८३, आशिष काटे ३२८, पंकज खंडागळे ३४०, अक्षय पाटील ३४४, किशोर क्षीरसागर ३५३, संजीव चेथुले ३५४, शेख अंसर अहमद ३६१, दत्तात्रेय शिंदे ३७७, विवेक भस्मे ३९५, श्रीकांत सुसे ४००, रेहा जोशी ४२५, वासुद तोरसेकर ४४०, कपिल गाडे ४५५, सायली ढोले ४४८, सोमय मुंडे ४७६, संदीप भोसले ४८२, अमित मुंडे ४८५, स्वप्निल पुंडकर ४८७, शिबी गहरवार ४८९, अमित आसरे ४९०, अदिती वाळुंज ४९१, पुनम पाटे ४९७, तुषार वाघ ५४५, नंदकिशोर कलाल ५४९, मनिष नारनवरे ५५२, विशाल साकोरे ५६८, देवयानी हलके ५७६, शितल वाली ५८०, प्रसाद मेनकुंदळे ५९९, प्रवीण डोंगरे ६०१, आकाश वानखडे ६०३, किरणकुमार जाधव ६१४, किरण शिंदे ६१८, ऋषिकेश खिल्लारी ६२७, शरदचंद्र पवार ६३२, गोपाल चौधरी ६३५, कुलदीप सोनवणे ६३६, चंद्रकांत राठोड ६३७, विशाल नरवडे ६४०, अरविंद कुमार नामदेव ६४८, अवध किशोर पवार ६५७, पवन बनसोड ६७४ शशांक शेव्हरे ६८२ , श्रुती शेजोळे ६९०, स्वप्निल कोठवडे ६९३, राहुल तिरसे ७०५, विनोदकुमार येरणे ७०९, रामदास काळे ७११, स्वप्नील महाजन ७२०, नितीश पाठोडे ७२३, रोहन आगवणे ७३५, समीर पाटील ७४६, लक्ष्मीकांत सुर्यवंशी ७५०, प्रांजल पाटील ७७३, संदीप साठे ७७५, विक्रम विरकर ७८४, जय वाघमारे ७८८, किशोर तांदळे ८१४, शुभम ठाकरे ८१७, ओमकारेश्वर कांचनगिरे ८२०, संदीप पानदुले ८२६, भुषण भिरूड ८२९, संघमित्र खोब्रागडे ८३२, योगेश पाटील ८३६, रामदास भिसे ८५१, स्वप्नील चौधरी ८६२, राहुल गारूड ८६९, उदय खोमणे ८८५, सुर्यकांत पवार ८८६, निधी बारड ८८७, प्रदीप मिरासे ८९६, शिवानंद सुर्वे ९१३, शिवम धमणीकर ९३४, प्रवीण गावस्कर ९३६, रोहीत कुमार भैसारे ९४१, अतुल कुमार टीरके ९४३, वैशाली धांडे ९६४, अमोघ थोरात ९६६, गौरव मेश्राम ९६८, अजय खरडे ९७५, क्रांती खोब्रागडे ९८२, स्वाती सुर्वे १००३, मामोनी डोले १००५, योगेश भरसाट १०१३, संदीप पवार १०३८, श्रीकांत मंत्री १०४८, राहुल माळी १०५४, सुधीर जाखेरे १०५९, स्नेहल भापकर १०६२, विष्णू अव्टी १०६४, संदीप सोनावणे १०७४, गोरखनाथ पाटील १०७६ हे उमेदवार आहेत.

---

### महाराष्ट्र शासनाच्या सुविधा/योजना

- महाराष्ट्र शासनाने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विद्यार्थ्यांसाठी रु. २३.४० कोटी शिष्यवृत्तीची तरतूद केली आहे.
- या तरतुदींतर्गत विद्यार्थ्यांसाठी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने दिल्लीत क्षमता विकास कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.
- मुलाखतीसाठी दिल्लीत आलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र सदनात किमान सात दिवस किफायतशीर दरात राहण्याची परवानगी दिली जाते.
- केंद्रीय लोकसेवा आयोग याचे प्रशिक्षण घेत असताना रु.१०,०००/- महिन्याला निर्वाह भत्ता दिला जातो.
- शिष्यवृत्ती योजना ही तीन टप्प्यात दिली जाते. प्राथमिक, मुख्य आणि मुलाखत.
- यूपीएससीची पूर्वतयारी करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या १०० विद्यार्थ्यांची निवड शासनाच्या मुंबई येथील एसआयएसी या प्रशिक्षण केंद्राकडून दरवर्षी केली जाते.
- मुंबई येथील एसआयएसी या प्रशिक्षण केंद्रासोबतच कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती येथेही अशी प्रशिक्षण केंद्रे उभारण्यात आली आहे.
- यासंदर्भात वसतिगृह सेवा देण्यात येते. (मुला मुलींकरीता एकूण ६५ जागा)
- विद्या वेतन रु.२,०००/- दर महिना प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना.
- वरील सर्व सेवासुविधेसाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. संस्थेच्या वसतिगृहाच्या जागा या २५ इतक्या आहेत इतर वसतिगृहात संस्थेच्या एकूण ३५ मुलांची सोय केली जाते.
- मुख्य परीक्षेस बसलेल्या व मुलाखत परीक्षेकरिता निवड झालेल्या उमेदवारांकरिता राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था विनामूल्य मुलाखत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करते.

## रिक्षाचालकाचा मुलगा सनदी अधिकारी

**हलाखीच्या परिस्थितीशी दोन हात करीत जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर जालना जिल्ह्यातील अन्सार शेख याने २२व्या वर्षी पहिल्याच प्रयत्नात केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केली. अन्सारचे वडील रिक्षाचालक, तर लहान भाऊ हा किराणा दुकानात कामाला आहे. त्याचे वडील शेख युनूस हे शेलगाव ते जालना रिक्षा चालवतात. त्यातून महिन्याला ६ ते ७ हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. घरची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने अनिसला आठवीनंतर शिक्षण सोडावे लागले. तो सध्या किराणा दुकानात कामाला आहे. त्याला महिन्याला ५ हजार रुपये पगार मिळतो. जालना शहरातील बारवाले महाविद्यालयात कला शाखेतून त्याने बारावीचे शिक्षण पूर्ण केले.**



**त्यानंतर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून कला शाखेतून पदवी संपादित केली. पुढे केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्याची त्याची मनीषा होती. त्यासाठी त्याने खाजगी शिकवणी वर्ग लावला. बारावीपर्यंत शिक्षण घेत असताना अन्सार हा स्वत: शेतात कामाला जायचा. त्यातून झालेल्या अर्थाजनातून शिक्षणाची गरज पूर्ण करायचा, असे त्याचे वडील युनूस यांनी सांगितले.**

# दुष्काळात केंद्राचा दिलासा

**देशभरात दुष्काळाचे संकट आहे. राज्यातील दुष्काळावर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासन वेगवेगळया उपाययोजना आखत आहे. तरीही केंद्र सरकारची मदत ही निश्चितच उपयोगी असते. केंद्र सरकारने राज्यांच्या मदतीसाठी सदैव हात पुढे केला आहे. याचाच एक भाग म्हणून देशातील तीन राज्यांच्या दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी प्रधानमंत्री कार्यालयात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शासन करीत असलेले उपाय आणि केंद्राकडून झालेली व अपेक्षित मदत याबाबत या बैठकीत राज्याच्यावतीने समर्थ बाजू मांडली. प्रधानमंत्र्यांनी तीनही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून जलसंधारणाची कामे करण्याबाबत या बैठकीत मार्गदर्शन केले. महाराष्ट्रात राबवण्यात येत असलेल्या जलयुक्त शिवार योजनेचे कौतुक करीत, छत्रपती शिवाजी महाराजांनी जलव्यवस्थापन व जलसंधारणासाठी अवलंबिलेल्या विविध मार्गांपासून धडा घेण्याबाबत प्रधानमंत्र्यांनी या बैठकीत सूचना दिल्या.**

बैठकीच्या दिवशी राष्ट्रपती भवनाला लागून असणाऱ्या रायसिना हील वरील पीएमओ अर्थात प्रधानमंत्री कार्यालयात सकाळपासूनच वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हालचाली सुरू झाल्या. सकाळी ९.४५ वाजता पीएमओत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री अखिलेश यादव यांच्या सोबत प्रधानमंत्र्यांची बैठक सुरू झाली. ही बैठक आटोपल्या नंतर महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी आयोजित बैठकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या बैठकीस पोहोचले. राज्याचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रीय, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव डी.के.जैन, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव प्रवीण परदेशी या बैठकीस मुख्यमंत्र्यांसोबत उपस्थित होते.

## पुरवणी प्रस्ताव देण्यास मंजुरी

मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील दुष्काळाच्या स्थितीबाबत सादरीकरण केले. राज्यातील दुष्काळाची व्याप्ती वाढली असून राज्याला ज्यादा आर्थिक मदतीची गरज असल्याचे त्यांनी या बैठकीत सांगितले. राज्यातील ११ हजार गावे नव्याने दुष्काळग्रस्त झाली आहेत, त्यामुळे दुष्काळग्रस्त गावांच्या मदतीसाठी पुरवणी प्रस्ताव सादर करण्याची राज्याची विनंती या बैठकीत मान्य करण्यात आली.

यापूर्वी राज्याने केंद्र शासनाकडे ४ हजार ५०० कोटीची मागणी केली होती त्यापैकी ३ हजार ५० कोटी केंद्र शासनाने राज्याला दिले आहेत. आतापर्यंतची ही सर्वात मोठी मदत महाराष्ट्र राज्याला मिळाली आहे. केंद्र व राज्य शासनाने पुढच्या सहा आठवड्यांचा मान्सूनपूर्व कृती आराखडा तयार केला असून यामध्ये पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांचा समावेश आहे.

दुष्काळावरील दीर्घकालीन उपाययोजनांसाठी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा कार्यक्रम राज्याने तयार केला आहे. यामध्ये शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध करून देऊन, त्यांचे पावसावरील अवलंबित्व कमी करायचे व जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून; मोठ्या प्रमाणात विकेंद्रित पाण्याचे साठे तयार करून जलसंचय वाढवायचा यावर भर देण्यात येणार आहे. जलयुक्त शिवार योजनेचे मूळ हे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमात आहे. त्यामुळे या योजनेंतर्गत वितरित होणाऱ्या निधीत वाढ केली जाणार आहे. केंद्र व राज्य शासनाने मिळून दरवर्षी या योजनेवर ५ हजार कोटी रुपये खर्च केले पाहिजेत. या योजनेसाठी



सर्वाधिक मदत राज्याला मिळावी अशी मागणी मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत केली.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी बैठकीत सांगितले, या योजनेंतर्गत महाराष्ट्राचे २६ प्रकल्प आहेत. या प्रकल्पाची सिंचन क्षमता १० लाख हेक्टर आहे. या प्रकल्पाची किंमत २० हजार कोटी रुपये आहे. या प्रकल्पाची किंमत ठरवण्याचे वर्ष २०१४-१५ धरण्यात यावे. जमीन अधिग्रहणासाठी लागणारा निधी यातून वगळण्यात यावा अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत केली.

**रितेश भुयार**

## विदर्भ व मराठवाड्यासाठी ७ हजार कोटींचे प्रकल्प

विदर्भ व मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त भागांमध्ये शाश्वत सिंचन व्यवस्था उभी करण्यासाठी राज्य शासनाने ७ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प तयार केले आहेत. हे प्रकल्प येत्या तीन वर्षात पूर्ण करता येऊ

### बैठकीतील महत्त्वाचे निर्णय

- प्रधानमंत्र्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी शेतकऱ्यांचे उत्पन्न २020 पर्यंत दुपटीपर्यंत करण्याकरिता कृतीशील कार्यक्रम.
- जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे याद्वारे जलसंधारणाचा व्यापक आराखडा अंमलात.
- महाराष्ट्र राज्य २०१९ पर्यंत कायम दुष्काळमुक्त करण्याकरिता सिंचनाच्या सोयी वाढवणारा कृती आराखडा अंतिम.
- विदर्भ व मराठवाड्यामध्ये तसेच पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षण प्रवण तालुक्यातील सिंचन योजना पूर्ण करण्यासाठी ९ हजार ५०० कोटींचा आराखडा.
- प्रधानमंत्री पीक विमा योजनेद्वारे अधिकाधिक शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीपासून सुरक्षा कवच.

काळात कर्ज बुडविणाऱ्यांच्या यादीत समाविष्ट झालेल्या सर्व शेतकऱ्यांना क्रेडिट सिस्टममध्ये आणण्यासाठी पुनर्रचना करण्यात यावी व यासाठी लागणारा ३ हजार कोटी रुपयांचा निधी राज्याला मिळावा, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

### जागतिक बँक करणार ४ हजार गावांना मदत

विदर्भ व मराठवाड्यातील ४ हजार गावांमध्ये सिंचन व्यवस्था उभी करणे, पीक पद्धतीचे नियोजन करणे व बाजारपेठेशी ती जोडणे असा पथदर्शी प्रकल्प राज्य शासनाने तयार केला आहे. या प्रकल्पास जागतिक बँक मदत करण्यास तयार आहे, यासाठी अर्थिक व्यवहार मंत्रालयामार्फत प्रस्ताव सादर करण्यात यावा असे जागतिक बँकेने सुचवले होते. राज्य



शकतात. त्यामुळे केंद्र शासनाने ही रक्कम राज्याला द्यावी अशी मागणी, मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्र्यांकडे या बैठकीत केली. पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण तालुक्यात काही योजना येत्या दोन ते तीन वर्षात पूर्ण करता येऊ शकतात. अशा योजनांसाठी केंद्र शासनाने २ हजार ५०० कोटी रुपयांचे पॅकेज द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

### वित्तीय आराखडा १५ हजार कोटींनी वाढवावा

महाराष्ट्रात १ कोटी ३६ लाख खातेदार शेतकऱ्यांपैकी ५८ लाख शेतकरी कर्ज घेत आहेत. उर्वरित शेतकरी क्रेडिट (ऋण) नियोजनात अद्याप आले नाहीत. यासाठी राज्याचा वित्तीय ऋण आराखडा १५ हजार कोटीने वाढवण्यात यावा, जेणेकरून २० लाख नवीन शेतकरी क्रेडिट नियोजनात समाविष्ट करता येऊ शकतील. ज्या शेतकऱ्यांचा समावेश कर्ज बुडवणाऱ्यांच्या यादीत झाला आहे, अशा शेतकऱ्यांना क्रेडिट सिस्टमच्या मूळ प्रवाहात आणले पाहिजे. वर्ष २०१२ ते २०१६ या

शासनाने तयार केलेल्या या प्रस्तावास कृषी विभागाने मान्यता दिली असून आता हा प्रस्ताव आर्थिक व्यवहार मंत्रालयाकडे पाठवण्यात आला आहे. लवकरच या प्रस्तावास मंजूरी मिळेल व तो जागतिक बँकेकडे पाठवण्यात येईल.

'प्रधानमंत्री पीक विमा' योजनेंतर्गत महाराष्ट्राने ७४ लाख हेक्टर जमीन विम्याखाली आणली आहे. महाराष्ट्रात सध्या २७ टक्के शेतकरी विमाधारक आहेत. सध्याची विमा योजना शेतकऱ्यांच्या हिताची असून अधिकाधिक शेतकरी या योजनेखाली आणण्याचा राज्याचा प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत स्पष्ट केले.

**(लेखक हे महाराष्ट्र परिचय केंद्रात उपसंपादक आहेत.)**
**संपर्क : ०९५८२७६७८७४**

# पोटदुखी आणि जंत



**आई माझे पोट दुखतेय, मी शाळेत जाणार नाही ते आज माझ्या पोटात कसतरीच होतय. ऑफिसला येणे जमणार नाही, असा बहुतेकांच्या पोटाचा प्रवास असतो. मानवी जीवनात सर्वाधिक आजार हे पोटाचेच असतात. भारतात ६८ टक्के आजार हे पोटाच्या विकाराचे आहेत. त्यामुळे शरीराचा यज्ञकुंड असणाऱ्या या पोटाच्या धगधगण्याला जेवढे महत्त्व आहे, तेवढेच महत्त्व पोटाचे विकार असणार नाही यालाही आहे. काही सामान्य गोष्टींचे पथ्य पाळले तरी या आजारावर ५० टक्के नियंत्रण आणता येते. विशेषत: ग्रामीण भागातील मुलांमध्ये पोटाचे विकार अधिक आढळून येतात. यासाठी अगदी लहान वयातच स्वच्छतेचा मूलमंत्र मुलांना देणे ही प्रत्येक पालकांची प्राथमिकता असली पाहिजे.**

जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार भारतात १ ते १४ वर्षे वयोगटातील किमान २४१ दशलक्ष (६८ टक्के) बालकांना दरवर्षी कृमी दोषाची लागण होत असते. जगात हेच प्रमाण २८ टक्के इतके आहे. मातीतून प्रसार होण्याचे प्रमाण जास्त असते. त्याचप्रमाणे प्रौढ व्यक्तींमध्येही कृमी दोष होत असतो. भारतातील ग्रामीण भागात या आजाराचे प्रमाण शहरी भागापेक्षा जास्त आढळते. कृमी हे सर्व प्राण्यांच्या आतड्यामध्ये वाढ होणारे परोपजीवी जीव असून त्यांची अंडी प्राण्यांच्या विष्ठेतून वातावरणात मिसळतात. तीच अंडी मातीतून, दुषित पाण्यातून इतर अनेक मार्गाने माणसांच्या पोटात जातात. तेथे ती अंडी उबवून पुन्हा पोटात कृमी तयार होतात. कृमी हे आतड्यांमधून शरीरातील अन्नरस, सूक्ष्म व मूलभूत अन्नद्रव्ये शोषून घेत असल्यामुळे रक्तक्षय, जीवनसत्त्वाचा अभाव, कुपोषण व रोगप्रतिकार शक्ती कमी होते. त्यामुळे मुलांची बौद्धिक व शारीरिक वाढ खुंटते व प्रौढांची क्रयशक्ती कमी होते. त्यामुळे या आजाराकडे दुर्लक्ष न करता गांभीर्याने पाहिले पाहिजे.

### आतड्यातील कृमींचे प्रकार :–

आतड्यांमध्ये वाढणारे महत्त्वाचे कृमी हे चार प्रकारचे असतात.

(१) गोलकृमी (राऊंड वर्म्स), (२) आकडीचे कृमी (हूक वर्म्स), (३) पट्टी कृमी (टेप वर्म्स), (४) पिनकृमी (पिन वर्म्स) वरील सर्व कृमींचे जीवनचक्र हे मानवी शरीर, प्राण्यांचे शरीर व वातावरण यामधून संक्रमित होत असते. माणसांचे राहणीमान, वैयक्तिक स्वच्छता व आरोग्य शिक्षणाच्या अभावामुळे कृमी दोष जास्त प्रमाणात आढळून येत आहे.



**डॉ. लक्ष्मण कोडाळकर**

### कृमी दोषांची कारणे

(१) व्यवस्थित न शिजवलेले अन्न खाणे (२) कच्च्या पालेभाज्या, कंद, फळे यांना अंडी चिकटलेली असल्याने न धुता खाणे (३) कृमींची अंडी असलेले दूषित पाणी पिणे (४) अनवाणी पायाने घाणीतून फिरताना, खेळताना अंडीयुक्त दूषित मातीतून प्रादुर्भाव (५) मानवी व जनावरांच्या विष्ठेतून वातावरणात प्रादुर्भाव.

### कृमी दोषांची लक्षणे

कृमींची अंडी पोटात गेल्यानंतर त्यांची उबवण होऊन प्रौढ कृमी तयार होतात व त्यांचे प्रजनन होऊन मोठ्या प्रमाणात पुन्हा अंडी घालतात व पुन्हा जीवनचक्राप्रमाणे वाढ होते व खालील लक्षणे दिसून येतात.

(१) पोटात दुखणे, (२) जुलाब, मळमळ होणे व मलावरोध होणे, (३) भूक मंदावणे, अशक्तपणा येणे व वजन कमी होणे, (४) मुलांमध्ये ताप येणे, अंगावर पुरळ, पांढरे चट्टे येणे, व संपूर्ण शरीराची खाज होणे, (५)

गुद्द्वाराभोवती खाज येणे, शौचातून रक्त पडणे व विष्ठेतून जंत पडणे.

**कृमी दोषांचे निदान:** कृमी दोषपीडित रुग्णाच्या विष्ठेची सूक्ष्मजीव तपासणी करून निदान केले जाते.

## उपचार

कृमी दोषावर दोन पद्धतीने उपचार करता येतो.

**वैद्यकीय औषधोपचार :** वेगवेगळ्या कृमी दोषांवर वेगवेगळी औषधोपचार पद्धती वैद्यकीय सल्ल्यानुसार देण्यात येते. मबेंडॉझॉल, आव्हरमेक्टीन, प्राझीक्विंटल, पॅरेंटल पामोइट व पॅपरॅझीन इ. कृमिनाशक औषधे डॉक्टरांच्या सल्ल्याने घेता येतात.

**प्रतिबंधात्मक उपाय :** कृमी दोष ज्या कारणांनी होतो त्याचे आरोग्य शिक्षण देणे गरजेचे आहे.



■ वैयक्तिक स्वच्छता, स्वच्छ कपडे वापरणे, नखे आठवड्यातून एकदा कापणे, जेवणापूर्वी हातपाय स्वच्छ धुणे.

**घरगुती उपचार : कृमी दोष असणाऱ्या रुग्णांना गाजर, कच्ची पपई, डाळिंब, लसूण, भोपळ्याच्या बिया, नारळ, कारल्याचा रस, हळद पावडर, दालचिनी पावडर, बांबूच्या पानांचा काढा, वेखंड इ. यापैकी एक किंवा अनेक पदार्थ खाण्यास दिल्यास कृमी आतड्यामध्येच नष्ट होतात.**

■ शौचालयाचा वापर १०० टक्के लोकांनी करणे. ■ पायात नेहमी पादत्राणांचा वापर करणे. ■ योग्य पद्धतीने शिजवलेले अन्न खाणे ■ पालेभाज्या, फळे व कंद स्वच्छ धुऊन खाणे. ■ दूषित पाणी पिऊ नये.
■ जनावरांचे गोठ्यात काम केल्यानंतर हातपाय स्वच्छ धुणे.
■ जनावरांनाही वैद्यकीय सल्ल्याने कृमिनाशक औषधोपचार करणे.
■ जनावरांच्या विष्ठेची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे.

## राष्ट्रीय जंतनाशक मोहीम

राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत केंद्र शासनामार्फत 'अलबेन्डॅझॉल' जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात येते. या औषधाच्या गोळ्या लहान मुलांना देणे सोयीस्कर नसल्याने लवकरच अलबेन्डॅझॉल सिरप केंद्र शासनामार्फत उपलब्ध करून दिले जाणार असल्याची सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत यांनी दिली.

केंद्र शासनाकडून ते उपलब्ध न झाल्यास राज्य शासनामार्फत उपलब्ध करून दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यामध्ये आरोग्य विभागामार्फत १० फेब्रुवारी २०१६ रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन राबवण्यात आला. या मोहिमेचा उद्देश मातीतून पसरणाऱ्या जंतामुळे होणाऱ्या आजारांना प्रतिबंध करणे असा आहे. राज्यातील ६ ते १९ वर्षे वयोगटातील शाळेतील व शाळाबाह्य सर्व मुलामुलींना या मोहिमेचा लाभ देण्यात आला. अशा पद्धतीने योग्य ती काळजी घेतल्याने कृमी दोषापासून मुक्ती मिळू शकते.

शासनस्तरावर राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अंगणवाडी, आरोग्य संस्था व शाळेमध्ये वर्षातून दोनवेळा बालकांना व किशोरवयीन मुलामुलींना जंतनाशक गोळ्या देऊन कुपोषण व रक्तक्षयाचे प्रमाण खूप कमी केले आहे. तरी कृमी दोषावर आरोग्य शिक्षण देऊन वेळेत औषधोपचार केल्यास सर्वजण निरोगी राहतील व सशक्त भारत बनण्यास मदत होईल.

**(लेखक हे शासकीय आरोग्य अधिकारी आहेत.) संपर्क : ०७८७५७८१६१०**

## पावसाळ्यात घ्यावयाची काळजी

**पावसासोबत साथीचे आजार वाढत असल्याने सर्वांनी प्रतिबंधात्मक काळजी घ्यायला हवी. दूषित पाण्यामुळे पसरणारे अतिसार, कॉलरा, गॅस्ट्रो, कावीळ, विषमज्वर यासारखे आजार तर डासांमुळे पसरणारे मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनियासारखे आजार पावसाळ्यात वाढताना दिसतात. याच दिवसात कोकण पट्टीत लेप्टोस्पायरोसिससारखा आजार तर विदर्भात जपानी मेंदूज्वर, चंडीपुरा मेंदूज्वर या आजारांचा प्रादुर्भाव होताना दिसतो. पिण्याचे पाणी स्वच्छ राहील याची दक्षता सर्वांनी घ्यावी. गावपातळीवर ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण समिती कार्यरत आहे. गावातील पाणी स्त्रोतांचे नियमित शुद्धीकरण आणि स्त्रोताभोवतीच्या परिसराची स्वच्छता ही जबाबदारी या समितीने पार पाडावयाची आहे. घरगुती पाणी साठ्याची योग्य निगा राखणे, आवश्यकतेनुसार पाणी शुद्धीकरणासाठी क्लोरीन गोळ्या अथवा मेडिक्लोरचा वापर करावा, साथीच्या काळात पाणी उकळून गार करून प्यावे. उघड्यावरील पदार्थ खाणे टाळावे. अतिसार, गॅस्ट्रो अशा आजारात क्षारसंजीवनी आणि झिंक गोळ्यांचा वैद्यकीय सल्ल्यानुसार केलेला उपयोग विशेष हितकारक ठरतो.**



**डेंग्यूपासून बचावासाठी टायर्स, नारळाच्या करवंट्या आदींमध्ये पाणी साचू देऊ नये. डेंग्यूचा डास दिवसा चावतो. त्यामुळे परिसर डासमुक्त ठेवावा. स्वच्छ पाणी आणि स्वच्छ परिसर ही आपल्या आरोग्याची गुरुकिल्ली आहे, हे लक्षात घ्यावे.**

**– डॉ. दीपक सावंत, सार्वजनिक आरोग्य मंत्री**




# स्मार्ट, स्वच्छ आणि सुंदर

**स्वच्छ भारत अभियानांतर्गत राज्यात मार्च २०१७ पर्यंत ४ लाख ५० हजार वैयक्तिक शौचालये बांधण्यात येणार आहेत. त्यापैकी १ लाख ९९ हजार २८२ शौचालयांचे बांधकाम पूर्ण झाले आहेत. २ लाख ७० हजार शौचालयांचे बांधकाम सुरू आहेत. यासाठी या अर्थिक वर्षात २६१.८४ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर अमृत योजनेंतर्गत मार्च २०१७ पर्यंत २२ हजार सार्वजनिक शौचालयांचे उद्दिष्ट असून त्यापैकी ३४६७ शौचालयांचे काम पूर्ण झाले आहे. ६०७२ शौचालयांचे काम सुरू आहे. मार्च २०१७ पर्यंत ११ हजार मे. टन कचऱ्याचे संकलन आणि वाहतुकीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्यातील ५६१ वार्डात, घरोघरी जाऊन कचऱ्याचे संकलन करण्यात येत आहे.**

स्वच्छ भारत अभियानाचे रूपांतर लोकचळवळीत होण्यासाठी या अभियानाशी संबंधित अधिकाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन 'मिशनमोड'वर काम करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. स्वच्छ भारत अभियान, स्मार्ट सिटी, अमृत सिटी योजनांचा आढावा मुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि केंद्रीय नगरविकास मंत्री व्यंकय्या नायडू यांच्या उपस्थितीत नुकताच घेण्यात आला. त्या वेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी केंद्रीय नगरविकास विभागाचे सचिव राजीव गौबा, अतिरिक्त सचिव समीर शर्मा, मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त अजोय मेहता, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव नितीन करीर, सचिव मनीषा पाटणकर–म्हैसकर आदी उपस्थित होते.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत कचऱ्याचे वर्गीकरण, वाहतूक आणि प्रक्रियेबरोबरच सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने महानगरपालिकांनी नियोजन करावे. आतापर्यंत राज्यातील २० शहरे संपूर्ण हागणदारीमुक्त झाली असून ३८ शहरांनी हागणदारीमुक्तीच्या दिशेने काम सुरू केले आहे. ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत राज्यातील १०० शहरे हागणदारीमुक्त होण्यासाठी यंत्रणांनी प्रयत्न करण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे. ते स्वच्छतेत अव्वल राहण्यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. मुंबई हे जागतिक दर्जाचे शहर आहे. या शहराच्या स्वच्छतेला प्राधान्य देणे आवश्यक असून त्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. यासाठी स्वच्छ अभियानाला जनआंदोलनाचे स्वरूप द्यावे. या अभियानात मुलांचा सहभाग वाढवण्याचे आवाहन श्री. नायडू यांनी केले.

**– विलास बोडके**

**(लेखक हे विभागीय संपर्क अधिकारी आहेत.)**

वृक्ष फार लवती फळभारे ।
ताप साहुनी देती निवारे ।
थोर गर्व ना करी विभवाचा ।
हा स्वभाव उपकारी जनांचा
**– नीतिशतक**

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे,
पक्षी ही सुस्वरे आळवीती ।
येणे सुखे रुचे एकान्ताचा चारा,
नाही गुणदोष अंगा येते ।
**– संत तुकाराम महाराज**

नाना वल्ली मध्ये जीवन ।
नाना फळी फुली जीवन ।
नाना कुद्कुळी जीवन गुणकारे ।
थोडक्यात सांगणे हेची
**– समर्थ रामदास स्वामी**

वृक्ष सर्वांची सेवा करितो ।
छाया, पुष्पे, फळे देतो ।
शेवटी प्राण तोही कार्या लावितो ।
सेवेसाठी ।।
**– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

**2 कोटी वृक्षलागवड**

**विशेष पुरवणी**

# चला, करू या हरित महाराष्ट्र



# भरू या वसुंधरेची ओटी

**'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' असे म्हणून संतांनी वृक्षाशी आपले नाते जोडले, त्यांना आपले सगेसोयरे मानले पण त्याच वृक्षसंपदेकडे आपण दुर्लक्ष केल्याने आज प्रदूषण, पर्यावरणाचे अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे राहिले आहेत. मोठ्या प्रमाणात होत असलेली वृक्षतोड, वाढती लोकसंख्या, कारखाने आणि वाहनांचे होणारे प्रदूषण, सांडपाणी-घनकचरा व्यवस्थापनाचे आव्हान,या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून वातावरणात होत असलेला बदल आणि विरळ होत असलेला ओझोनचा थर यावर विश्वस्तरावर मंथन सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून वन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने १ जुलै २०१६ रोजी, एकाच दिवशी २ कोटी झाडे लावण्यात येणार आहेत. हरित महाराष्ट्राचा संकल्प प्रत्यक्षात येण्याच्या दिशने हे एक महत्त्वाकांक्षी पाऊल आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने वनमंत्री श्री. मुनगंटीवार यांच्याशी केलेली ही बातचीत.**

**एकाच दिवशी २ कोटी झाडे लावणार...**
**आव्हान किती मोठे वाटते?**

आव्हान वृक्ष लागवडीचे नाही, त्याचे नियोजन पूर्ण झाले आहे. परंतु लावलेले वृक्ष जगवण्याची जबाबदारी मात्र आहे आणि ती सर्वांचीच आहे. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांपासून दुष्काळाची दाहकता जाणवत आहे. जागतिक पातळीवर वाढता उष्मा, प्रदूषण, अन्न समस्या, ताणतणाव, पर्यावरणाचा ऱ्हास, नैसर्गिक संसाधनाची कमतरता, जलसंकट हे अलीकडच्या काळात प्रकर्षाने भेडसावणारे प्रश्न आहेत. तुम्हाला सांगतो, यातील बहुतेक प्रश्नांचे उत्तर हे वनात आहे; ज्याच्याकडे आपले दुर्लक्ष होत आहे. आता असे करून चालणार नाही. 'दृष्टीआड सृष्टी' असे न म्हणता, जागरूक दृष्टीने या वन सृष्टीकडे लक्ष देण्याची वेळ आली आहे.

**विकास की पर्यावरण रक्षण हा नेहमीच चर्चेचा मुद्दा राहिला आहे. आपण याबाबत काय सांगाल?**

आपल्याला विकासही हवा आणि जगण्यासाठी सुंदर स्वच्छ पर्यावरणही.





त्यामुळे तुमच्या प्रश्नाचे उत्तर देताना मी एवढेच म्हणेन की, आपल्याला पर्यावरणपूरक किंवा पर्यावरणस्नेही विकास साधता आला पाहिजे. प्रचंड वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि तिच्या गरजा, वनांच्या ऱ्हासाचे कारण आहेत. एकेक झाड तोडून आपण आपलेच आयुष्य उजाड करत आहोत.

डॉ. सुरेखा मुळे

वनांच्या ऱ्हासामुळे दरवर्षी बहुमोल माती वाहून जात आहे. जमिनीची धूप वाढत आहे. म्हणून वन विभागाने वनमहोत्सव आणि कृषिदिनाचे औचित्य साधून १ जुलै २०१६ रोजी एकाच दिवशी २ कोटी झाडे राज्यभरात लावण्याचा निर्णय घेतला आहे.

**वसुंधरेची ओटी भरणार म्हणजे नेमके काय कार्यक्रम घेणार?**

राज्य शासन १ जुलै २०१६ रोजी एकाच दिवशी तब्बल २ कोटी रोपांची लागवड करीत, या महाराष्ट्रभूमीची ओटी हिरव्या रोपांनी भरण्यात येणार आहे. सध्या राज्याचे वनक्षेत्र व वृक्षाच्छादन २०.०४ टक्के आहे. हे



वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत वाढवणे आवश्यक आहे. त्यासाठी हरित महाराष्ट्र या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे. वनांची समृद्धी आणि जलसाक्षरता यातून आपण महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलू शकतो. त्यासाठी एक माणूस एक झाड, नक्षत्रवन, बांबू वन, तुळस वन, स्मृती वन अशा विविध संकल्पातून आपण वन विकासाला चालना देत आहोत. आपण राज्यातील शाळांमधून ग्रीन आर्मी सारखी संकल्पना पुढे आणली आहे. हे हरित लष्कर संपन्न महाराष्ट्राच्या निर्मितीत योगदान देईलच पण यापुढे जाऊन शासनासोबत राज्यातील सर्व जनतेने यात सहभागी व्हावे म्हणून १ जुलै २०१६ रोजी आपण एकाच दिवशी दोन कोटी झाडे लावणार आहोत.

## या योजनेच्या अंमलबजावणीचे स्वरूप कसे असेल?



या कार्यक्रमात शासनाच्या जवळपास २० विभागांचा आपण समावेश केला आहे. कोणत्या विभागाने किती झाडे लावायची याचे सर्वसाधारण लक्ष्य त्यांना ठरवून देण्यात आले आहे. त्याशिवाय खाजगी, पडीक, सामूहिक आणि इतर वनेतर जागेवर वृक्षारोपण करण्यात येणार आहे. या कामात सर्वसामान्य जनता, स्वंयसेवी संस्था, अशासकीय संस्था तसेच खाजगी उद्योजक, सहकारी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा-महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील विद्यार्थी, एन.सी.सी, स्काऊट, गाइड, यांचे स्वंयसेवक यांचा तसेच लोकप्रतिनिधींचाही समावेश राहील.

आपण मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची स्थापना केली आहे. आपल्याला फक्त झाडे लावायची नाहीत तर ती जगवायचीदेखील आहेत. वृक्ष लागवडीनंतर वृक्षांचे जगण्याचे प्रमाण किमान ८० ते ९० टक्क्यांपर्यंत राहण्यासाठी पहिल्या चार वर्षांपर्यंतच्या उपाययोजना आपण सुचवल्या आहेत. लावलेल्या झाडाला जैविक किंवा तारांचे कुंपण, कायमस्वरूपी देखभाल आणि निगा या सर्व कामाचा नियोजन आराखडा विभागाने करायचा आहे. वृक्षारोपणाच्या दिवशी सकाळी ६ ते सायंकाळी ६ पर्यंत होणाऱ्या वृक्ष लागवडीची माहिती विहीत नमुन्यात आपण ती संगणकावर अपलोड करणार आहोत. जिल्हाधिकारी या कार्यक्रमाचा संकलित अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्याकडे सादर करतील. या कार्यक्रमाचे ऑनलाइन नियंत्रण केले जाईल त्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, वनभवन नागपूर यांनी यासाठी आवश्यक असणाऱ्या संगणकीय आज्ञावल्या विकसित केल्या आहेत. त्यामध्ये वृक्ष लागवडीसाठी निश्चित केलेली स्थळे अक्षांश-रेखांशासह नमूद करायची एवढेच नाही तर रोप लावण्यासाठी तयार केलेले खड्डे, वृक्ष लागवडीचे छायाचित्र, ज्याच्या हस्ते वृक्ष लागवड झाली त्या व्यक्तीची छायाचित्रे, वृक्षांची संख्या, स्वरूप, वृक्ष प्रजातीची माहिती या आज्ञावल्यांमध्ये अपलोड करायची आहे.

2 कोटी वृक्षलागवड

वन विभागाने ३१ मार्च २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये यासंबंधीच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना सर्वांना दिल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचे नियोजन आणि नियंत्रण करायचे आहे. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली यासाठी बैठका घेण्यात येतील त्यास त्या जिल्ह्यातील खासदार, आमदार, महापौर, जिल्हा परिषद अध्यक्ष, विषय समित्यांचे सभापती, पंचायत समितीचे सभापती आणि नगराध्यक्षासह सर्व लोकप्रतिनिधींना बोलवले जाईल.

## या कार्यक्रमांतर्गत कोणती झाडे लावली जाणार आहेत? आणि एवढी रोपे कशी उपलब्ध होणार आहेत.

शोभिवंत, फळे देणारे, औषधी वृक्ष आपण यात निवडले आहेत. यात आंबा, चिंच, आवळा, कवट, काजू, फणस, वड, पिंपळ, निंब, पळस, क्यॅशिया, रेन ट्री, गुलमोहर, चाफा अशा रोपांचा समावेश आहे. आपण रोपांची निवड अशीच केली आहे की, जेणेकरून तेथील पशू-पक्ष्यांचा अधिवास व अन्नसाखळी संवर्धित होईल. या कार्यक्रमासाठी आपण खाजगी-सार्वजनिक उद्योजकांचा सामाजिक दायित्व निधी अर्थात सीएसआर निधी मिळवण्याचाही प्रयत्न करत आहोत. रोप लावण्यासाठी आता आपल्याकडे जवळपास १ लाख ७० हजार खड्डे तयार आहेत. केंद्रीय रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांनी या कार्यक्रमात सहभागी होण्याची तयारी दाखवली असून रेल्वेच्या जमिनीवर ते जवळपास ५० लाख रोपे लावतील, असे त्यांनी सांगितले आहे. हे महाराष्ट्राच्या भल्याचे पाऊल आहे. लोक या कामात नक्कीच योगदान देतील याची मला खात्री आहे. कारण गेल्या वर्षी आम्ही १५ ऑगस्टला राज्यातील ३० हजार शाळांच्या परिसरात ६ लाख रोपांची लागवड केली. आता तर आपण हा कार्यक्रम एक लोकचळवळ म्हणून हाती घेतला आहे. त्यामुळे तो नक्कीच यशस्वी होईल, यात शंका नाही.

**(लेखिका या विभागीय संपर्क अधिकारी आहेत.)**





# वृक्षवल्ली आम्हा सोयरे...

मिलिंद उमरे

महाराष्ट्राच्या मराठमोळ्या मातीत उगवलेल्या हिरव्या विपुल वनसंपदेने केवळ इथल्या नागरिकांचे श्वासच जपले नसून इथला इतिहास आणि संस्कृतीही जपली आहे. याच महाराष्ट्राच्या सह्याद्रीच्या घनगर्द रानाने सह्याद्रीसिंह छत्रपती शिवाजी महाराजांचा 'गनिमी कावा' यशस्वी करत स्वराज्याचे स्वप्न साकार केले.

**जंगल म्हणजे पृथ्वीची हिरवी फुप्फुसे आहेत. या फुप्फुसांद्वारेच आपाल्यालाही जगण्यासाठी ऑक्सिजन मिळतो. पावसाळी ढगांना वने आकर्षित करतात. वनांमुळे पावसाचे थेंब थेट मातीवर पडत नसल्याने जमिनीची धूप होत नाही. जमिनीला पुनरुत्पादनासाठी पोषक मूलद्रव्य , खनिजे आणि जिवाणूंचे रक्षण होते. वने पावसाचे पाणी अडवतात आणि जमिनीत जिरवतातसुद्धा. महाराष्ट्रातील वनवैभव बघताना ऊर आनंद आणि अभिमानाने भरून येते. या वनसंपदेच्या वैभवात भर घालण्यासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याची शपथ जागतिक पर्यावरण दिनाच्या (५ जून) निमित्ताने घ्यायला हवी.**



१८५७ चे पहिले स्वातंत्र्य युद्ध देशाच्या उत्तरेकडे पेटले असताना त्याचदरम्यान तत्कालीन चंद्रपूर जिल्ह्यातील वीर बाबुराव शेडमाके या आदिवासी वीराने सुरजागड, नांदगाव-घोसरीच्या घनदाट रानाचा आश्रय घेत ब्रिटिशांच्या फौजांना गोंड तलवारीचे पाणी दाखवले. याच महाराष्ट्राच्या रानाच्या साक्षीने गोंड, माडिया, कोरकू, कोलाम, ठाकर, भिल्ल, महादेव कोळी, वारली, कोकणा अशा आदिवासींच्या ४७ जमातींच्या आदिम संस्कृती विकसित झाल्या.

**महाराष्ट्राचे महावन**

महाराष्ट्र हे विविध प्रकारच्या वनांनी नटलेल राज्य आहे. येथे सदाहरित, नीम सदाहरित वनांपासून शुष्क पानगळीचे ते सागरी जैवविविधता जपणाऱ्या खारफुटीच्या जंगलापर्यंतची विविधता आहे. १९८८ मधील राष्ट्रीय वन धोरण व २००८ च्या महाराष्ट्र वन धोरणानुसार देशातील एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित असायला हवे.

महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३, ०७, ७१३ चौ. किमी असून वनक्षेत्र एकूण ६१, ६५२ चौ. किमी आहे. त्याची भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी २०.०४ टक्के इतकी आहे. महाराष्ट्राच्या या महावनात एकूण ६ राष्ट्रीय उद्याने, ४८ अभयारण्ये आणि ४ संवर्धन राखीव क्षेत्र अशी ५८ वन्यजीव संरक्षित क्षेत्रे अधिसूचित करण्यात आली आहेत. यांचे एकूण क्षेत्र १००७०.९२६ चौ. किमी आहे.

राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या तुलनेत हे क्षेत्र ३.२६ टक्के आहे. विशेष म्हणजे राज्यातील १९ संरक्षित क्षेत्रांचा (५ राष्ट्रीय उद्याने आणि १४ अभयारण्ये) समावेश करून मेळघाट, पेंच, ताडोबा-अंधारी, सह्याद्री, नवेगाव-नागझिरा आणि बोर असे ६ व्याघ्र प्रकल्प तयार करण्यात आले आहेत.

## महावृक्षांचा महाराष्ट्र

महाराष्ट्राच्या रानात सागवान, एन, धावडा, बिजा, तेंदू अशा अनेक वृक्ष प्रजाती आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील ग्लोरी ऑफ आलापल्ली इथे आजही सागवान , हल्दू, कळंब या प्रजातीचे महावृक्ष आपण बघू शकतो. येथील एक उन्मळून पडलेला महाकाय सागवान वृक्ष चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर वनआगारात सुरक्षित ठेवण्यात आला आहे.

उन्हाळ्यात तेंदू पानाच्या संकलनातून कोट्यवधींचा व्यवसाय होतो. पोट भरेल एवढा पैसा तेंदू वृक्ष मिळवून देतो. उपयोगी तेल देणारा कल्पवृक्ष मोहवृक्ष येथे आहे. हृदयबलवर्धक औषधांमध्ये वापरला जाणारा अर्जुन, लाल कुसुम्बी पानांचा कुसुम असे कित्येक वृक्ष सांगता येतील. शिवाय अनेक दिव्य वनौषधी या रानात आहेत.

## विपुल वनांचे संरक्षण

महाराष्ट्रातील चंद्रपूर, गडचिरोली भागातील वनक्षेत्राचे संरक्षण करण्यासोबतच या ठिकाणी पर्यटन विकासाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती केली जाते. ताडोबाच्या रानातील जलपा–तळीचा वारसा लाभलेल्या इरई नदीच्या विकासाचे काम वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी हाती घेतले आहे. वनाधिकार कायदा २००६, महाराष्ट्र राज्य जैविक विविधता नियम २००८, पेसा कायदा अशा कायद्यामुळे लोकसहभागातून वनसंवर्धन या संकल्पनेला बळ मिळत आहे. निसर्ग पर्यटन मंडळाची स्थापना, वन उद्यानांची निर्मिती, अत्याधुनिक रोपवाटिका, वनेतर क्षेत्रातील पाणथळे, सरोवरे आदी ठिकाणच्या जैवविविधतेचे व्यवस्थापन, श्यामाप्रसाद मुखर्जी जन वनविकास योजना, ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व गोरेवाडा प्राणिसंग्रहालय यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे वनपर्यटन केंद्र करण्याचा निर्णय, ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पासारख्या अतिमहत्त्वाच्या व्याघ्र प्रकल्पातील जलस्रोत, कृषी क्षेत्र, पाणवठे, वन्यप्राणी या नैसर्गिक साधनसंपत्तीला कोणताही मानवी धोका पोहोचू नये म्हणून 'इको सेन्सेटिव्ह झोन' जाहीर करण्यात आला आहे.

**(लेखक हे वन्यजीव व जैवविविधता विषयाचे अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ०९४२३४२२३४८**

## ३ ते ९ जून २०१६ या कालावधीत राज्यात पर्यावरण सप्ताह



ग्रामविकास विभागामार्फत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या स्मरणार्थ दिनांक ३ ते ९ जून २०१६ या कालावधीत राज्यात पर्यावरण सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताहात सर्व जिल्हा परिषदा आणि जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत पर्यावरण रक्षणाचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध कार्यक्रम राबवण्यात येतील. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी केंद्र सरकारमध्ये ग्रामीण विकासमंत्री व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून प्रभावी कामगिरी केली आहे. त्यांचे हे योगदान विचारात घेता त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.



## सुंदर झाडे, सुदृढ आरोग्य

राष्ट्रीय वननिती, १९८८ मधील धोरणानुसार एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्रावर वृक्षाच्छादन /वनीकरण असणे आवश्यक आहे.

राज्यातील ३०७ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी ६१.३५ लाख हेक्टर जमीन वृक्षाच्छादित आहे. हे प्रमाण सर्वसाधारणपणे २० टक्के आहे. जागतिक तापमानात होत असलेली वाढ, वातावरणातील बदल, बदललेले निसर्ग आणि ऋतुचक्र, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी किंवा दुष्काळ या माध्यमातून गेल्या काही वर्षात निसर्ग आपल्याला जाणीव करून देत आहे. पर्यावरणाचे असंतुलन, असमतोल, वाढते प्रदुषण आणि त्यातून होत असलेले पर्यावरणीय बदलही यामागील महत्त्वाची कारणे आहेत. यामुळे मानवी जीवनास या पर्यावरणीय बदलास सामोरे जावे लागत आहे, याबद्दल वादच नाही. ही बाब लक्षात घेऊन राज्य सरकारने विविध विभाग व जनतेच्या सहभागातून सन २०१६–१७ च्या मधील पावसाळ्यात वनमहोत्सव कालावधीमध्ये दि.१ जुलै २०१६ रोजी एकाच दिवशी दोन कोटी वृक्ष लागवडीचा मोठा कार्यक्रम हाती घेतला. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या प्रत्येक आरोग्य रुग्णालयात वृक्षरोपण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी आरोग्य विभागाने आठही उपसंचालक परिमंडळांना वृक्षरोपण करण्याची रुपरेषा आखून दिली. प्रत्येक आरोग्य विभागाच्या प्रशासन कार्यालय परिसरात २० रोपे, ग्रामीण/जिल्हा आणि उपजिल्हा रुग्णालयामध्ये प्रत्येकी ५० वृक्षरोपे लावणे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राने २० रोपे तर सार्वजनिक आरोग्य उपकेंद्राने प्रत्येक ५ रोपे आपल्या परिसरात लावण्यात येणार आहे.

**– खंडूराज गायकवाड, दै.महानगरीचे प्रतिनिधी (०९८१९०५९३३५)**

# शहरातील हिरवाई

**शहरे स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी केंद्र सरकार नगर विकास विभागाच्या माध्यमातून विविध योजना राबवत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी अमृत योजनेने शहरांचा कायापालट करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. अमृत योजनेंतर्गत शहरांच्या विकासाबरोबरच हरित क्षेत्र वाढीसाठी 'ग्रीन स्पेस' ही महत्त्वपूर्ण योजना राबवली जात आहे. राज्यातील ४३ शहरांची 'ग्रीन स्पेस' उपक्रमासाठी निवड करण्यात आली आहे. याअंतर्गत शहरांना वृक्षलागवड व संवर्धनासाठी प्रत्येक एक कोटी एवढा निधी दिला जात आहे. यामुळे राज्यातील शहरे हरित शहरे म्हणून नावारूपास येतील.**

शहरांचा विस्तार आणि विकास झपाट्याने होत आहे. लोकसंख्या, वाहनांच्या संख्येत झालेली वाढ, त्यामुळे होणारे प्रदूषण, अमाप वृक्षतोड यामुळे वातावरणात बदल झाला असून जागतिक तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. शहरांमध्ये हिरवाई किमान १५ टक्के असणे आवश्यक असते. मात्र अनेक शहरांमध्ये हे प्रमाण कमी दिसते. त्यामुळे काँक्रिटची जंगले उभी राहत असताना हरित पट्टेही मोठ्या प्रमाणावर निर्माण व्हावे यासाठी नगर विकास विभागामार्फत प्रयत्न केले जात आहेत. राज्य शासनाने



महाराष्ट्राच्या वनवैभवात भर घालण्यासाठी दोन कोटी वृक्ष लागवडीचे नियोजन केले आहे. त्यापैकी दहा लाख वृक्षलागवड करण्याचे व त्याचे संवर्धन करण्याचे नियोजन नगर विकास विभागाने केले आहे. त्यासोबतच ग्रीन स्पेस योजनेंतर्गत सदाहरित शहरांच्या निर्माणासाठी कंबर कसली आहे.

**राजाराम देवकर**

### काय आहे ग्रीन स्पेस योजना

अमृत या योजनेंतर्गत वर्षभराच्या कार्यक्रमांतर्गत २.५ टक्के भाग हा ग्रीन स्पेससाठी राखीव ठेवण्यात आला आहे. याअंतर्गत राज्यातील ज्या शहरांची लोकसंख्या एक लाखापेक्षा अधिक आहे, अशा शहरांचा यात समावेश करण्यात आला आहे. राज्यातील ४३ शहरांची यासाठी निवड करण्यात आली असून मुंबई वगळता, प्रत्येक शहरासाठी १ कोटी एवढ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. केंद्र शासनाचे २१ कोटी, राज्य शासनाचे १०.५० कोटी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे १०.५० अशा एकूण ४२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पुढील पाच वर्षे ही योजना वेगवेगळ्या स्वरूपात राबवली जाणार असून प्रत्येक वर्षासाठी नव्याने तरतूद केली जाईल.

### हरित स्थळांची निर्मिती

ज्या शहरांची या योजनेकरिता निवड करण्यात आली आहे त्या शहरांनी सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे आवश्यक आहे. शहराच्या विकास आराखड्यातील खुली मैदाने, उद्याने, हरित पट्टे आदी ठिकाणी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. एक कोटी एवढ्या निधीपैकी किमान ८० टक्के निधी हरित कामावर खर्च व्हायला हवा. यामध्ये वृक्षलागवड

नगर विकास विभागाच्या आधिपत्याखालील राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती कार्यक्षेत्रातील कार्यालये, मोकळी मैदाने, उद्याने, रस्त्याच्या दुतर्फा इ. ठिकाणी तसेच आणखी काही स्थळे वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध असल्यास त्या ठिकाणी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.

## नियोजन

नगरविकास विभागाकडून दहा लाख झाडे लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विभागाच्या प्रत्येक कार्यालय परिसरात किमान १५ रोपटी, क वर्ग नगरपरिषद/नगरपंचायतींना किमान १००० (प्रती वार्ड किमान ५० रोपे) वृक्षलागवड, ब वर्ग नगरपरिषद क्षेत्रात किमान १५०० (प्रती वार्ड किमान ७५ रोपे), अ वर्ग नगरपरिषद क्षेत्रात २००० (प्रती वार्ड किमान १०० रोपे) एवढ्या किमान लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत वृक्ष लागवड करण्यासाठी स्वयंसेवी संस्था/ अशासकीय संस्था, खाजगी उद्योजक, सहकारी संस्था, विविध सामाजिक उपक्रमात अग्रेसर असणारी मंडळे व संस्था तसेच लोकप्रतिनिधी इत्यादींचा सहभाग घेण्यात येणार आहे.

## लागवडीसाठी वृक्ष निवड

हवामान, पाण्याची उपलब्धता व भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन सावली देणारे, शोभिवंत आणि फळझाडांच्या प्रजाती प्राधान्याने लावता येतील. स्थानिक परिस्थितीनुरूप अन्य रोपांची निवड केली जाईल. जेणेकरून पशु-पक्षी यांचा अधिवास व अन्नसाखळी टिकून राहील आणि जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन होण्यास मदत होईल. साधारणपणे खालील झाडे लावली जातील.

**प्रदूषण नियंत्रणासाठी :** वड, पिंपळ, आंबा, शिसम, अगस्ती, चिंच, फणस, बेल, सप्तपर्णी, काशीद, सोनमोहर, चाफा. **शहर सौंदर्यीकरणासाठी :** शिरीष, पळस, बहावा, कैलासपती, अनंत, आकाशनिम, बकूळ, पारिजातक, अशोक. **जलसंवर्धनासाठी :** बांबू, गिरीपुष्प, बोर, डुरंगी, पिपळी. **सावलीसाठी :** वड, पिंपळ, महुवा, कुसूम, जांभूळ, बेहडा, फणस, आंबा, पिंपरी, चिक्कू, लिंब, करंज, भोकर, शिशु, कारंजी, जंगली बदाम, खिरणी, शेतूत, सिंगापूर चेरी, रिठा, इंग्रजी चिंच, देशी चिंच, सरू, मोठे ताड, मोठे पाम, आवळा, अर्जून वृक्ष, नक्षत्र व ग्रहांचे वृक्ष. **फुलेझाडे:** गुलमोहर, पथोडीयास, सोनचाफा, कनक चाफा, सिल्व्हर ओक, काशिया फिस्टोला, काशीद, शिरीष, शाल्मली, रेन ट्री, बूच, कांचन वृक्ष, बकुळी, कैलशपती, ताम्हण (जारूळ), प्लुमेरिया व्हरायटी, ग्लिसिडिया, पारिजात. **फळांसाठी :** आंबा, आवळा, चिंच इत्यादी.



## हरीत स्थळांचा विकास

हरीत स्थळांचा विकास करत असताना तेथे वृक्षलागवडीसोबतच अबालवृद्धांसाठी विविध सोयीसुविधा उभारण्यात येणेही अपेक्षित आहे. यात झरा तयार करणे, ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी बेंचेस व वृक्षांना ओटे बांधणे, लहान मुलांसाठी बगिच्यामध्ये खेळण्यासाठी हरित क्षेत्र, तसेच मातीपासून विविध कलाकृती तयार करणे, जॉगिंग ट्रॅक आदी विकासकामे केली जातील.




@Dev_Fadnavis

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेत असतात. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांचे काही ट्विटस्.**

पुणे विमानतळासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानताना...

Thanks @manoharparrikarji for helping acceleratePuneAirport work by giving 15.84acre land. Good relief to Punekars!

स्वच्छतादुतांचे अभिनंदन करताना...

Thankful to all the energetic & passionate #Changemakers who helped clean Bandra Railway Station! #MyCleanIndia

अमरावती जिल्ह्यातील नरदोडा गावातील ट्रॅक्टरच्या साहाय्याने ८० शेततळी निर्माण केली. कल्पकतेतून कमी खर्चात प्रकल्प पूर्ण करणाऱ्या गावकऱ्यांचा उल्लेख करताना...

Innovative minds of rural Maharashtra give low cost solution! Farmers of Nardoda village...

वैष्णवी महिला हाऊसिंग ग्रुपच्या गृहप्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्यानिमित्त...

Congratulations to women members of self help group for such grand, historic housing project in Pune.

येराळा येथील जलयुक्त शिवाराचा फायदा झाल्याच्या एका शेतकऱ्याच्या प्रतिक्रियेवर व्यक्त होताना...

Just a20min rainfall shows result at Yerala river rejuvenation #JalYuktShivarproj, Pusegaon, Satara

And here's what a local resident at Yerala river says about #JalYuktShivar works in his village.

लातूरला रेल्वेने पाणीपुरवठ्याविषयी...

6crore litre water sent for Laturkars.I thank every person toiling hard day in day out in such tough times! #drought

#सैराट च्या कलाकारांसह मनमोकळ्या गप्पा केल्या आणि त्यांचे अभिनंदन केले. पुढच्या प्रवासासाठी शुभेच्छा!

राजभवन येथील ऐतिहासिक स्थळ प्रकाशात आणल्यानंतर...

At the historic site of Raj Bhawan, along with State, the map of Maharashtra was also unveiled on 1st May 1960.

'डिजीटल व्हिलेज'चे उद्घाटन केल्यानंतर...

Maharashtra crosses yet another milestone as we launch pilot Digital Villages in 5 Gram Panchayats of Nagpur.

### 'नीट' संदर्भात सकारात्मक चर्चा

I requested Hon@ narendramodiji for a solution & I'm thankful to Him for being extremely positive about GoI taking a decision on it soon.

Grateful to Hon @narendramodi ji & GoI for postponing #NEET by an year! It has brought relief to lakhs of students. (20 May 2016)



नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांचे अभिनंदन करताना...

Congratulations to all candidates who passed #UPSC exam. Wishing you lot of success as Civil Servants in #TransformingIn-dia ! #CivilService

मुंबई-शांघाय या सिस्टर सिटीबाबत भारत व चीन दरम्यान झालेल्या सामंजस्य करारानंतर...

We will prepare a joint action plan for development of sister cities of Mumbai & Shanghai. Had produc-tive meetings.

चला संकल्प करू या !
सर्व मिळून पाणी वाचवू या !!

Maharashtra pledges to save water unitedly.

महाराष्ट्रदिनी निर्धार व्यक्त करताना...

We are committed for #Drought FreeMaharashtra&together we will makeMaharashtra the bestState in the world.



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता
यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप ४० लाख वाचक
ऑनलाईन वर्गणीदार होण्यासाठी :
http://dgipr.maharashtra.gov.in
रोखीने वर्गणीदार होण्यासाठी :
जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधा
लोकराजیہ
उर्दु लोकराज्य
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२५९१
राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून सोमवार ते शनिवार,
सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणारा कार्यक्रम
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
जय महाराष्ट्र
नाबाद...८६० भाग
दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून
मंगळवार व शुक्रवार, रात्रौ ७.२५ ते ८.१० या वेळेत
प्रसारित होणारा कार्यक्रम
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महा न्यूज
@१ कोटी ७७ लाख
www.mahanews.gov.in
MAHARASHTRA
Ahead
English Magazine
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
http://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th June 2016
Date of Publication : 10th of every Month

# लोकमान्य : लोकराज्य




प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक